ISSN - 2347-7075
Impact Factor - 8.141

INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH

Double-Blind Peer Reviewed / Bi-Monthly / Referred / Open Access Research Journal



Vol. 7 No. 49
July - August 2026

Young Researcher Association

International Journal of Advance and Applied Research

(IJAAR)

A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal

ISSN–2347-7075 **Impact Factor–8.141**

July – Aug - 2026

Volume - 7 Issue – 49

Published by:
Young Researcher Association, Kolhapur, Maharashtra, India
Website: *https://ijaar.co.in*
Submit Your Research Paper on Email
Regular Issue: editor@ijaar.co.in
For Publication Call On - **8624946865**

Executive Editor

Principal Dr. Sunil Helkar

Principal, Arts and Commerce College, Pusegaon

Dr. Sanjay Kshirsagar

Assistant Professor and Librarian

Arts and Commerce College, Pusegaon

Editorial Board

Dr. N. D. Lokhande

Associate Professor, Dept. of English Arts and Commerce College, Pusegaon

Dr. K. G. Kumbhar

Assistant Professor, Dept. of History Arts and Commerce College, Pusegaon

Prof. Dr. R.P. Bhosale

Professor, Dept. of Hindi Arts and Commerce College, Pusegaon

Dr. H. G. Nimase

Associate Professor, Dept. of Marathi Arts and Commerce College, Pusegaon

Mr. L. K. Pawar

Assistant Professor, Dept. of Economics Arts and Commerce College, Pusegaon

Shreemati M. B. Sonar

Assistant Professor, Dept. of Geography Arts and Commerce College, Pusegaon

Mr. P. V. Gaikwad

Assistant Professor, Dept. of Commerce, Arts and Commerce College, Pusegaon

Advisory Board

Prof. Dr. S.R. Shinde

Shreemati R.K. Mulla

Mr. S. R. Dhongade

Dr. A. T. Kambale

Mr. M. N. Awale

Dr. A. S. Jagtap

Mrs. U. V. Madane

Mr. S. P. Patil

Mr. G. A. Jadhav

Dr. M. S. Wagh

INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH
ISSN – 2347 -7075 (DOUBLE-BLIND Peer Reviewed) (Bi-Monthly Research Journal)
Vol. 7 No. 49
July – Aug - 2026

TABLE OF CONTENT

Sr. No.	Name of Author	Title of Paper	Page No.
1	प्रा. पवार किरण सर्जेराव	आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळ आणि मा. शरदचंद्र पवार	1-9
2	कु. रेश्मा चांगदेव निकम	पद्मविभूषण श्री शरदचंद्र पवार यांचे कृषी क्षेत्रातील योगदान : एक विश्लेषणात्मक अभ्यास	10-13
3	प्रो. डॉ. दत्तात्रय मारुती काळेल प्रा. संजय साहेबराव जगदाळे	शरद पवार आणि पुलोद प्रयोग: महाराष्ट्रातील राजकारणातील विश्लेषण	14-19
4	श्री. सागर बाळकृष्ण खोत	पद्मविभूषण शरदचंद्र गोविंदराव पवार : राजकीय विचारधारा आणि नेतृत्वशैली	20-24
5	डॉ. मारुती संभाजी वाघ	शरद पवार यांचे विवेकबुद्धी, चिकित्सक दृष्टी आणि विज्ञानवादी विचार: एक अभ्यास	25-29
6	डॉ. करीम मुल्ला	शरद पवार: प्रभावी नेतृत्व आणि दूरदृष्टीचे निर्णय	30 - 38
7	प्रा. गिरीष रेवणसिद्ध पवार	ग्रामीण विकास आणि पंचायती राज संस्थांचे योगदान	39 - 44
8	प्रा. अमृता दिलीप पाटील	शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत लोकनेते शरदचंद्र पवार साहेबांचा आवाज	45 - 51
9	डॉ. सुशील शिंदे श्री. विष्णू मनोहर गावडे	शेतकरीविषयक धोरणांतील पद्मविभूषण शरद पवार यांचे योगदान	52 - 58
10	श्री. शामराव ज्ञानोबा वाघमारे शिल्पा चंद्रकांत पाटील	शरदचंद्रजी पवार यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान	59 - 64
11	प्रा. संतोष संजय कोकरे	खासदार शरद पवार साहेब यांचा राजकीय प्रवास	65 - 69
12	प्रा. एल. के. पवार	मा.खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांचे राष्ट्र उभारणीतील आर्थिक योगदान	70 - 73
13	प्रा. डॉ. हनुमंत गणपत निमसे	खासदार शरद पवार यांचे कृषी क्षेत्रातील योगदान	74 - 78
14	प्रा. कविता म्हेत्रे	खासदार शरद पवार यांचे शैक्षणिक कार्य व विचार संशोधनात्म विश्लेषण	79 - 84
15	सौ. स्वाती विकास कुंभार	महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीतील खा. शरद पवार यांचे योगदान	85 - 90
16	प्रा. श्रीमती मनुजा भास्कर सोनार	खा. शरद पवार यांचे कृषी क्षेत्रातील योगदान	91 - 95
17	प्रा. आवळे महेश नारायण	पुरोगामी महाराष्ट्राचा स्तंभ शरदराव पवार	96 - 100
18	प्रा. एस. डी. वाघमारे	लोकनेते शरदचंद्रजी पवार: एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व	101 - 106
19	प्रा. गायकवाड पी. व्ही.	खा. शरदचंद्र पवारसाहेब यांचे नेतृत्व : एक चिकित्सक अभ्यास	107 - 111
20	प्रो. डॉ. शिंदे संग्राम रामचंद्र	महाराष्ट्राच्या कृषी-औद्योगिक अर्थकारणातील शरद पवार यांचे योगदान आणि सहकार राजकारणाचा चिकित्सक अभ्यास	112 - 116
21	प्रा. डॉ. अनिल सीताराम जगताप	शरद पवार यांचे सामाजिक सलोखा आणि ऐतिहासिक निर्णयांतील योगदान	117 - 120
22	प्रा. डॉ. एस. आर. क्षीरसागर	राष्ट्रनिर्मितीमध्ये पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांचे योगदान : रयत शिक्षण संस्थेच्या विकासाच्या विशेष संदर्भातील एक चिकित्सक अभ्यास	121 - 126
23	प्राचार्य डॉ. सुनील धोंडीबा हेळकर	पद्मविभूषण खा. शरद पवार यांचे आपत्ती निवारण कार्य: एक चिकित्सक अभ्यास	127 - 131
24	डॉ. आर. पी. भोसले	पद्मविभूषण शरद पवार जी की कृषि नीतियाँ एवं किसानों के विकास में योगदान	132 - 135
25	लिना महादेव कदम डॉ. आर. पी. भोसले	पद्मविभूषण शरद पवार जी की सामाजिक दृष्टि और महिला सशक्तिकरण	136 - 140
26	डॉ. कुंदा मुकुंदराव निंबालकर	मा. शरदचंद्र पवार और महिला सशक्तिकरण	141 - 145

Sr. No.	Name of Author	Title of Paper	Page No.
27	प्रा. श्रीमती राबन खुदाबक्ष मुल्ला प्रा. नदिम इक़बाल मुल्ला	शरद पवार - आधुनिक भारत के एक शिल्पकार	146 - 150
28	Miss. Pooja Vijay Indalkar	A Study of Contribution of Padam Vibhushan Sharadchandra Pawar to Rural Development	151 - 154
29	Mr. Satyawan Tanaji Kolekar	Sharad Pawar: Building an "UNDEFEATED WARRIOR" in Indian Democracy through Political Resilience	155 - 160
30	Ms. Smita Kumbhar	The Role of Political Leadership in Sports Development: A Case Study of Sharad Pawar	161 - 166
31	Dr. Kiran Ganpat Kumbhar	India's Defense Policy under Sharadchandra Pawar (1991-1993)	167 - 170
32	Dr. Ashwini Tanaji Kamble	Contribution of Padma Vibhushan Sharadchandra Govindrao Pawar to Women Empowerment	171 - 173
33	Prof. Shinde Kondiba Sidram	Sharadchandra Pawar: A National Leadership	174 - 177
34	Mr. Sudhir Ramchandra Dhongade	Padma Vibhushan Sharadchandra Pawar: Political Ideology and Leadership	178 - 181
35	Mr. Ulhas Bhaskar Sonar	Padma Vibhushan Sharad Chandra Pawar: Contribution to Arts and Cultural Development	182 - 183
36	Dr. Navanath Dnyandev Lokhande	Contribution of Sharad Pawar to Art and Literature	184 - 186
37	Prof. Anandrao Tukaram Khade	The Contribution of Padma Vibhushan Sharadchandra Pawar to Nation-Building	187 - 192
38	Mr. Rajkumar Milind Gadade	Sharad Pawar's Contribution to the Industrial Development of Maharashtra: A Critical Study	193 - 196
39	Gourav Arun Jadhav	Sharad Pawar's Contribution to National and International Sports Administration	197 - 199

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळ आणि मा. शरदचंद्र पवार

प्रा. पवार किरण सर्जेराव

श्री सदगुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्टस् अॅण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव

***Corresponding Author* - प्रा. पवार किरण सर्जेराव**

DOI - 10.5281/zenodo.23524325

गोषवारा (Abstract):

आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळ ही सामाजिक न्याय, समता, धर्मनिरपेक्षता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या मूलभूत मूल्यांवर आधारलेली परिवर्तनशील ऐतिहासिक प्रक्रिया आहे. या चळवळीची वैचारिक मुळे १९व्या शतकातील सामाजिक सुधारणा आंदोलनात आढळतात, ज्यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याने निर्णायक भूमिका बजावली. या महामानवांच्या विचारांमधून निर्माण झालेल्या समताधिष्ठित आणि मानवतावादी दृष्टिकोनाणे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय संस्कृतीला पुरोगामी स्वरूप दिले. या पार्श्वभूमीवर मा.शरदचंद्र पवार साहेब यांचे राजकीय व सामाजिक कार्य अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. त्यांच्या दीर्घकालीन राजकीय कारकिर्दीत सहकार चळवळ, कृषी विकास, शिक्षणाचा विस्तार आणि सामाजिक समावेशकता यांसारख्या क्षेत्रांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या धोरणांमध्ये पुरोगामी विचारसरणीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो, विशेषतः विविध सामाजिक घटकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याच्या प्रयत्नांतून आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांच्या जपणुकीतून.

प्रस्तुत संशोधन लेखात महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करताना आधुनिक काळातील तिच्या स्वरूपाचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्याचबरोबर मा.शरदचंद्र पवार यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा पुरोगामी विचारसरणीशी असलेला संबंध अधोरेखित करण्यात आला आहे. त्यांच्या धोरणांचा सामान्य जनतेवर, विशेषतः ग्रामीण समाज, शेतकरी वर्ग, महिला आणि वंचित घटकांवर झालेला परिणाम चिकित्सक पद्धतीने मांडण्यात आला आहे. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की मा.शरदचंद्र पवार यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत सामाजिक न्याय आणि समावेशकतेला चालना मिळाली असली, तरीही काही मर्यादा आणि आव्हाने कायम राहिली आहेत. त्यामुळे त्यांच्या योगदानाचे मूल्यांकन करताना पुरोगामी आदर्श आणि व्यवहारातील वास्तव यामधील संबंध समजून घेणे आत्यंतिक आवश्यक ठरते.

प्रस्तावना:

महाराष्ट्राची सामाजिक आणि वैचारिक घडण ही भारतीय उपखंडातील सर्वाधिक प्रगल्भ आणि परिवर्तनशील परंपरांपैकी एक मानली जाते. १९व्या शतकात उदयास आलेल्या सामाजिक सुधारणांच्या चळवळींनी येथे केवळ धार्मिक आणि सामाजिक रूढींना आव्हान दिले नाही, तर समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या आधुनिक मूल्यांची पायाभरणी केली. महात्मा ज्योतीराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यातून निर्माण झालेल्या या पुरोगामी परंपरेने महाराष्ट्राच्या सामाजिक संरचनेत मूलभूत परिवर्तन घडवून आणले. या परंपरेचा परिणाम असा झाला की

सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ही मूल्ये महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली. स्वातंत्र्योत्तर काळात या पुरोगामी विचारसरणीचे रूपांतर केवळ सामाजिक आंदोलनांपुरते मर्यादित न राहता ते राजकीय आणि प्रशासकीय धोरणांमध्येही प्रकर्षाने दिसू लागले. विशेषतः ग्रामीण विकास, सहकार चळवळ, शिक्षणाचा प्रसार आणि वंचित घटकांचे सक्षमीकरण या क्षेत्रांत राज्याने केलेल्या हस्तक्षेपामध्ये या परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यामुळे महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळ ही केवळ ऐतिहासिक घटना नसून ती सतत विकसित होणारी आणि बदलत्या परिस्थितीनुसार नव्याने आकार घेणारी प्रक्रिया आहे, असे म्हणणे योग्य ठरते.

महाराष्ट्रातील या व्यापक ऐतिहासिक आणि वैचारिक संदर्भात मा. शरदचंद्र पवारयांचे राजकीय आणि सामाजिक कार्य अभ्यासणे विशेष महत्त्वाचे ठरते. मा. शरदचंद्र पवार यांच्या दीर्घकालीन राजकीय कारकिर्दीत सामाजिक समावेशकता, धर्मनिरपेक्षता आणि विकासाभिमुखता या पुरोगामी मूल्यांचा सातत्याने आग्रह दिसून येतो. त्यांनी सहकार क्षेत्र, कृषी धोरणे, शिक्षण व्यवस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाला चालना देण्याचा प्रयत्न केला. लोक माझे सांगाती' या आत्मकथनातून त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची अंतर्गत जाण मिळते, तर राम कांडके यांसारख्या चरित्रकारांनी त्यांच्या नेतृत्वाच्या व्यवहारज्ञानाचा आणि समन्वयात्मक दृष्टिकोनाचा सखोल ऊहापोह केलेला आहे.

प्रस्तुत संशोधन लेखात आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करताना मा. शरदचंद्र पवार यांच्या कार्याचा त्या परंपरेशी असलेला परस्परसंबंध अभ्यासला आहे. त्यांच्या धोरणांमध्ये पुरोगामी मूल्यांचा कसा प्रत्यय येतो आणि त्या धोरणांचा सामान्य जनतेवर नेमका काय परिणाम झाला, याचे चिकित्सक विश्लेषण करणे हा या लेखाचा मुख्य उद्देश आहे. या अभ्यासात केवळ व्यक्तिनिष्ठ न राहता व्यापक सामाजिक-राजकीय प्रक्रियेच्या संदर्भात मा. शरदचंद्र पवार यांच्या योगदानाचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीची ऐतिहासिक पायाभरणी १९व्या शतकातील सामाजिक सुधारणा आंदोलनांमध्ये आढळते. या काळात समाजव्यवस्थेत खोलवर रूजलेल्या जातिव्यवस्था, अस्पृश्यता आणि स्त्रीदमन यांसारख्या अन्यायकारक प्रथांविरुद्ध व्यापक बौद्धिक आणि सामाजिक प्रतिकार करण्याचा विचार जन्मास आला. महात्मा ज्योतीराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने ब्राह्मणप्रधान सामाजिक रचनेला आव्हान देत शूद्र-अतिशूद्रांच्या उन्नतीसाठी शिक्षणाला प्रमुख साधन मानले. फुले यांच्या विचारांमध्ये समता, तर्कनिष्ठता आणि मानवतावाद यांचा स्पष्ट आग्रह दिसून येतो, ज्यामुळे महाराष्ट्रात पुरोगामी विचारांची बीजे रोवली गेली.[१] या परंपरेचा पुढील टप्पा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यात दिसून येतो. त्यांनी कोल्हापूर संस्थानात सामाजिक न्यायाच्या तत्त्वांवर आधारित धोरणे राबवून मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची अंमलबजावणी केली. त्यांच्या कार्यामुळे सामाजिक समतेचा विचार

केवळ वैचारिक स्तरावर न राहता तो प्रशासकीय धोरणांमध्येही प्रतिबिंबित झाला.[२]

पुरोगामी प्रक्रियेला वैचारिक आणि घटनात्मक अधिष्ठान देण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांनी भारतीय राज्यघटनेत समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचा समावेश करून सामाजिक न्यायाची संकल्पना संस्थात्मक केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे वंचित घटकांना केवळ अधिकारच नव्हे, तर सामाजिक सन्मानही प्राप्त झाला.[३] या तिन्ही प्रवाहांच्या एकत्रित परिणामामुळे महाराष्ट्रात एक विशिष्ट पुरोगामी वातावरण निर्माण झाले, ज्यामध्ये सामाजिक सुधारणा, शिक्षणाचा प्रसार आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना महत्त्व प्राप्त झाले. पुढील काळात सहकार चळवळ, कामगार चळवळी आणि स्त्री-सक्षमीकरणाच्या आंदोलनांनी या परंपरेला अधिक व्यापक स्वरूप दिले.

अशा प्रकारे महाराष्ट्राची पुरोगामी परंपरा ही केवळ ऐतिहासिक वारसा नसून ती सतत विकसित होणारी सामाजिक प्रक्रिया आहे. या पार्श्वभूमीवर पुढील राजकीय नेतृत्व, विशेषतः मा. शरदचंद्र पवार यांच्या कार्याचा अभ्यास करताना या ऐतिहासिक अधिष्ठानाचा विचार करणे अत्यावश्यक ठरते.

आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीचे स्वरूप व वैशिष्ट्ये:

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीने ऐतिहासिक परंपरेचा वारसा स्वीकारत नवे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय आयाम प्राप्त केले. या काळात पुरोगामी विचारसरणी ही केवळ वैचारिक पातळीवर मर्यादित न राहता ती प्रत्यक्ष धोरणे, संस्था आणि सामाजिक चळवळींमधून कार्यान्वित झालेली दिसते. धर्मनिरपेक्षता, सामाजिक समता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्यांची दृढता ही या चळवळीची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणून विकसित झाली.

महाराष्ट्रातील सहकार चळवळ हे या पुरोगामी प्रक्रियेचे एक ठोस उदाहरण मानले जाते. इ.स.१९६० नंतर महाराष्ट्र राज्यात साखर कारखाने, दूध संघ आणि पतसंस्था यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात आर्थिक विकासाचा पाया रचला गेला. सहकार संस्थांमुळे शेतकऱ्यांना बाजारपेठ, कर्जसुविधा आणि उत्पादन व्यवस्थापनाची संधी उपलब्ध झाली. यामुळे ग्रामीण समाजात आर्थिक स्वावलंबनाची प्रक्रिया सुरू झाली.[४] कामगार चळवळींनीही पुरोगामी विचारसरणीला बळ दिले. मुंबई, ठाणे आणि पुणे या औद्योगिक केंद्रांमध्ये कामगार संघटनांनी वेतन, कामगार हक्क आणि सामाजिक सुरक्षा यांसाठी संघर्ष केला. या चळवळींमुळे औद्योगिक क्षेत्रात सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण झाली.[५] शिक्षणाचा प्रसार हा पुरोगामी चळवळीचा आणखी एक महत्त्वाचा घटक ठरतो. ग्रामीण भागात शिक्षणसंस्था, महाविद्यालये आणि तांत्रिक शिक्षण केंद्रांची वाढ झाली. यामुळे मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या.[६]

महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी भागात शिक्षण पोहचविण्यात डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्था आणि बापुजी साळुंके यांच्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यांचा मोलाचा वाटा राहिला. स्त्री-सक्षमीकरणाच्या क्षेत्रातही महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण प्रगती केली. स्वयं-सहाय्य गट, महिला बचत गट आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे आरक्षण यामुळे महिलांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढला.

उदाहरणार्थ, पंचायत राज व्यवस्थेत महिलांना मिळालेल्या आरक्षणामुळे त्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास झाला आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचे प्रतिनिधित्व बळकट झाले.[७]

याचबरोबर महाराष्ट्रात वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारासाठी विविध चळवळी उभ्या राहिल्या, जसे की डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे अंधश्रद्धा निर्मूलन आंदोलन होय. या चळवळींनी समाजात तर्कनिष्ठ विचारसरणीला चालना दिली. अशा प्रकारे आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळ ही बहुआयामी स्वरूपाची असून ती सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये एकाच वेळी कार्यरत आहे. या प्रक्रियेमुळे महाराष्ट्रात एक प्रगल्भ आणि समावेशक सामाजिक वातावरण निर्माण झाले, ज्याचा प्रभाव पुढील राजकीय नेतृत्वावर, विशेषतः मा. शरदचंद्र पवार यांच्या धोरणांवर स्पष्टपणे दिसून येतो.

मा. शरदचंद्र पवार यांचे राजकीय नेतृत्वावर पुरोगामी विचारांची छाप:

महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेचा व्यवहारिक आणि संस्थात्मक स्तरावर प्रभावी अविष्कार ज्या नेतृत्वातून दिसून येतो, त्यामध्ये मा. शरदचंद्र पवार यांचे स्थान विशेष अधोरेखित करावे लागते. मा. शरदचंद्र पवार यांच्या दीर्घकालीन राजकीय कारकिर्दीत केवळ सत्ताकेंद्रित राजकारण न दिसता, सामाजिक समावेशकता, विकासाभिमुखता आणि व्यवहारज्ञान यांचा संगम आढळतो. त्यांच्या नेतृत्वशैलीत पुरोगामी विचारसरणीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो, परंतु तो केवळ सैद्धांतिक पातळीवर न राहता प्रत्यक्ष धोरणांमध्ये रूपांतरित झालेला दिसतो. मा. शरदचंद्र पवार यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण सामाजिक-आर्थिक संरचनेचा बारकाईने अभ्यास करून सहकार चळवळीला बळकटी दिली. साखर सहकारी कारखाने, दूध संघ आणि पतसंस्था यांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला संस्थात्मक आधार दिला. या प्रक्रियेमुळे शेतकरी वर्गाला उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन या सर्व स्तरांवर सहभाग मिळाला, ज्यामुळे आर्थिक सक्षमीकरणाची प्रक्रिया गतीमान झाली.[८]

त्यांच्या राजकीय प्रवासात विविध सामाजिक घटकांना प्रतिनिधित्व देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न दिसून येतो. जात, धर्म आणि प्रादेशिक भेद यांपलीकडे जाऊन त्यांनी समावेशक राजकारणाचा अवलंब केला. 'लोक माझे सांगाती' या आत्मकथेत त्यांनी विविध स्तरांवरील लोकांशी प्रस्थापित केलेले संबंध आणि त्यांच्या समस्यांबद्दलची संवेदनशीलता स्पष्ट केली आहे.[९] राम कांडके यांच्या चरित्रग्रंथात पवार यांच्या नेतृत्वाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे परिस्थितीनुसार निर्णय घेण्याची क्षमता आणि विविध हितसंबंधांमध्ये समन्वय साधण्याची वृत्ती असे नमूद केले आहे.[१०] हे गुण पुरोगामी विचारसरणीच्या व्यवहारिक अंगाशी सुसंगत ठरतात, कारण सामाजिक परिवर्तनासाठी केवळ तत्त्वज्ञान नव्हे, तर प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असते. कृषी क्षेत्रातील धोरणांमध्येही त्यांनी पुरोगामी दृष्टिकोन ठेवला. कृषी उत्पादनवाढ, सिंचन सुविधा आणि बाजारपेठेतील सुधारणा यांद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न केला. यामुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. अशा प्रकारे मा. शरदचंद्र पवार यांचे नेतृत्व हे महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेचे व्यवहारिक रूपांतर मानता येते, ज्यामध्ये विचार आणि कृती यांचा सुसंगत समन्वय दिसून येतो.

मा. शरदचंद्र पवार यांच्या धोरणांतील पुरोगामी मूल्यांची प्रत्ययकारी अभिव्यक्ती:

महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेचा गाभा समता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांमध्ये आढळतो. या मूल्यांचे व्यवहारिक रूपांतर राजकीय धोरणांमध्ये कसे घडते, याचे प्रत्ययकारी उदाहरण मा. शरदचंद्र पवार यांच्या कार्यातून दिसून येते. मा. शरदचंद्र पवार यांनी आपल्या धोरणांमध्ये पुरोगामी विचारसरणीचा अवलंब करताना सामाजिक समावेशकता आणि विकासाभिमुखता यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला.



कृषी आणि सहकार क्षेत्रातील त्यांच्या धोरणांकडे पाहिल्यास, ग्रामीण अर्थव्यवस्थेला सक्षम करण्यासाठी त्यांनी संस्थात्मक यंत्रणा उभारण्यावर भर दिला. सहकारी साखर कारखाने, दूध संघ आणि कृषी प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्पादनापासून विपणनापर्यंत साखळीमध्ये सक्रिय सहभाग मिळवून दिला. या प्रक्रियेमुळे ग्रामीण समाजात आर्थिक लोकशाहीची संकल्पना दृढ झाली. याबाबत य.दी.फडके यांनी महाराष्ट्रातील सहकार चळवळीला 'लोकसहभागातून उभा राहिलेला आर्थिक विकासाचा पर्याय' असे संबोधले आहे.[११] धर्मनिरपेक्षतेच्या बाबतीत मा. शरदचंद्र पवार यांनी संतुलित आणि समन्वयात्मक भूमिका घेतली. विविध धर्मीय आणि सामाजिक गटांमध्ये संवाद आणि सहअस्तित्वाची भावना निर्माण करण्यासाठी त्यांनी राजकीय स्तरावर समावेशकतेचा आग्रह धरला. इतिहास अभ्यासक गेल ओमवेट यांच्या मते, महाराष्ट्रातील पुरोगामी राजकारणाची एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे सामाजिक चळवळी आणि राजकीय नेतृत्व यांमधील परस्परसंवाद होय. या प्रक्रियेत मा. शरदचंद्र पवार यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरते.[१२] महिलांच्या सक्षमीकरणाच्या संदर्भातही त्यांच्या धोरणांमध्ये पुरोगामी दृष्टिकोन दिसतो. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेले प्रतिनिधित्व आणि स्वयं-सहाय्य गटांना दिलेले प्रोत्साहन यामुळे महिलांचा सामाजिक व आर्थिक सहभाग वाढला. या संदर्भात भालचंद्र मुणगेकर यांनी नमूद केले आहे की, "ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे हे दीर्घकालीन सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक आहे."[१३]

तथापि, या धोरणांचे मूल्यमापन करताना काही मर्यादाही लक्षात घेणे आवश्यक आहे. सहकार क्षेत्रातील राजकीय हस्तक्षेप, संसाधनांचे असमान वितरण आणि धोरणांच्या अंमलबजावणीतील तफावत या समस्या अधूनमधून दिसून येतात. तरीही, एकूणच पाहता मा. शरदचंद्र पवार यांच्या धोरणांनी पुरोगामी मूल्यांना व्यवहारिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारे त्यांच्या कार्यातून पुरोगामी विचारसरणीचा केवळ सैद्धांतिक नव्हे, तर प्रत्यक्ष सामाजिक आणि आर्थिक प्रक्रियेत प्रतिबिंबित झालेला परिणाम दिसून येतो, जो महाराष्ट्राच्या आधुनिक विकास प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरतो.

मा. शरदचंद्र पवार यांच्या धोरणांचा सामान्य जनतेवर झालेल्या परिणामांची चिकित्सा:

मा. शरदचंद्र पवार यांच्या राजकीय आणि प्रशासकीय धोरणांचा परिणाम केवळ संस्थात्मक पातळीवर मर्यादित न राहता तो सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनावरही प्रकर्षाने दिसून येतो. मा. शरदचंद्र पवार यांच्या कार्याचा अभ्यास करताना ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकरी वर्ग, महिला आणि वंचित घटक यांच्यावर झालेल्या परिणामांचा बहुआयामी विचार करणे आवश्यक ठरते. सर्वप्रथम, सहकार चळवळीच्या विस्तारामुळे ग्रामीण भागात आर्थिक क्रियाशीलतेला चालना मिळाली. साखर सहकारी संस्था, दूध संघ आणि पतसंस्था यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्पादनासाठी आवश्यक भांडवल, तांत्रिक मदत आणि बाजारपेठ उपलब्ध झाली. यामुळे शेतकरी केवळ उत्पादक न राहता तो आर्थिक प्रक्रियेतील भागीदार बनला. या संदर्भात श्री. शरद जोशी यांनी नमूद केले आहे की, सहकार चळवळीने शेतकऱ्यांना संघटित शक्ती प्रदान केली, जरी तिच्या मर्यादाही नाकारता येत नाहीत.[१४] दुसऱ्या बाजूला, शिक्षणाच्या प्रसारामुळे सामाजिक गतिशीलता वाढली. ग्रामीण भागात महाविद्यालये आणि व्यावसायिक शिक्षण संस्थांच्या वाढीमुळे मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली. आंद्रे बेतेली यांच्या मते, शिक्षण ही सामाजिक समतेकडे नेणारी एक महत्त्वाची प्रक्रिया आहे, आणि महाराष्ट्रातील शिक्षण विस्ताराने या प्रक्रियेला गती दिली आहे.[१५]

मा. शरदचंद्र पवार यांच्या महिलांविषयक धोरणामुळे महिलांच्या सक्षमीकरणाच्या बाबतीतही सकारात्मक परिणाम दिसून आले. स्वयं-सहाय्य गट, बचत गट आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधित्व यामुळे महिलांचा आर्थिक आणि सामाजिक सहभाग वाढला. त्यामुळे त्यांच्या निर्णयक्षमतेत आणि आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली. तथापि, या प्रक्रियेत काही मर्यादाही स्पष्टपणे दिसून येतात. सहकार संस्थांमध्ये वाढलेला राजकीय हस्तक्षेप, संसाधनांचे असमान वितरण आणि काही वेळा धोरणांची अपूर्ण अंमलबजावणी यामुळे अपेक्षित परिणाम सर्व स्तरांपर्यंत समान प्रमाणात पोहोचले नाहीत. श्री.अतुल कोहली यांच्या मते, भारतातील प्रादेशिक विकास प्रक्रियेत राज्याच्या हस्तक्षेपाची प्रभावीता ही अंमलबजावणीच्या गुणवत्तेवर अवलंबून असते.[१६] यामुळे असे दिसून येते की मा. शरदचंद्र पवार यांच्या धोरणांनी महाराष्ट्रातील सामाजिक आणि आर्थिक विकासाला निश्चितच चालना दिली, परंतु त्या प्रक्रियेत काही संरचनात्मक आणि व्यवस्थात्मक मर्यादाही राहिल्या. त्यामुळे त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना सकारात्मक परिणामांसोबतच या मर्यादांचा विचार करणे आवश्यक ठरते.

मा. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाचे चिकित्सक मूल्यमापन:

महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेच्या संदर्भात मा. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाचे मूल्यमापन करताना विविध राजकीय, सामाजिक आणि बौद्धिक विचारवंतांच्या मतांचा विचार करणे आवश्यक ठरते. मा. शरदचंद्र पवार यांच्या कार्याबाबत एकसंध मतप्रवाह न आढळता, विविध अंगांनी केलेले मूल्यांकन दिसून येते, जे त्यांच्या नेतृत्वाच्या बहुआयामी स्वरूपाचे द्योतक आहे. मा. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वातील व्यवहारज्ञान आणि सत्तासंतुलन राखण्याच्या क्षमतेवर अनेक अभ्यासकांनी विशेष भर दिला आहे. डॉ.सुहास पळशीकर यांच्या मते, महाराष्ट्राच्या राजकारणात पवार हे 'सामाजिक आघाड्यांचे संतुलन राखणारे आणि विविध घटकांना

एकत्र आणणारे' नेतृत्व आहे.[१७] त्यांच्या या भूमिकेमुळे राज्यात सामाजिक तणाव कमी ठेवण्यास मदत झाली, असेही ते नमूद करतात. तसेच प्रताप भानू मेहता यांनी भारतीय प्रादेशिक राजकारणाच्या संदर्भात पवार यांच्या नेतृत्वाचा उल्लेख करताना त्यांच्या व्यवहारकुशलतेला आणि परिस्थितीनुरूप धोरण आखण्याच्या क्षमतेला विशेष महत्त्व दिले आहे.[१८] त्यांच्या मते, पवार यांचे राजकारण हे तात्त्विक विचारसरणी आणि व्यवहारिक राजकारण यांचा संतुलित संगम दर्शवते.



मराठी साहित्यातील काही अभ्यासकांनी पवार यांच्या कार्यातील सहकार चळवळीच्या योगदानावर भर दिला आहे. जी.पी.देशपांडे यांनी नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील सहकार चळवळ ही केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया होती, आणि त्या प्रक्रियेत मा. शरद पवार यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.[१९] तथापि, काही समीक्षकांनी त्यांच्या कार्यातील मर्यादांकडेही लक्ष वेधले आहे. ख्रिस्तोफ जेफरलॉट यांच्या मते, भारतातील प्रादेशिक राजकारणात नेतृत्व अनेकदा सामाजिक गटांच्या प्रतिनिधित्वावर आधारित असले तरी ते सत्ताकेंद्रित संरचनांपासून पूर्णतः मुक्त नसते. या दृष्टीकोनातून मा. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाकडे पाहिल्यास, पुरोगामी मूल्यांच्या अंमलबजावणीत काही संरचनात्मक अडचणी दिसून येतात.

या सर्व मतांचा विचार करता असे स्पष्ट होते की, मा. शरदचंद्र पवार यांचे नेतृत्व हे केवळ एका विचारसरणीपुरते मर्यादित नसून ते बहुआयामी, व्यवहाराधिष्ठित आणि परिस्थितीनुरूप बदलणारे आहे. त्यांनी पुरोगामी परंपरेला पुढे नेण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्या प्रक्रियेत राजकीय वास्तव आणि मर्यादांचा प्रभावही स्पष्टपणे दिसून येतो. थोडक्यात, विविध विचारवंतांच्या दृष्टिकोनातून पाहता, मा. शरदचंद्र पवार यांचे नेतृत्व हे महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय प्रक्रियेला दिशा देणारे, विविध घटकांना एकत्र आणणारे आणि व्यवहारज्ञानाच्या आधारे सक्षमपणे कार्य करणारे प्रभावी नेतृत्व म्हणून अधोरेखित होते.

समारोप:

आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळ ही केवळ ऐतिहासिक वारसा नसून सतत विकसित होणारी सामाजिक आणि वैचारिक प्रक्रिया आहे. महात्मा ज्योतीराव फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवून आणलेल्या समताधिष्ठित विचारसरणीने महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय संस्कृतीला एक प्रगल्भ दिशा दिली. या परंपरेचा प्रभाव पुढील काळातील राजकीय नेतृत्वावर पडलेला असून, त्या अनुषंगाने मा. शरदचंद्र पवार यांचे कार्य विशेषत्वाने अभ्यासनीय ठरते. मा. शरदचंद्र पवार यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा सखोल विचार करता, त्यांच्या नेतृत्वात पुरोगामी मूल्यांचा सातत्यपूर्ण प्रभाव दिसून येतो. सहकार चळवळीचा विस्तार, कृषी विकासाला दिलेले प्राधान्य, शिक्षणाच्या संधींचा विस्तार आणि विविध

सामाजिक घटकांचा समावेश करण्याची प्रवृत्ती या माध्यमातून त्यांनी सामाजिक न्याय आणि समावेशकतेला चालना दिली. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला संस्थात्मक बळकटी मिळाली आणि अनेक वंचित घटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी प्राप्त झाली. तथापि, या प्रक्रियेचे मूल्यांकन करताना काही मर्यादाही अधोरेखित करणे आवश्यक ठरते. सहकार क्षेत्रातील सत्ताकेंद्रित प्रवृत्ती, विकासातील प्रादेशिक असमतोल आणि धोरणांच्या अंमलबजावणीतील तफावत या बाबी पूर्णतः दूर झालेल्या नाहीत. त्यामुळे पुरोगामी विचारसरणी आणि व्यवहारातील राजकारण यामधील अंतर अधूनमधून स्पष्टपणे जाणवते.

सारांशत: असे म्हणता येते की मा. शरदचंद्र पवार यांचे कार्य हे महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेचा एक महत्त्वपूर्ण आणि प्रभावी टप्पा आहे. त्यांनी विचार आणि कृती यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती मिळाली. तथापि, या प्रक्रियेचे पूर्णत्व साधण्यासाठी सतत प्रयत्नांची आवश्यकता आहे. आधुनिक महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळ आणि मा. शरदचंद्र पवार यांचे नेतृत्व यांचा अभ्यास केवळ भूतकाळाचे विश्लेषण नसून, भविष्यातील सामाजिक-राजकीय दिशादर्शनासाठीही उपयुक्त ठरतो.

संदर्भ:

1. फुले, ज्योतिराव, *गुलामगिरी*, पुणे, १८७३, पृष्ठ क्र. ४५.
2. Keer, Dhananjay, Shahu Chhatrapati: A Royal Revolutionary, Popular Prakashan, Mumbai, 1976, Page no. 112.
3. Dr. Ambedkar, B. R., Annihilation of Caste: The Annotated Critical Edition, Navayana Publishing Pvt. Ltd., New Delhi, 2014, Page no. 76.
4. फडके, य. दि., *महाराष्ट्रातील सहकार चळवळ*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००७, पृष्ठ क्र. १३२.
5. Deshpande, S., Industrial Labour Movement in India, Oxford University Press, New Delhi, 2004, Page No. 98.
6. Omvet, Gail, Cultural Revolt in a Colonial Society: The Non-Brahman Movement in Western India, 1873–1930, Manohar Publishers, New Delhi, 2012, Page no. 156.
7. Government of Maharashtra, Report on Panchayati Raj Institutions, Mumbai, 2015, Page no. 67.
8. फडके, य. दि., *महाराष्ट्रातील सहकार चळवळ*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००७, पृष्ठ क्र. १८९.
9. पवार, शरदचंद्र, *लोक माझे सांगाती*, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २०१५, पृष्ठ क्र. १४२.
10. कांडके, राम, *शरद पवार : एक राजकीय चरित्र*, डायमंड प्रकाशन, पुणे, २०१८, पृष्ठ क्र. ९६.
11. फडके, य. दि., *महाराष्ट्रातील सहकार चळवळ*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००७, पृष्ठ क्र. २१०.
12. Omvet, Gail, Cultural Revolt in a Colonial Society, Manohar Publishers, New Delhi, 2012, Page no.178.

13. Mungekar, Bhalchandra, Indian Economy and Social Justice, Academic Foundation, New Delhi, 2005, p. 134.
14. जोशी, शरद, *शेतकरी संघटना आणि कृषी धोरण*, पुणे, २००१, पृष्ठ क्र. ८८.
15. Beteille, Andre, Society and Politics in India, Oxford University Press, New Delhi, 1991, Page no. 142.
16. Kohli, Atul, State-Directed Development, Cambridge University Press, New York, 2004, Page no. 215.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

पद्मविभूषण श्री शरदचंद्र पवार यांचे कृषी क्षेत्रातील योगदान : एक विश्लेषणात्मक अभ्यास

कु. रेश्मा चांगदेव निकम

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

मुधोजी महाविद्यालय फलटण ता.फलटण जि.सातारा

***Corresponding Author* - कु. रेश्मा चांगदेव निकम**

DOI - 10.5281/zenodo.23524344

सारांश:

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे कारण देशातील मोठा लोकसंख्या वर्ग शेतीवर अवलंबून आहे. या संशोधनाचा उद्देश भारतातील कृषी धोरणांचा अभ्यास करून शेतकऱ्यांच्या प्रमुख समस्यांचे विश्लेषण करणे आणि पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाचे मूल्यांकन करणे हा आहे. विविध धोरणांमुळे उत्पादनात वाढ झाली असली तरी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नाही. त्यामुळे धोरणांची परिणामकारकता आणि मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे.

प्रस्तावना:

भारत हा कृषीप्रधान देश असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया शेती आहे. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात कृषी क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा असून रोजगारनिर्मितीत त्याची भूमिका मोठी आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने कृषी विकासासाठी विविध धोरणे स्वीकारली. हरित क्रांती, सिंचन प्रकल्प, किमान आधारभूत किंमत (MSP) आणि कृषी बाजार सुधारणा यांसारख्या उपाययोजनांमुळे उत्पादनात वाढ झाली.

कृषी क्षेत्र अनेक अडचणींनी ग्रस्त आहे. उत्पादन खर्च वाढ, हवामानातील अनिश्चितता, कर्जबाजारीपणा आणि बाजारातील अस्थिरता यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अस्थिर राहते. त्यामुळे कृषी धोरणांचा प्रभाव समजून घेणे आवश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार यांच्या योगदानाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

उद्दिष्टे:

1. भारतातील कृषी धोरणांचा अभ्यास करणे.
2. शेतकऱ्यांच्या समस्यांचे विश्लेषण करणे.
3. शरदचंद्रजी पवार यांच्या योगदानाचे मूल्यांकन करणे.
4. कृषी धोरणांचा परिणाम समजून घेणे.

संशोधन पद्धती:

या संशोधनासाठी द्वितीयक माहितीचा वापर करण्यात आला आहे. पुस्तके, सरकारी अहवाल आणि अधिकृत संकेतस्थळांवरील माहितीचा अभ्यास करण्यात आला आहे. वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतींचा वापर करून विषय मांडला आहे.

भारतातील कृषी धोरणे:

१) हरित क्रांती:

हरित क्रांतीमुळे भारतात अन्नधान्य उत्पादनात मोठी वाढ झाली. उच्च उत्पादनक्षम बियाणे, रासायनिक खते आणि सिंचन यामुळे उत्पादनक्षमता वाढली. अन्नटंचाई कमी झाली आणि देश आत्मनिर्भर झाला. मात्र या प्रक्रियेमुळे मातीची गुणवत्ता कमी झाली आणि पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे उत्पादनवाढ झाली असली तरी दीर्घकालीन परिणाम नकारात्मक ठरू शकतात.

२) MSP किमान आधारभूत किंमत:

MSP प्रणाली शेतकऱ्यांना किमान हमीभाव देते. यामुळे किंमत घसरणीपासून संरक्षण मिळते. उत्पादनासाठी प्रोत्साहन मिळते. परंतु सर्व शेतकऱ्यांना MSP चा लाभ मिळत नाही. खरेदी व्यवस्था मर्यादित आहे. त्यामुळे धोरण प्रभावी असले तरी त्याची अंमलबजावणी अपुरी आहे.

३) सिंचन आणि पायाभूत सुविधा:

सिंचन प्रकल्पांमुळे शेती स्थिर झाली आणि वर्षातून अधिक पिके घेणे शक्य झाले. रस्ते आणि गोदामांमुळे बाजारपेठेत पोहोच वाढली. परंतु अनेक भागांमध्ये सिंचन सुविधा अजूनही अपुऱ्या आहेत. त्यामुळे क्षेत्रीय असमानता दिसून येते. यासाठी जलव्यवस्थापन सुधारण्याची गरज आहे.

४) बाजार सुधारणा:

APMC सुधारणा आणि डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे बाजारपेठ पारदर्शक झाली. शेतकऱ्यांना चांगले दर मिळण्याची संधी वाढली. परंतु तांत्रिक अडचणी आणि माहितीचा अभाव यामुळे सर्व शेतकरी याचा लाभ घेऊ शकत नाहीत. त्यामुळे सुधारणा असूनही पूर्ण परिणाम दिसत नाही.

शेतकऱ्यांच्या समस्या:

१) कर्जबाजारीपणा:

भारतातील अनेक शेतकरी उत्पादनासाठी आवश्यक भांडवल मिळवण्यासाठी कर्जावर अवलंबून असतात. बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरी यांचा खर्च वाढत असल्यामुळे कर्जाचे प्रमाण वाढते. उत्पन्न अनिश्चित असल्यामुळे कर्जाची परतफेड करणे कठीण जाते. अनेक वेळा शेतकरी खासगी सावकारांकडून उच्च व्याजदराने कर्ज घेतात. त्यामुळे आर्थिक ताण अधिक वाढतो. कर्जबाजारीपणा हा शेतकऱ्यांच्या अस्थिर आर्थिक स्थितीचे प्रमुख कारण आहे.

२) हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्ती:

हवामानातील अनिश्चितता ही शेतीसाठी मोठे आव्हान बनली आहे. अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर आणि गारपीट यांसारख्या घटनांमुळे पिकांचे नुकसान होते. पावसावर अवलंबून असलेल्या भागांमध्ये ही समस्या अधिक गंभीर आहे. हवामान बदलामुळे उत्पादनाचे नियोजन करणे कठीण होते. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अस्थिर राहते. नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक नुकसान वाढते.

३) बाजारभावातील अस्थिरता:

शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी स्थिर आणि योग्य दर मिळत नाही. बाजारातील मागणी आणि पुरवठ्यानुसार दर सतत बदलत राहतात. पीक तयार झाल्यावर दर घसरल्यास शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागते. मध्यस्थांमुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बाजारभावाचा फायदा मिळत नाही. MSP असली तरी सर्व पिकांसाठी प्रभावी खरेदी होत नाही. त्यामुळे उत्पन्न अनिश्चित राहते.

४) सिंचन आणि पाण्याची कमतरता:

भारतामध्ये अजूनही मोठ्या प्रमाणावर शेती पावसावर अवलंबून आहे. सिंचन सुविधांचा अभाव असल्यामुळे पिकांचे उत्पादन हवामानावर अवलंबून राहते. अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई जाणवते. जलव्यवस्थापनाची कमतरता आणि पाण्याचा अपव्यय ही समस्या अधिक गंभीर बनवतात. यामुळे शेतीची उत्पादकता कमी राहते. स्थिर पाणीपुरवठा नसल्यामुळे शेतकऱ्यांना धोका वाढतो.

५) तंत्रज्ञान आणि शिक्षणाचा अभाव:

आधुनिक शेतीसाठी आवश्यक तंत्रज्ञान आणि ज्ञान सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेले नाही. सुधारित बियाणे, यंत्रसामग्री आणि सिंचन तंत्रज्ञानाचा वापर मर्यादित आहे. लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना हे तंत्रज्ञान परवडत नाही. प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाची कमतरता आहे. त्यामुळे उत्पादनक्षमता अपेक्षित प्रमाणात वाढत नाही. तंत्रज्ञानाचा अभाव ही मोठी अडचण आहे

६) साठवणूक आणि वाहतूक सुविधा अपुरी:

शेतकऱ्यांकडे उत्पादन साठवण्यासाठी पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत. गोदामे आणि कोल्ड स्टोरेजची कमतरता असल्यामुळे अन्नधान्याची नासाडी होते. योग्य साठवणूक नसल्यामुळे शेतकऱ्यांना लगेचच पिक विकावे लागते, जरी दर कमी असले तरी. वाहतूक सुविधांच्या अभावामुळे बाजारपेठेत पोहोचणे कठीण जाते. यामुळे शेतकऱ्यांचा नफा कमी होतो.

७) जमीनधारणा लहान असणे:

भारतातील बहुतेक शेतकरी लहान किंवा सीमांत जमीनधारक आहेत. लहान जमिनीवर उत्पादन मर्यादित राहते. मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण करणे शक्य होत नाही. उत्पन्न कमी असल्यामुळे खर्च भागवणे कठीण जाते. त्यामुळे आर्थिक स्थिरता साधणे अवघड होते. ही संरचनात्मक समस्या आहे.

पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार यांचे कृषी क्षेत्रातील योगदान:

१) अन्नधान्य उत्पादन वाढ व अन्नसुरक्षा:

केंद्रीय कृषी मंत्री म्हणून (2004–2014) शरदचंद्रजी पवार यांनी देशातील अन्नधान्य उत्पादन वाढवण्यावर विशेष भर दिला. त्यांच्या कार्यकाळात गहू आणि तांदूळ उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. भारताने विक्रमी अन्नधान्य उत्पादन नोंदवले. अन्नसाठा वाढवून सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी (PDS) पुरवठा मजबूत करण्यात आला.

२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (NFSM):

त्यांच्या नेतृत्वाखाली National Food Security Mission प्रभावीपणे राबवण्यात आले. या योजनेत गहू, तांदूळ आणि कडधान्य उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात आला. सुधारित बियाणे, खतांचा योग्य वापर आणि आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात आले. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत झाली.

३) बागायती क्षेत्राचा विकास (NHM):

National Horticulture Mission अंतर्गत फळे, भाजीपाला आणि फुलशेतीला प्रोत्साहन देण्यात आले. शेतकऱ्यांना पारंपरिक पिकांव्यतिरिक्त पर्यायी उत्पन्नाचे साधन मिळाले. बागायती पिकांमुळे उत्पन्न वाढीस मदत झाली. कृषी क्षेत्रात विविधता निर्माण झाली.

४) सहकारी क्षेत्राचा विस्तार (साखर उद्योग):

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांच्या वाढीस शरदचंद्रजी पवार यांनी चालना दिली. सहकारी संस्थांद्वारे शेतकऱ्यांना प्रक्रिया सुविधा, कर्ज आणि

बाजारपेठ उपलब्ध झाली. ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती झाली. सहकार चळवळीमुळे स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत झाली.

५) कृषी कर्ज आणि वित्तीय सुविधा वाढ:

त्यांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या कृषी कर्जाचे प्रमाण वाढविण्यात आले. राष्ट्रीयीकृत बँका आणि सहकारी संस्थांमार्फत कर्ज सुलभ करण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांना बियाणे, खत आणि इतर इनपुटसाठी भांडवल मिळाले. उत्पादनवाढीसाठी आर्थिक आधार मिळाला.

६) किमान आधारभूत किंमत (MSP) वाढवणे:

शरदचंद्रजी पवार यांनी विविध पिकांसाठी MSP दर वाढविण्यावर भर दिला. विशेषतः गहू आणि तांदूळ उत्पादकांना याचा फायदा झाला. शेतकऱ्यांना किमान हमीभाव मिळाल्यामुळे उत्पादनासाठी प्रोत्साहन मिळाले. किंमत घसरणीपासून काही प्रमाणात संरक्षण मिळाले.

७) साठवणूक व कोल्ड स्टोरेज सुविधा विकास:

अन्नधान्य आणि नाशवंत उत्पादनांच्या साठवणुकीसाठी गोदामे आणि कोल्ड स्टोरेज उभारणीवर भर देण्यात आला. यामुळे अन्नधान्याची नासाडी कमी करण्यास मदत झाली. शेतकऱ्यांना उत्पादन साठवून योग्य वेळी विक्री करता येऊ लागली. पुरवठा साखळी सुधारण्यास हातभार लागला.

८) कृषी संशोधन व तंत्रज्ञानाचा प्रसार:

कृषी संशोधन संस्था आणि कृषी विद्यापीठांना प्रोत्साहन देण्यात आले. सुधारित बियाणे, सिंचन तंत्रज्ञान आणि आधुनिक शेती पद्धतींचा प्रसार करण्यात आला. शेतकऱ्यांना प्रशिक्षणाद्वारे नवीन तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली. उत्पादनक्षमता वाढवण्यात या उपाययोजनांचा उपयोग झाला.

निष्कर्ष:

कृषी धोरणांनी प्रगती साधली आहे, परंतू समस्या कायम आहेत. शरदचंद्रजी पवार यांचे योगदान महत्त्वाचे आहे. भविष्यात प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे.

संदर्भसूची:

1. Dutt, R. & Sundaram, K. (Latest Edition). Indian Economy.
2. Mishra, S.K. & Puri, V.K. (Latest Edition). Agricultural Economics.
3. Uma Kapila (Ed.). Indian Economy: Performance and Policies.
4. Ramesh Singh. Indian Economy.
5. Ashok Gulati. Agricultural Policies in India.
6. Ministry of Agriculture and Farmers Welfare. Annual Reports.
7. Government of India. Economic Survey (Various Years).
8. NABARD. Annual Reports.
9. Reserve Bank of India. Reports on Agriculture.
10. NITI Aayog. Agriculture Reports.
11. Food and Agriculture Organization. India Agriculture Reports.
12. World Bank. Agriculture Data & Reports.
13. Press Information Bureau. Agriculture Policy Releases.
14. Indian Council of Agricultural Research. Research Publications.
15. Commission for Agricultural Costs and Prices. MSP Reports

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

शरद पवार आणि पुलोद प्रयोग: महाराष्ट्रातील राजकारणातील विश्लेषण

प्रो. डॉ. दत्तात्रय मारुती काळेल[1], प्रा.संजय साहेबराव जगदाळे[2]

[1]विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग,

कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा ता. माढा, जि. सोलापूर

[2]सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग,

दहिवडी कॉलेज, दहिवडी ता. माण, जि. सातारा

***Corresponding Author* - प्रो. डॉ. दत्तात्रय मारुती काळेल**

DOI - 10.5281/zenodo.23524362

सारांश:

महाराष्ट्राच्या संसदीय आणि राजकीय इतिहासामध्ये १८ जुलै १९७८ हा दिवस केवळ एका सत्तांतराचा प्रसंग म्हणून मर्यादित नसून, तो प्रस्थापित एकपक्षीय वर्चस्ववादी संरचनेला दिलेल्या आव्हानाचा आणि पर्यायी शासनप्रणालीच्या उदयाचा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज मानला जातो. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील 'पुरोगामी लोकशाही दल' (पुलोद) या प्रयोगाचे विश्लेषण महाराष्ट्रातील प्रथम यशस्वी 'आघाडी सरकार' (Coalition Government) म्हणून केले जाते. ज्या कालखंडात राज्यावर एकाच राजकीय पक्षाचे निर्विवाद वर्चस्व असणे हे सर्वमान्य तत्त्व होते, त्या परंपरेला पुलोदच्या माध्यमातून छेद देण्यात आला.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये १९७५ च्या आणीबाणीनंतर उद्भवलेल्या राजकीय अस्थिरतेचा, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधील संस्थात्मक विभाजनाचा आणि विविध विचारसरणींच्या राजकीय ध्रुवांना एका किमान समान कार्यक्रमावर एकत्रित करण्याच्या धोरणात्मक कौशल्याचा सविस्तर ऊहापोह करण्यात आला आहे. समाजवादी, डावे, रिपब्लिकन आणि जनसंघ यांसारख्या परस्परविरोधी विचारप्रवाहांना एका प्रशासकीय चौकटीत समाविष्ट करणे, हे या प्रयोगाचे एक अद्वितीय वैशिष्ट्य मानले जाते. या प्रबंधात पुलोदच्या निर्मिती प्रक्रियेपासून ते १९८० मधील संवैधानिक अधिकारांच्या आधारे करण्यात आलेल्या बरखास्तीपर्यंतच्या घटनाक्रमाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच, सदर ऐतिहासिक संदर्भाचे वर्तमानकालीन 'महाविकास आघाडी'सारख्या जटिल राजकीय प्रयोगांशी असलेले साधर्म्य आणि महाराष्ट्रातील 'आघाडी संस्कृती'चा आधारस्तंभ म्हणून असलेले महत्त्व यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

परिचय:

महाराष्ट्राच्या स्थापनेपासून १९६० राज्याच्या राजकीय पटलावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एकछत्री वर्चस्व प्रस्थापित होते. प्रारंभीच्या दशकात यशवंतराव चव्हाण यांनी प्रतिपादन केलेल्या 'बहुजन समाज' आणि 'सहकार' प्रारूपाद्वारे काँग्रेसची पाळेमुळे ग्रामीण स्तरावर सुदृढ करण्यात आली होती. या संरचनेद्वारे केवळ राजकीय सत्ता संपादन केली गेली नाही, तर सहकारीसाखर कारखाने, दूध उत्पादक संस्था आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांसारख्या संस्थात्मक

यंत्रणांद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि पर्यायाने जनमतावर पक्षाचे नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले होते. तथापि, १९७५ मध्ये राष्ट्रीय स्तरावर घोषित करण्यात आलेली आणीबाणी ही लोकशाही मूल्यांच्या संदर्भात एक स्थित्यंतरकारी घटना ठरली, ज्याने काँग्रेसच्या या अभेद्य मानल्या जाणाऱ्या दुर्गाला तडे दिले. आणीबाणीच्या कालखंडातील प्रशासकीय अधिकारांच्या कथित गैरवापरामुळे जनमानसात निर्माण झालेल्या असंतोषाचे प्रतिबिंब राजकीय परिवर्तनात दिसून आले.

सन १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील सत्तेचा पराभव झाला आणि केंद्रात जनता पक्षाच्या शासनाचा उदय झाला. या परिवर्तनाचे परिणाम केवळ राष्ट्रीय राजधानीपुरते मर्यादित न राहता त्यांचे पडसाद महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात उमटणे अपरिहार्य होते. याच काळात शरद पवार या तरुण आणि प्रशासकीय दृष्टीने प्रगल्भ नेतृत्वाचा उदय झाला. यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय विचारसरणीचे वारसदार मानले जाणारे पवार यांनी संघटनात्मक बांधणीमध्ये विशेष प्राविण्य संपादन केले होते. वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी त्यांनी प्रस्थापित आणि ज्येष्ठ नेतृत्वाच्या राजकीय मांडणीला आव्हान देण्याचे धाडस केले. पुलोदच्या प्रयोगाद्वारे महाराष्ट्राला केवळ सर्वात तरुण मुख्यमंत्री लाभला नाही, तर 'बिगर-काँग्रेस' विशेषतः इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसविरोधी सत्तास्थापनेचे एक नाविन्यपूर्ण प्रारूपही प्रस्तुत करण्यात आले.

अभ्यासाची पार्श्वभूमी:

सन १९७७ च्या ऐतिहासिक लोकसभा निवडणुकीतील परिवर्तनानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये वैचारिक आणि नेतृत्वाच्या मुद्यावरून गंभीर स्वरूपाचे विभाजन घडून आले. एका बाजूला इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील 'काँग्रेस (I)' आणि दुसऱ्या बाजूला ब्रह्मानंद रेड्डी व यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील 'काँग्रेस (S)' असे दोन स्पर्धात्मक गट निर्माण झाले. सन १९७८ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये या दोन्ही गटांनी परस्परांविरुद्ध निवडणूक लढविली, ज्याचे पर्यवसान त्रिशंकू विधानसभेमध्ये झाले. कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त न झाल्याने राज्यात राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला.

सदर परिस्थितीत, केंद्रात सत्तेत असलेल्या जनता पक्षाला प्रतिबंध करण्यासाठी आणि राजकीय अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी दोन्ही काँग्रेस गटांनी अनिवार्यपणे सहमती दर्शविली आणि वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सरकार स्थापन झाले. या मंत्रिमंडळात नाशिकराव तिरपुडे काँग्रेस-I यांची उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. तथापि, सदर सरकारची रचना सुरुवातीपासूनच वैचारिक विसंगतींनी युक्त होती. उपमुख्यमंत्री तिरपुडे यांची आक्रमक भूमिका आणि त्यांनी यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वावर केलेली प्रखर टीका, यामुळे काँग्रेस (S) गटामध्ये, विशेषतः शरद पवारांच्या समर्थकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता.

सत्तेचे समान वाटप, जिल्हा स्तरावरील नियोजनाचे अधिकार आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये होणारी अडवणूक, यामुळे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गट सरकारमध्ये सहभागी असूनही अस्वस्थ होता. ही अस्वस्थता केवळ सत्ताकांक्षेपोटी नसून ती राजकीय स्वायत्तता आणि अस्मितेच्या रक्षणासाठी होती. केंद्रातील जनता पक्षानेही महाराष्ट्रातील या अंतर्गत संघर्षाचा लाभ घेत काँग्रेसच्या वर्चस्वाला आव्हान

देण्याची भूमिका घेतली होती. या सर्व राजकीय अस्थिरतेतून आणि अविश्वासाच्या वातावरणातून 'पुलोद' या आघाडीच्या निर्मितीसाठी पोषक पार्श्वभूमी तयार झाली.

समस्या मांडणी:

ज्या कालखंडात एकाच वैचारिक पार्श्वभूमीचे दोन पक्ष (काँग्रेसचे दोन गट) स्थिर शासन प्रदान करण्यास असमर्थ ठरले, त्या परिस्थितीत परस्परविरोधी विचारप्रणालीचे पक्ष (उदा. समाजवादी, डावे आणि जनसंघ घटक असलेला जनता पक्ष) एकत्रितपणे शासन प्रक्रिया कशी राबवू शकतात, हा या अभ्यासाचा मुख्य शोधविषय आहे. पुलोदच्या मंत्रिमंडळात शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) सारखा कट्टर डाव्या विचारांचा पक्ष आणि जनता पक्षातील जनसंघ घटक यांचे एकत्र येणे, हे एक राजकीय कुतूहलाचे केंद्र ठरले.

आणीबाणीनंतर मतदारांमध्ये असलेल्या काँग्रेसविरोधी लाटेचा आणि केंद्रातील जनता पक्षाच्या वाढत्या प्रभावाचा समन्वय साधणे हे एक जटिल आव्हान होते. शरद पवारांसमोर आपल्या मर्यादित आमदार संख्येच्या (३८) आधारे व्यापक पाठबळ असलेल्या विरोधी पक्षांशी जुळवून घेत काँग्रेस (I) च्या विस्ताराला रोखण्याचे उद्दिष्ट होते. सदर सरकार केवळ सत्तेच्या समीकरणांपुरते मर्यादित होते की महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे एक पर्यायी प्रारूप होते, हे या समस्या मांडणीचे केंद्र आहे.

संशोधन प्रश्न:

१. शरद पवार यांनी अल्प आमदार संख्येच्या जीवावर १७७ आमदारांचे समर्थन असलेल्या 'पुलोद'ची रचना कोणत्या धोरणात्मक मुत्सद्दीपणाद्वारे केली?
२. पुलोद सरकारने कार्यान्वित केलेले निर्णय, विशेषतः 'रोजगार हमी योजना' आणि ग्रामीण विकास प्रारूप, महाराष्ट्राच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी किती अंशी सहाय्यक ठरले?
३. वैचारिक भिन्नता असूनही शरद पवार आणि एस. एम. जोशी यांच्यासारख्या धुरिणांनी हे शासन टिकवून धरण्यात कशा प्रकारे यश मिळविले?
४. १९८० मधील शासन बरखास्तीनंतर राज्याच्या राजकारणात कोणत्या नवीन प्रवृत्तींचा उगम झाला?
५. पुलोदच्या प्रयोगाचा वारसा वर्तमानकालीन आघाडी राजकारणामध्ये (उदा. महाविकास आघाडी) किती प्रमाणात प्रतिबिंबित होतो?

उद्दिष्टे:

1. राजकीय विश्लेषण: सन १९७८ च्या सत्तांतरामागील मूळ कारणे आणि त्यातील धोरणात्मक चालींचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणे.
2. नेतृत्व अभ्यास: शरद पवार यांच्या प्रारंभिक कार्यकाळातील नेतृत्व शैली आणि त्यांच्या निर्णयप्रक्रियेचे विश्लेषण करणे.
3. आघाडी राजकारण: भिन्न विचारसरणीच्या पक्षांद्वारे 'किमान समान कार्यक्रमा'ची अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेचे परीक्षण करणे.

4. घटनात्मक पैलू: सन १९८० मध्ये संविधानातील कलम ३५६ चा वापर करून करण्यात आलेल्या शासन बरखास्तीचे कायदेशीर आणि राजकीय विश्लेषण करणे.
5. ऐतिहासिक दस्तऐवाजीकरण: पुलोद मधील घटक पक्ष आणि त्यांच्या नेत्यांच्या ऐतिहासिक योगदानाचा आढावा घेणे.

साहित्य समीक्षा:

पुलोद प्रयोगाच्या संदर्भात अनेक समकालीन राजकीय विश्लेषक आणि पत्रकारांनी सविस्तर लेखन केले आहे, ज्यातून या ऐतिहासिक घटनेच्या बहुआयामी स्वरूपावर प्रकाश पडतो. 'बीबीसी मराठी'द्वारे सदर प्रयोगाचे वर्णन "महाराष्ट्राच्या राजकीय अभियांत्रिकीचा प्रथम आणि सर्वाधिक प्रभावी नमुना" असे करण्यात आले आहे. हे 'अभियांत्रिकी' केवळ संख्यात्मक नसून ते परस्परविरोधी विचारधारांना एकाच प्रशासकीय आराखड्यात समाकलित करण्याचे कसब होते. शरद पवार यांनी आपल्या 'लोक माझे सांगाती' या आत्मचरित्रात सदर बंडाच्या कारणांचे विवेचन करताना, ते केवळ सत्ताप्राप्तीसाठी नसून काँग्रेस (I) च्या दबावाखालील राजकारणाविरुद्ध घेतलेला एक "स्वायत्तता रक्षक निर्णय" असल्याचे प्रतिपादन केले आहे.

ज्येष्ठ विश्लेषक कुमार केतकर यांनी या निर्णयाचा संबंध यशवंतराव चव्हाणांच्या मुत्सद्दीपणाशी जोडला असून, चव्हाणांनी ज्या 'संमिश्र संस्कृती'ची पायाभरणी केली, तिचे हे व्यवहारिक रूप असल्याचे नमूद केले आहे. तथापि, या प्रयोगावर तीव्र टीकाही झाली असून, वसंतदादा पाटलांच्या समर्थकांकडून याला "विश्वासघाताचा" प्रसंग मानले गेले आहे. दुसरीकडे, काही अभ्यासक याला लोकशाही संस्थांच्या रक्षणासाठी घेतलेला अनिवार्य निर्णय मानतात. 'इंडियन एक्सप्रेस'च्या समकालीन दस्तऐवाजांमध्ये नाशिकराव तिरपुडे यांच्या विधानांमुळे निर्माण झालेला अविश्वास हा पुलोदच्या स्थापनेसाठी मुख्य प्रेरक घटक असल्याचे दिसून येते.

सैद्धांतिक चौकट:

हा अभ्यास मुख्यत्वे 'आघाडी राजकारणाचा सिद्धांत' आणि 'रिजनल लीडरशिप मॉडेल' या दोन सैद्धांतिक प्रारूपांच्या आधारे समजून घेता येतो. विल्यम रायकर यांच्या 'महारुद्र विनिंग कोअलिशन' सिद्धांतानुसार, राजकीय पक्ष केवळ तेवढ्याच घटकांशी सहकार्य करतात जे त्यांना बहुमताचा आकडा गाठण्यासाठी आवश्यक असतात. शरद पवारांनी आपल्या ३८ आमदारांच्या साहाय्याने जनता पक्षाच्या ९९ आमदारांसोबत केलेले समीकरण हे 'रिअलपोलिटिक' चे उत्तम उदाहरण मानले जाते.

तसेच, हा अभ्यास 'चारिस्मॅटिक लीडरशिप' (Charismatic Leadership) आणि 'कॉन्सोशिएशनल डेमोक्रसी' या सिद्धांतांच्या चौकटीतही बसतो. पवारांचे नेतृत्व केवळ सांख्यिकी बळावर आधारित नसून, ते सर्वसमावेशक दृष्टिकोनावर आधारित होते. भिन्न राजकीय ध्रुवांना (समाजवादी, जनसंघ, डावे) एकाच व्यासपीठावर आणून त्यांना सामूहिक उद्दिष्टांसाठी प्रेरित करणे, हे या सिद्धांताचे यश दर्शविते. ही सैद्धांतिक चौकट पुलोदला केवळ एक राजकीय करार न ठरवता, त्याला एक धोरणात्मक आणि शास्त्रीय आधार प्रदान करते.

पुलोद प्रयोगाचे विश्लेषण:

बंड आणि सत्तापालट:

दिनांक १८ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्राच्या राजकारणात एक अभूतपूर्व स्थित्यंतर घडून आले. वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त सरकारमधील अंतर्गत मतभेद पराकोटीला पोहोचले होते. शरद पवार यांनी आपल्या समर्थक आमदारांसह राज्यपालांकडे राजीनामा सादर केला, ज्याला संसदीय इतिहासामध्ये एका धाडसी सत्तांतराचा प्रसंग मानले जाते. शरद पवारांच्या या निर्णयाला जनता पक्षाचे ज्येष्ठ धुरिण एस. एम. जोशी यांनी त्वरित पाठिंबा दर्शविला. संख्याबळाच्या दृष्टीने जनता पक्ष हा मोठा घटक असूनही, त्यांनी एका तरुण नेत्याला मुख्यमंत्री म्हणून स्वीकारण्याची घेतलेली भूमिका, हा या प्रयोगातील एक ऐतिहासिक वळणबिंदू ठरला.

राजकीय रचना:

पक्ष	आमदार संख्या	प्रमुख नेते	सत्तेतील भूमिका
काँग्रेस (S)	३८	शरद पवार	मुख्यमंत्री पद आणि नेतृत्व
जनता पक्ष	९९	हाशू आडवाणी	प्रशासकीय सहभाग
शेकाप (PWP)	११	एन. डी. पाटील	ग्रामीण धोरणे
कम्युनिस्ट (CPI/M)	३	-	बाह्य समर्थन
रिपब्लिकन (RPI)	४	रा. सू. गवई	सामाजिक न्याय

पुलोद सरकारचे यश:

या शासनाने अल्पावधीतच 'प्रशासकीय गतिमानता' साध्य केली. 'रोजगार हमी योजना' (EGS) ला कायद्याचे स्वरूप देऊन तिची अंमलबजावणी करणे, कापूस एकाधिकार खरेदी योजनेचे सक्षमीकरण आणि मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा ऐतिहासिक ठराव, हे या सरकारचे महत्त्वपूर्ण यश मानले जाते.

अपयशाची कारणे:

सन १९८० मध्ये केंद्रात इंदिरा गांधींचे पुनरागमन झाल्यानंतर, राजकीय सूडबुद्धीने किंवा धोरणात्मक भूमिकेतून कलम ३५६ चा वापर करून १७ फेब्रुवारी १९८० रोजी पुलोद सरकार बरखास्त करण्यात आले.

निष्कर्ष:

शरद पवार यांचा पुलोद प्रयोग हा महाराष्ट्राच्या केवळ इतिहासातील एक अध्याय नसून, तो राज्याच्या राजकीय प्रयोगशाळेतील एक अत्यंत गुंतागुंतीचा आणि महत्त्वपूर्ण संशोधन विषय आहे. जरी हे शासन प्रत्यक्ष रूपाने केवळ ५८० दिवस अस्तित्वात होते, तरीही त्या अल्पशा कालावधीत त्याने महाराष्ट्राच्या राजकीय धोरणांना, प्रशासकीय कार्यपद्धतीला आणि आघाडी संस्कृतीला जी वैचारिक दिशा दिली, ती आजही राज्याच्या राजकारणात मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरते. या प्रयोगाने सिद्ध केले की, जनहिताचे प्रश्न सोडविण्यासाठी वैचारिक मतभेद बाजूला ठेवून एकत्र येणे केवळ शक्यच नाही, तर ते यशस्वी देखील होऊ शकते. या प्रयोगाचा वारसा आजही महाराष्ट्रातील सत्तेच्या

समीकरणांमध्ये आणि तळागाळातील लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या धोरणांमध्ये स्पष्टपणे प्रतिबिंबित होताना दिसतो.

संदर्भ:

1. केतकर, कु. (विविध). महाराष्ट्रातील आघाड्यांचे राजकीय विश्लेषण. सकाळ आणि लोकसत्ता संग्रहण.
2. टाइम्स ऑफ इंडिया. (१९७८, १९ जुलै). शरद पवार यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. टाइम्स ऑफ इंडिया आर्काइव्ह्स.
3. पळशीकर, सु. (२०१४). देश-प्रदेश: महाराष्ट्राच्या राजकारणाचे बदलते स्वरूप. लोकवाङ्मय गृह.
4. पवार, श. (२०१५). लोक माझे सांगाती: राजकीय आत्मकथा. राजहंस प्रकाशन.
5. भोळे, भा. ल. (२००३). महाराष्ट्राचा राजकीय इतिहास. विद्या प्रकाशन.
6. लिमये, म. (१९९०). जनता पार्टी: उदय आणि अस्त. लोकवाङ्मय गृह.
7. सरसीकर, वि. म. (१९९५). पॉलिटिक्स ऑफ मॉडर्न महाराष्ट्र. ओरिएंट लाँगमन.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

पद्मविभूषण शरदचंद्र गोविंदराव पवार : राजकीय विचारधारा आणि नेतृत्वशैली

श्री. सागर बाळकृष्ण खोत

संशोधक विदयार्थी, भाषा व वाङ्मय संकुल,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

Corresponding Author - श्री. सागर बाळकृष्ण खोत

DOI - 10.5281/zenodo.23524382

प्रस्तावना:

भारतीय राजकारणात काही नेते असे असतात की, ज्यांचे योगदान केवळ एका पक्षापुरते मर्यादित राहत नाही, तर ते संपूर्ण राजकीय प्रक्रियेला आकार देतात. शरद पवार हे असेच एक बहुआयामी नेते आहेत. त्यांनी महाराष्ट्र तसेच केंद्रातील राजकारणात दीर्घकाळ प्रभाव टाकला आहे. त्यांची राजकीय कारकीर्द १९६० च्या दशकात सुरू झाली आणि त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, तसेच विविध राजकीय आघाड्यांचे शिल्पकार म्हणून काम केले. त्यांच्या विचारधारेत स्थैर्य, लवचिकता आणि व्यावहारिकता दिसून येते. या संशोधनाचा उद्देश म्हणजे त्यांच्या राजकीय विचारधारेचे आणि नेतृत्वशैलीचे विश्लेषण करणे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) शरद पवार यांच्या राजकीय विचारधारेचे विश्लेषण करणे.

२) त्यांच्या नेतृत्वशैलीचे वैशिष्ट्ये अभ्यासणे.

३) आघाडी राजकारणातील त्यांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

४) त्यांच्या योगदान आणि मर्यादांचे समीक्षण करणे.

शरद पवार यांचा परिचय :

शरद पवारांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती येथे झाला. कोरेगाव तालुक्यातील नांदवळ हे साहेबांचे मुळगाव, शरद पवार यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव पवार आणि आईचे नाव शारदाबाई पवार आहे. गोविंदराव हे निरा कॅनॉल सहकारी सोसायटीचे बराच काळ सेक्रेटरी होते. पुढे ते बारामती येथे सुरु झालेल्या सहकारी बँकेचे पहिले व्यवस्थापक झाले. शारदाबाई या १९३८ मध्ये पुणे जिल्हा लोकल बोर्डाच्या शिक्षण समितीच्या प्रमुख होत्या. बारामतीच्या लोकसभा मतदार संघाच्या विद्यमान खासदार सौ. सुप्रिया सुळे या त्यांच्या सुकन्या आहेत. तर महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, कै.अजित पवार हे त्यांचे पुतणे आहेत.

राजकारणाच्या बाहेर, शरद पवार यांनी २००५ ते २००८ पर्यंत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष आणि २०१० ते २०१२ पर्यंत आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. ऑक्टोबर २०१३ ते जानेवारी २०१७ या कालावधीत ते मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष होते. २०१७ मध्ये, भारत

सरकारने त्यांना पद्मविभूषण हा भारताचा दुसरा-सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान केलेला आहे.

राजकारण:

इ.स.१९५६ साली ते शाळेत असताना त्यांनी गोवामुक्ती संग्रामाला पाठिंबा दर्शविण्यासाठी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला. येथून त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात झाली. त्यानंतर कॉलेजमध्ये असताना विद्यार्थी संघटनेचे नेते म्हणूनही त्यांनी काम पाहिले. विद्यार्थी संघटनेच्या एका समारंभासाठी त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना आमंत्रित केले. पवारांनी त्याप्रसंगी केलेल्या भाषणामुळे यशवंतराव चव्हाण अतिशय प्रभावीत झाले. त्यानंतर चव्हाणांच्या सांगण्यावरून पवारांनी युवक काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यशवंतराव चव्हाणांनी शरद पवार यांच्यातील सुप्त नेता हेरला आणि त्यानंतर पवार त्यांचे शिष्य बनले. त्यानंतर चव्हाणांनी त्यांच्या पुणे शहराला दिलेल्या भेटींदरम्यान पवारांना मुद्दाम भेटायला बोलावून त्यांना अनेकवेळी मार्गदर्शन केले. वयाच्या २४ व्या वर्षी ते महाराष्ट्र राज्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यानंतर यशवंतराव चव्हाणांचा राजकीय वारसदार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले.

इ.स.१९६६ साली शरद पवारांना युनेस्को शिष्यवृत्ती मिळाली. त्याअंतर्गत त्यांना पश्चिम, जर्मनी, फ्रान्स, इटली, इंग्लंड इत्यादी देशांना भेट देऊन तेथील राजकीय पक्षांचा आणि त्यांच्या पक्षबांधणी करण्याच्या पद्धतीचा जवळून अभ्यास करता आला.

राष्ट्रवादीची काँग्रेस पक्षाची स्थापना:

दिनांक १० जून इ.स. १९९९ रोजी शरद पवार यांनी त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. इ.स. १९९९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकींनंतर कोणत्याही पक्ष अथवा आघाडीस बहुमत मिळाले नाही. त्यानंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची आघाडी होऊन विलासराव देशमुख राज्याचे नवे मुख्यमंत्री झाले.

इ.स. २००४ मधील लोकसभा निवडणुकीनंतर पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केंद्रात मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारमध्ये सामील झाला. २२ मे इ.स. २००४ मध्ये शरद पवारांनी देशाचे कृषिमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. २९ मे इ.स. २००९ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांना कृषी, ग्राहकांशी संबंधित बाबी, अन्न आणि सार्वजनिक वितरण ह्या खात्यांची धुरा देण्यात आली. जुलै इ.स. २०१० मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर पक्षकार्याला अधिक वेळ देण्याची इच्छा असल्याचे सांगून पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याकडे त्यांनी आपल्यावरील कार्यभार कमी करण्याची विनंती केली.

इ.स. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी पक्षाला ५४ जागा मिळाल्या. शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस या तीन पक्षांचे मिळून महाआघाडीचे सरकार महाराष्ट्रामध्ये निर्माण करण्यात शरद पवार यांचा मोलाचा सहभाग होता.

२०२३ अजित पवारांचे बंड : जुलै २०२३ मध्ये, अजित पवार यांनी शरद पवारांच्या विरोधात बंड केले आणि सत्ताधारी भाजप-शिवसेना सरकारमध्ये सामील झाले आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, राष्ट्रवादीच्या बहुसंख्य विद्यमान आमदारांनी पवार यांच्या समर्थनार्थ पक्ष सोडला. त्यांनी

निवडणूक आयोगाकडे दावा केला की ते राष्ट्रवादीचे अध्यक्ष आहेत.

राजकीय विचारधारा:

शरद पवार यांची राजकीय विचारधारा प्रामुख्याने पुरोगामी, धर्मनिरपेक्ष आणि विकासवादी आहे. महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा पगडा असलेल्या शरद पवारांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत कृषी, औद्योगिकीकरण आणि सामाजिक समतेवर भर दिला. ते व्यवहारिक राजकारणी मानले जातात, जे सहकार क्षेत्र आणि समतावादी समाज रचनेला प्राधान्य देतात.

शरद पवार यांच्या विचारधारेची प्रमुख वैशिष्ट्ये:

- **पुरोगामी आणि धर्मनिरपेक्षता :** पवार नेहमीच धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करतात आणि सर्वसमावेशक राजकारणावर भर देतात.
- **विकासवादी दृष्टिकोन :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी औद्योगिक प्रगती, पायाभूत सुविधा आणि कृषी विकासाला गती दिली.
- **समतावादी आणि सहकार :** ग्रामीण भागातील शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच भर दिला असून, सहकार चळवळीला पाठिंबा दिला आहे.
- **व्यवहारिक राजकारण :** राजकीय परिस्थितीत बदल करून सत्तेच्या माध्यमातून विकास घडवून आणण्याची त्यांची शैली आहे, जी त्यांनी 'पुरोगामी लोकशाही दल' (पुलोद) स्थापन करून सिद्ध केली होती.

१. व्यवहारिकता :

शरद पवार यांच्या विचारधारेचा केंद्रबिंदू म्हणजे व्यवहारिकता. ते परिस्थितीनुसार निर्णय घेतात. आदर्शवादापेक्षा परिणामकारकतेवर त्यांचा अधिक भर असतो. उदाहरणार्थ, विविध विचारधारांच्या पक्षांशी त्यांनी वेळोवेळी युती केली आहे.

२. मध्यममार्गी भूमिका :

त्यांनी नेहमीच संतुलित भूमिका घेतली आहे. ना अतिवादी डाव्या विचारसरणीकडे झुकाव, ना उजव्या विचारसरणीकडे पूर्ण झुकाव हा त्यांचा दृष्टिकोन आहे. यामुळे त्यांना विविध गटांना एकत्र आणणे शक्य झाले.

३. धर्मनिरपेक्षता :

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या स्थापनेत धर्मनिरपेक्षता हा मुख्य आधार होता. सर्व धर्मांना समान वागणूक सामाजिक सलोखा राखण्यावर भर दिलेला आहे.

४. कृषी आणि ग्रामीण विकास :

केंद्रीय कृषिमंत्री म्हणून त्यांनी अनेक धोरणे राबविली अन्नसुरक्षा मजबूत करणे, सिंचन प्रकल्पांना चालना, शेतकरी हिताचे निर्णय त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने अन्नधान्य उत्पादनात वाढ अनुभवलेली आहे.

५. प्रादेशिकता आणि राष्ट्रीयता:

ते महाराष्ट्राच्या हितासाठी ठाम राहिले, पण राष्ट्रीय राजकारणातही प्रभावी भूमिका निभावली. हा संतुलन त्यांच्या विचारधारेचा महत्त्वाचा भाग आहे.

नेतृत्वशैली :

शरद पवार यांची नेतृत्वशैली अभ्यासू, धोरणी आणि महाराष्ट्राच्या राजकारणावर पाच दशकांहून अधिक काळ प्रभाव पाडणारी राहिली आहे. चार वेळा मुख्यमंत्री, केंद्रीय संरक्षण आणि कृषी मंत्री म्हणून काम केलेले शरद

पवार हे एक उत्तम संघटक, तळागाळातील प्रश्नांची जाण असलेला नेता आणि संकटात निर्णय घेणारे (Crisis Manager) म्हणून ओळखले जातात.

शरद पवार यांच्या नेतृत्वशैलीची प्रमुख वैशिष्ट्ये:

- **अभ्यासू आणि दूरदृष्टी :** कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करूनच ते निर्णय घेतात. कृषी, उद्योग आणि सहकार क्षेत्रात त्यांनी घेतलेले निर्णय याची साक्ष देतात .
- **धोरणी आणि लवचिक :** राजकीय परिस्थितीनुसार निर्णय बदलण्याची किंवा जुळवून घेण्याची क्षमता त्यांच्या नेतृत्वात दिसते बीबीसी वरील या लेखानुसार.
- **तळागाळातली पकड :** महाराष्ट्रभर फिरून कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधण्याची त्यांची पद्धत आहे.
- **विरोधी नेत्यांशी संवाद :** राजकीय मतभेद असले तरी, विरोधी पक्षाच्या नेत्यांशी संवाद साधून प्रश्न सोडविण्याची त्यांची पद्धत आहे.
- **नेतृत्व विकास:** आपल्या पक्षात तरुण नेतृत्वाला संधी देण्याचे काम त्यांनी अनेकदा केले आहे.

१) समन्वयक नेतृत्व:

शरद पवार यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे विविध पक्षांना एकत्र आणणे. आघाडी सरकारे स्थापन करण्यात प्रावीण्य विविध विचारसरणींमध्ये समन्वय साधने व सर्वाना एकत्र आणून सत्ता स्थापन करणे यावर त्यांचा विशेष भर असायचा असा त्यांचा महत्वाचा नेतृत्व गुण आहे.

२) संकट व्यवस्थापन:

ते संकट काळात शांतपणे निर्णय घेतात. नैसर्गिक आपत्ती, राजकीय अस्थिरता या परिस्थितींमध्ये त्यांनी प्रभावी नेतृत्व दाखविलेले आहे.

३) संघटन कौशल्य:

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या उभारणे हे त्यांच्या संघटन कौशल्याचे उत्तम उदाहरण आहे. कार्यकर्त्यांशी थेट संवाद स्थानिक नेतृत्वाला प्रोत्साहन, जनतेमध्ये जाऊन युवांना सोबत घेऊन एक मजबूत संघटन करणे व त्यातून पक्षाची ताकद वाढवून एक मजबूत असा पक्ष त्यांनी उभा केलेला आहे.

४) वाटाघाटी कौशल्य:

ते कुशल वाटाघाटीकार म्हणून ओळखले जातात. विरोधकांशी संवाद, राजकीय समीकरणे आपल्या बाजूने वळविणे या वाटाघाटी कौशल्यामुळे त्यांनी विरोधकांना सोबत घेऊन बऱ्याचं वेळेला सत्ता स्थापन केलेली आहे.

५) दीर्घकालीन दृष्टी:

ते निर्णय घेताना भविष्यातील परिणामांचा विचार करतात. दीर्घकालीन स्थैर्य धोरणात्मक नियोजन आणि येणाऱ्या काळात जो निर्णय घेणार आहेत त्याचा भविष्यामध्ये कसा उपयोग होईल याचा विचार करून ते नेहमी निर्णय घेत असतात.

६) आघाडी राजकारणातील भूमिका:

भारतीय राजकारणात आघाडी सरकारे महत्त्वाची ठरली आहेत. शरद पवार यांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. विविध पक्षांना एकत्र आणणे स्थिर सरकारे निर्माण करणे समन्वय साधणे त्यामुळे त्यांना "किंगमेकर" म्हणूनही ओळखले जाते.

योगदान :

१) महाराष्ट्रातील योगदान:

स्थिर राजकीय व्यवस्था औद्योगिक विकासाला चालना दिलेली आहे.

२) राष्ट्रीय स्तरावरील योगदान:

कृषिमंत्री म्हणून धोरणात्मक निर्णय, अन्नसुरक्षा बळकट करणे, कृषीक्षेत्रांमध्ये नवनवीन योजना त्यांनी राबविलेल्या आहेत.

३) पक्ष बांधणी:

Nationalist Congress Party स्थापनेद्वारे स्वतंत्र राजकीय ओळख निर्माण केलेली आहे.

मर्यादा आणि टीका :

१) संधिसाधूपणा:

त्यांच्या लवचिक विचारधारेवर टीका होते की, ते सत्तेसाठी विचार बदलतात.

२) गटबाजी:

पक्षातील अंतर्गत मतभेद आहेत.

३) सत्ताकेंद्रित राजकारण:

काही समीक्षकांच्या मते, त्यांचे राजकारण सत्ताकेंद्रित आहे.

चर्चा:

या अभ्यासातून असे स्पष्ट होते की शरद पवार यांची विचारधारा ही पारंपरिक तत्त्वज्ञानावर आधारित नसून परिस्थितीनुसार बदलणारी आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे आघाडी राजकारणाला स्थैर्य मिळाले विविध विचारधारांचे समन्वय शक्य झाले तथापि, त्याच लवचिकतेमुळे टीकाही झाली आहे.

निष्कर्ष:

शरद पवार हे भारतीय राजकारणातील एक प्रभावी आणि बहुआयामी नेते आहेत. त्यांची विचारधारा: व्यवहारिक मध्यममार्गी समन्वयवादी त्यांची नेतृत्वशैली: कुशल लवचिक परिणामकारक त्यांनी भारतीय राजकारणात आघाडी राजकारणाची परंपरा मजबूत केली आणि एक प्रभावी राजकीय वारसा निर्माण केला.

संदर्भ:

१) चव्हाण, व्ही. (२०१८). महाराष्ट्राचे राजकारण. पुणे: सुगावा पब्लिकेशन्स.

२) देशमुख, एस. (२०२०). भारतीय राजकारणातील नेतृत्व. इंडियन जर्नल ऑफ पॉलिटिकल सायन्स.

३) भारत सरकार. (२०१२). भारतीय कृषी अहवाल. नवी दिल्ली: कृषी मंत्रालय.

४) जोशी, आर. (२०१९). भारतातील आघाडीचे राजकारण. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

५) कुमार, आर. (२०२१). भारतीय राजकीय नेतृत्वातील व्यवहारवाद. जर्नल ऑफ एशियन स्टडीज.

६) पवार, एस. (२०१५). माझ्या अटींवर: तळागाळापासून सत्तेच्या वर्तुळापर्यंत. नवी दिल्ली: स्पीकिंग टायगर.

७) शिंदे, पी. (२०२२). शरद पवार आणि प्रादेशिक राजकारण. इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

शरद पवार यांचे विवेकबुद्धी, चिकित्सक दृष्टी आणि विज्ञानवादी विचार: एक अभ्यास

डॉ. मारुती संभाजी वाघ

कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव

Corresponding Author - डॉ. मारुती संभाजी वाघ

DOI - 10.5281/zenodo.23524414

प्रस्तावना:

विवेकबुद्धी म्हणजे परिस्थितीचे तार्किक विश्लेषण करून योग्य निर्णय घेण्याची क्षमता. शरद पवार यांच्या राजकीय जीवनात अनेक प्रसंग असे आले, ज्यातून त्यांची विवेकपूर्ण निर्णयक्षमता स्पष्ट होते. भारतीय राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे त्यांच्या दीर्घकालीन कार्यकाळामुळेच नव्हे, तर त्यांच्या विचारसरणीमुळे आणि निर्णयक्षमतेमुळे विशेष ठरतात. शरद पवार हे त्यापैकी एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या राजकारणात विविध पदांवर काम करताना विवेकबुद्धी, चिकित्सक दृष्टिकोन आणि विज्ञानवादी विचारसरणीचा अवलंब केला आहे. या संशोधनात्मक लेखात त्यांच्या कार्यपद्धतीतून या तीन गुणांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

चिकित्सक दृष्टी म्हणजे कोणत्याही गोष्टीचा अंधानुकरण न करता तिचे विश्लेषण करून योग्य निष्कर्ष काढणे. शरद पवार साहेबांच्या विचारांमध्ये हा गुण स्पष्टपणे दिसून येतो. ते कोणत्याही सरकारी धोरणाला समर्थन देताना किंवा विरोध करताना त्याचे आर्थिक, सामाजिक आणि दीर्घकालीन परिणाम तपासतात. उदाहरणार्थ, कृषी क्षेत्रातील सुधारणा करताना त्यांनी केवळ उत्पादन वाढवण्यावर नव्हे, तर बाजारपेठ, साठवणूक आणि निर्यात यांवरही लक्ष केंद्रित केले. चिकित्सक दृष्टिकोन असलेली व्यक्ती विविध मतांचा आदर करते. शरद पवार साहेबांनी अनेकदा विरोधी पक्षांच्या चांगल्या कल्पना स्वीकारल्या आहेत. यामुळे त्यांची विचारसरणी लवचिक आणि व्यवहारिक असल्याचे दिसते. ते नेहमी शिक्षण आणि संशोधनावर भर देतात. बारामती परिसरात त्यांनी शैक्षणिक संस्था उभारून विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान मिळविण्याची संधी उपलब्ध करून दिली. यामागे चिकित्सक आणि प्रगतिशील विचार आहे. विज्ञानवादी दृष्टिकोन म्हणजे अंधश्रद्धा, परंपरागत गैरसमज यांना नाकारून विज्ञानाधारित विचार स्वीकारणे. कृषिमंत्री असताना त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर दिला. ड्रिप इरिगेशन, हायब्रिड बियाणे, हवामान अंदाज यांचा वापर करून उत्पादन वाढवण्याचे प्रयत्न त्यांनी केले. शरद पवार यांनी अनेकदा सार्वजनिक मंचावर अंधश्रद्धेविरोधात भूमिका घेतली आहे. त्यांनी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्याचे आवाहन केले आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक विकासासाठी त्यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना प्रोत्साहन दिले. माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांना चालना देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

विज्ञानवादी दृष्टिकोनाचा आग्रह:

शरद पवार यांनी अनेक भाषणांमध्ये सांगितले आहे की, समाजाचा विकास हा विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित विचारांमुळेच शक्य आहे, अंधश्रद्धेमुळे नाही. ते लोकांना सांगतात की, कोणतीही गोष्ट आंधळेपणाने मानू नका, तिचा वैज्ञानिक आधार तपासा, तर्कशुद्ध विचार करा. शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना "प्रश्न विचारण्याची सवय लावा" असे आवाहन केले आहे. अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी जिज्ञासा आणि वैज्ञानिक विचार आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. शरद पवार हे आपल्या सार्वजनिक भाषणांतून आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आवाहन वारंवार करत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाचे स्वरूप प्रामुख्याने तर्कशास्त्र आणि आधुनिक शिक्षणावर आधारित असते.

विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धेपासून दूर राहावे यासाठी ते खालील मुद्द्यांवर भर देतात:

शरद पवार अनेकदा आपल्या भाषणात सांगतात की, यश हे नशिबात किंवा ग्रहतारे यांच्या मांडणीत नसते, तर ते केवळ कष्ट आणि नियोजनात असते. "हातावरील रेषा पाहून भविष्य ठरविण्यापेक्षा, त्या हातांनी कष्ट करून भविष्य घडवा," असा संदेश ते तरुणांना देतात. परीक्षेत यश मिळविण्यासाठी नवस करण्यापेक्षा अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला ते आवर्जून देतात. रयत शिक्षण संस्था आणि विद्या प्रतिष्ठान यांसारख्या संस्थांच्या कार्यक्रमांतून ते स्पष्ट करतात की, शिक्षणाने माणसाचा मेंदू प्रगल्भ झाला पाहिजे. जर शिकलेला माणूसही बुवाबाजी किंवा अघोरी प्रथांच्या मागे जात असेल, तर त्या शिक्षणाचा उपयोग नाही. विद्यार्थ्यांमध्ये 'काय बरोबर आणि काय चूक' हे पारखण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष असतो.

ते विद्यार्थ्यांना वारंवार महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आठवण करून देतात. या महापुरुषांनी ज्याप्रमाणे तत्कालीन समाजातील अज्ञान आणि अंधश्रद्धेवर प्रहार केला, तोच वारसा विद्यार्थ्यांनी आधुनिक विज्ञानाच्या मदतीने पुढे न्यावा, असे ते सांगतात. शेती असो वा आरोग्य, कोणत्याही समस्येवर उपाय शोधताना मांत्रिकाकडे न जाता तज्ज्ञांकडे किंवा डॉक्टरांकडे जावे, असे ते सांगतात. "विज्ञानाने दिलेली साधने आपण वापरतो (उदा. मोबाईल, विमान, औषधे), मग विचार करताना आपण जुनाट आणि कालबाह्य प्रथांचा आधार का घ्यावा?" असा तर्कसंगत प्रश्न ते विद्यार्थ्यांसमोर मांडतात. शरद पवार स्वतः प्रयोगशील आहेत. त्यांनी बारामतीमध्ये जे कृषी आणि शैक्षणिक प्रयोग केले, त्यातून त्यांनी हे सिद्ध केले की विज्ञानाच्या आधारे प्रगती शक्य आहे. विद्यार्थ्यांनाही ते "प्रत्येक गोष्टीचा अनुभव घ्या, प्रयोग करा आणि मगच त्यावर विश्वास ठेवा" असे सुचवितात.

कोविड-१९ महामारीच्या काळात त्यांनी वैज्ञानिक मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याचे आवाहन केले. त्यांनी अफवा आणि गैरसमज दूर करण्यावर भर दिला.शरद पवार यांनी सार्वजनिक जीवनात अनेक वेळा अंधश्रद्धेविरोधी आणि विज्ञानवादी भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. त्यांचा दृष्टिकोन हा "तर्क, विज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव" यावर आधारित असून समाजात विवेकशीलता वाढवण्यावर त्यांनी भर दिला आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला पाठिंबा:

१९८९ पुणे, अंधश्रद्धा निर्मूलन परिषदेमध्ये त्या वेळी मुख्यमंत्री असताना शरद पवार यांनी अंधश्रद्धेविरोधी कायदा करण्याची गरज मान्य केली. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा असे संकेत दिले. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ खूप प्रभावी आहे. डॉ. दाभोलकर यांच्या कार्याला शरद पवार यांनी पाठिंबा दिला. अंधश्रद्धा विरोधी कायद्यासाठी दिनांक ७ एप्रिल २०११ अंधश्रद्धा निर्मूलन समितीने मोठे आंदोलन केले होते. सरकार आणि नेते म्हणून शरद पवार यांनी या कायद्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली. अंधश्रद्धेमुळे होणाऱ्या शोषणावर नियंत्रण आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. महाराष्ट्रात लागू झालेल्या अंधश्रद्धा विरोधी कायद्याला शरद पवार यांनी पाठिंबा दिला.

डॉ. दाभोलकर यांच्या हत्येनंतर त्यांनी अंधश्रद्धेविरोधी कायद्याची गरज अधोरेखित केली. समाजात अंधश्रद्धेमुळे होणारे शोषण थांबविण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी सांगितले. या कायद्यामुळे भोंदू बाबांच्या फसवणुकीवर नियंत्रण आले. जादूटोणा, चमत्कार दाखवून लोकांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई शक्य झाली. शरद पवार साहेबांचे मत होते की: "धर्म वेगळा आणि अंधश्रद्धा वेगळी आहे; समाजाच्या हितासाठी अंधश्रद्धेला आळा घालणे आवश्यक आहे."

कृषी क्षेत्रात अंधश्रद्धेविरोधी भूमिका:

भारतीय शेती क्षेत्रात आजही अनेक ठिकाणी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आणि निसर्गावरचे अतिअवलंबित्व यामुळे शेतकरी विविध अंधश्रद्धांना बळी पडताना दिसतात. या अंधश्रद्धा केवळ आर्थिक नुकसानीलाच कारणीभूत ठरत नाहीत, तर कधीकधी जीवघेणी ठरतात. ग्रह-नक्षत्र पाहून पेरणी करणे , पाऊस पडत नसल्यास किंवा पिके वाळू लागल्यास वैज्ञानिक कारणांचा शोध घेण्याऐवजी अनेकदा अघोरी प्रथांचा अवलंब केला जातो. पाऊस पाडण्यासाठी बेडकांचे लग्न लावणे, गाढवांची मिरवणूक काढणे किंवा यज्ञ-हवन करणे. काही ठिकाणी पाऊस पडावा म्हणून जमिनीत विविक्षित वस्तू गाडणे किंवा पशूंचा बळी देणे असे प्रकार घडतात.

बारामती हा भाग एकेकाळी दुष्काळग्रस्त होता. पण शरद पवार साहेबांनी वैज्ञानिक पद्धतीने जलसंधारण, सिंचन आणि शेती सुधारणा केल्या. आज बारामती हा एक आदर्श कृषी व औद्योगिक विकासाचा नमुना मानला जातो. सहकार क्षेत्रात त्यांनी तर्कशुद्ध आणि व्यवस्थापकीय दृष्टिकोन वापरला. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका आणि इतर संस्था यांना त्यांनी वैज्ञानिक पद्धतीने व्यवस्थापित केले. शरद पवार यांनी याविरोधात वैज्ञानिक शेतीचा प्रचार केला. हवामान अंदाज, मृदा परीक्षण यावर आधारित शेती करण्याचा सल्ला देतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढले आणि अंधश्रद्धेवरील अवलंबित्व कमी झाले.

सार्वजनिक कार्यक्रमांतील भूमिका:

निवडणुकीच्या सभांमध्ये त्यांनी कधीही मंदिर-मशिदीचे मुद्दे किंवा धार्मिक भावना प्रज्वलित करून मते मागितली नाहीत. त्यांचे भाषण नेहमी कृषी धोरण, औद्योगिक प्रगती, शिक्षण आणि जागतिक अर्थकारण यावर केंद्रित असते. शरद पवार हे व्यक्तिगत आयुष्यात

नास्तिक आहेत की आस्तिक, यापेक्षा महत्त्वाचे हे आहे की, त्यांनी आपल्या 'सार्वजनिक धोरणांत' कधीही धर्माला थारा दिला नाही. ते नेहमी विज्ञानाचे आणि आधुनिक विचारांचे समर्थक राहिले आहेत. शरद पवार साहेब अनेकदा स्पष्टपणे सांगतात की: "चमत्कार" या नावाखाली लोकांची फसवणूक केली जाते व लोकांनी अशा गोष्टींवर विश्वास ठेवू नये. सार्वजनिक व्याख्यानांमध्ये त्यांनी लोकांना सांगितले की: आजारासाठी डॉक्टरांकडे जा, भोंदू लोकांकडे नाही. अंधश्रद्धा दूर करण्यासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन आहे, असे शरद पवार मानतात. ते विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन यावर भर देतात. शिक्षणामुळे लोकांची विचारसरणी बदलते आणि अंधश्रद्धा कमी होते, हा त्यांचा विश्वास आहे. त्यांच्या भाषणांमधून वारंवार पुढील संदेश दिसून येतो तो म्हणजे अंधश्रद्धा समाजाला मागे नेते. विज्ञान आणि तर्क समाजाला पुढे नेतो. प्रत्येक व्यक्तीने विचारपूर्वक निर्णय घ्यावा.

निष्कर्ष:

या संशोधनातून असे निष्पन्न होते की खासदार शरद पवार हे केवळ राजकारणी नसून एक विचारवंत आणि व्यावहारिक नेते आहेत. त्यांच्या विवेकबुद्धीमुळे त्यांनी अनेक कठीण प्रसंगात योग्य निर्णय घेतले. त्यांच्या चिकित्सक दृष्टिकोनामुळे त्यांनी धोरणांचे सखोल विश्लेषण करून योग्य मार्ग निवडला. तसेच, त्यांच्या विज्ञानवादी विचारसरणीमुळे त्यांनी समाजात प्रगतीशील बदल घडवून आणले. आजच्या काळात अशा नेतृत्वाची गरज अधिक आहे, जे भावनांपेक्षा तर्क, अंधश्रद्धेपेक्षा विज्ञान आणि मतभेदांपेक्षा संवादाला प्राधान्य देईल. शरद पवार यांचे कार्य हे याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. शरद पवार यांच्या कार्यातून असे दिसते की त्यांची निर्णयप्रक्रिया भावनिक किंवा तात्कालिक नसून ती विवेकपूर्ण, चिकित्सक आणि विज्ञानाधारित आहे. भारतीय राजकारणात अनेकदा भावनिक मुद्द्यांना प्राधान्य दिले जाते, परंतु शरद पवार साहेबांनी तर्क आणि विज्ञानाला महत्त्व दिले.

संदर्भ:

1. Pawar, Sharad, On My Terms: From the Grassroots to the Corridors of Power, Speaking Tiger Publishing, 2015.
2. पवार शरद, लोक माझे सांगाती, राजहंस प्रकाशन, 2015.
3. भारत सरकार, पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार समितीचा अहवाल, भारत सरकार, विविध वर्षे.
4. देशमुख, एस. आर, "शरद पवार यांची विवेकनिष्ठ राजकीय दृष्टी." Economic and Political Weekly, खंड 50, क्र. 12, 2015, पृ. 45–52.
5. कुलकर्णी, ए. व्ही. "महाराष्ट्राच्या राजकारणातील विज्ञानवाद आणि तर्कशुद्धता." Journal of Indian Political Studies, खंड 8, क्र. 2, 2018, पृ. 78–85.
6. जाधव नरेंद्र, Public Policy and the Indian Economy, राजहंस प्रकाशन, 2017.
7. पवार शरद. "वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अंधश्रद्धा यावर भाषण." अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, 2019.
8. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती. अंधश्रद्धा विरोधी चळवळीवरील अहवाल व प्रकाशने. MANS प्रकाशन, विविध वर्षे.

9. चव्हाण यशवंतराव, यशवंतराव चव्हाण यांचे निवडक लेखन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, 2005.
10. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, धोरणे व अधिकृत भाषणे, [www.inc.in] (http://www.inc.in)
11. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. अधिकृत भाषणे व प्रसिद्धीपत्रके. www.ncp.org.in
12. पाटील, व्ही. बी. "शरद पवार यांची विज्ञानवादी भूमिका." महाराष्ट्र टाइम्स, 12 ऑगस्ट 2020.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

शरद पवार: प्रभावी नेतृत्व आणि दूरदृष्टीचे निर्णय

डॉ. करीम मुल्ला

राज्यशास्त्र विभाग, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापुर.

Corresponding Author - डॉ. करीम मुल्ला

DOI - 10.5281/zenodo.23524436

प्रस्तावना:

राजकीय नेतृत्व ही आधुनिक राज्यशास्त्रातील एक मध्यवर्ती संकल्पना आहे. कोणत्याही राष्ट्राच्या राजकीय स्थैर्य, विकास आणि लोकशाहीच्या गुणवत्तेवर नेतृत्वाचा मोठा प्रभाव असतो. प्रभावी नेतृत्व केवळ सत्तेचे संचालन करत नाही, तर समाजात परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता देखील ठेवते. त्यामुळे राजकीय नेतृत्वाचा अभ्यास हा राज्यशास्त्रातील एक महत्त्वाचा विषय आहे. राजकीय नेतृत्व म्हणजे लोकांच्या समर्थनावर आधारित सत्ता प्राप्त करून समाजाच्या हितासाठी धोरणनिर्मिती व निर्णय प्रक्रिया राबविण्याची क्षमता होय. मॅक्स वेबर यांच्या मते, नेतृत्व हे लोकांवर प्रभाव टाकण्याच्या क्षमतेशी संबंधित आहे. वेबर यांनी नेतृत्वाचे तीन प्रकार परंपरागत, करिष्माई आणि कायदेशीर स्पष्ट केले आहेत. प्रस्तुत संशोधन लेखात भारताचे माजी कृषिमंत्री आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शरद पवार यांच्या नेतृत्व कौशल्याचा अभ्यास केला आहे. शरद पवार पुरोगामी विचारांचे नेते आहेत. सत्ताकाळात त्यांनी घेतलेले विविध निर्णय किंवा राबविलेली धोरणे व्यापक सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनास चालना देणारी ठरली आहेत. भविष्यातील गरजा ओळखून दीर्घकालीन निर्णय घेण्याची क्षमता शरद पवारांच्या नेतृत्व कौशल्याचे प्रमुख वैशिष्ट्य असल्याचे दिसून येते. त्यांनी राज्य आणि केंद्र पातळीवर सत्तेवर असताना असे अनेक निर्णय घेतलेले दिसून येतात. त्यांच्या या निर्णयामध्ये प्रामुख्याने लातूर किल्लारी भागातील भूंकप पीडितांचे पुनर्वसन, मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे, महाराष्ट्रातील महिला धोरण, तसेच केंद्रीय कृषिमंत्री म्हणून घेतलेले निर्णय भविष्यातील दीर्घकालीन सकारात्मक सामाजिक, आर्थिक परिवर्तन घडविण्यामध्ये मैलाचे दगड ठरल्याचे दिसून येते. यामधून त्यांचे नेतृत्व व्यापक आणि दूरदृष्टीपूर्ण असल्याचे दिसून येते. प्रस्तुत लेखात शरद पवार सत्ताकाळात घेतलेल्या विविध निर्णयामधून त्यांचे नेतृत्व, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक-धार्मिक निरपेक्षता याचा पुरस्कार करणारे असल्याचे दिसून येते. यामधील काही प्रमुख घटकांचा अभ्यास प्रस्तुत लेखात करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. शरद पवार यांच्या राजकीय कारकिर्दीतील निर्णयांचा अभ्यास करणे.

२. शरद पवार यांच्या आपत्ती व्यवस्थापन कार्याचा अभ्यास करणे.

३. शरद पवार कृषी मंत्री असताना घेतलेल्या निर्णयांचा अभ्यास करणे.
४. शरद पवार यांच्या नेतृत्व कौशल्याचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंधात शरद पवार यांच्या राजकारणाचे विश्लेषण करण्यासाठी गुणात्मक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धती अवलंबण्यात आली आहे. शरद पवार यांच्या राजकीय कारकिर्दीतील घटकांचे समालोचनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

माहिती स्त्रोत:

प्रस्तुत शोधनिबंधात अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोत साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यांची विचारसरणी, निर्णयप्रक्रिया आणि नेतृत्व समजण्यासाठी प्रकाशित ग्रंथ, संशोधन लेख ,वृत्तपत्रे,आदी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. तसेच शरद पवार यांची भाषणे, लेखन आणि राजकीय घडामोडींचे विश्लेषण तसेच घटनांद्वारे त्यांच्या नेतृत्व आणि रणनीतीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

अभ्यास मर्यादा:

प्रस्तुत अभ्यास प्रामुख्याने दुय्यम स्रोतांवर आधारित आहे. काही निष्कर्ष हे व्याख्यात्मक स्वरूपाचे आहेत. राजकीय घडामोडी सतत बदलत असल्यामुळे निष्कर्ष वेळेनुसार बदलू शकतात.

भविष्यातील गरजा ओळखून दीर्घकालीन निर्णय घेण्याचे कौशल्य:

समन्वयवादी नेतृत्व:

विविध मतप्रवाहांना एकत्र करून त्यांच्यात समन्वय स्थापन करण्याची क्षमता शरद पवार यांच्याकडे उपजत असल्याचे दिसून येते. राजकीय परिस्थितीनुसार जलद निर्णय घेऊन सत्तासमीकरणांमध्ये बदल घडवणे हे राजकीय व्यवस्थापनातील कौशल्य नेतृत्वात असणे महत्त्वाचे असते. राजकारणामध्ये यास महत्व असते. शरद पवार यांच्या निर्णयांमध्ये अनुभव आणि राजकीय गणित यांचा समतोल असलेला दिसून येतो. आघाडी किंवा गठबंधन सरकारांमध्ये विविध पक्षांना एकत्र ठेवून स्थिर सरकार चालवण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिल्याचे दिसून येते. १९७८ मधल्या या डावपेचांनी शरद पवार महाराष्ट्रामधील राजकारणाच्या केंद्रस्थानी आले, ते आजपर्यंत. तोपर्यंत शरद पवार यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार कार्य करीत होते. ते महाराष्ट्राच्या राजकारणात आल्यानंतर आणि प्रस्थापित झाल्याला बराच काळ झाला होता. शरद पवार मंत्रीही झाले होते. पण तरीही पुढील घटनेने ते महाराष्ट्राचे सर्वांत तरुण मुख्यमंत्री झाले, आणि महाराष्ट्राचं राजकारणही बदलून गेले, ही घटना म्हणजे १९७७ मध्ये आणीबाणीनंतर कॉंग्रेस पक्षात पडलेली फुट, कॉंग्रेसचे 'इंदिरा कॉंग्रेस' आणि 'रेड्डी कॉंग्रेस' असे दोन भाग झाले. यशवंतराव चव्हाण यांच्यासह महाराष्ट्रातले अनेक नेते 'रेड्डी कॉंग्रेस'मध्ये गेले त्यांच्या सोबत वसंतदादा पाटील, शरद पवारही होते.

१९७८ मध्ये जेव्हा महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या तेव्हा दोन्ही कॉंग्रेस वेगळ्या लढल्या. जनता पक्ष मोठा पक्ष बनून निवडून आला, पण

बहुमतापासून दूर राहिला. मग दोन्ही कॉंग्रेस एकत्र आल्या आणि या आघाडीच्या सरकारचे वसंतदादा पाटील मुख्यमंत्री बनले, तर नासिकराव तिरपुडे उपमुख्यमंत्री बनले. पण या सरकारमध्येच अनेक नेते अस्वस्थ होते. सरकारमध्ये वाद वाढू लागले. शेवटी शरद पवार त्यांच्या ४० समर्थक आमदारांसह बाहेर पडले आणि साडेचार महिन्यात हे आघाडीचे सरकार पडले. शरद पवारांच्या या पहिल्या बंडाचे अनेक प्रकारे विश्लेषण केले गेले. शरद पवार यांच्या समन्वयवादी नेतृत्वाचा हा पहिलाच प्रयोग होता. सन १९७८ मधील महाराष्ट्रतील हा पुलोद चा प्रयोग त्यांच्या समन्वयवादी नेतृत्वाचे अत्यंत समर्पक उदाहरण आहे. पुढे भविष्यात तसेच केंद्रीय पातळीवरील २००४ मध्ये संयुक्त पुरोगामी लोकशाही आघाडी बनविण्यात आणि समविचारी पक्षांना एकत्र आणण्यामध्ये शरद पवार यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे दिसून येते. शरद पवार यांची निर्णयक्षमता अत्यंत जलद, अचूक आणि भविष्यवेधक असल्याचे अनेक घटनांमधून आपणास दिसून येते. वेळीच आणि ठाम निर्णय घेण्याची क्षमता हे त्यांचे वैशिष्ट्य त्यांच्या यशस्वी राजकीय करिअरचे गमक आहे. नवनेतृत्वच्या राजकीय भरती बाबतही त्यांचे आडाखे कधीही चुकल्याचे दिसून येत नाही. त्याचे अलीकडील उत्तम उदाहरण द्यायचे झाले तर दिवंगत आर. आर. पाटील तसेच जयंत पाटील यांचे देता येईल.

आपत्ती व्यवस्थापनातील नेतृत्व कौशल्य:

संकटाच्या काळात नेतृत्वाची खरी परीक्षा होते. अडचणीच्या काळात शांत आणि प्रभावी निर्णयक्षमतात्यांचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रातील दुष्काळ आणि पूर परिस्थितीत त्यांनी प्रशासनाला सक्रिय ठेवून मदतकार्ये राबविली. दिनांक ३० सप्टेंबर १९९३ रोजी निसर्गाने लातूर जिल्यातील किल्लारी आणि परिसरात मोठा भूकंप झाला. शरद पवार त्यावेळी मुख्यमंत्री होते. सोबतच गृहखात्याचा कारभार देखील ते स्वतःच हाताळत होते. राज्यभरात चालू असलेल्या गणेश विसर्जन मिरवणुका व्यवस्थित सुरु आहेत का याची माहिती घेत ते रात्रीचे जागेच होते. बहुतेक सगळ्या मिरवणूका शांततेत पार पडल्या आहेत हे कळल्यावर ते झोपायला गेले. रात्री साडेतीन वाजता खिडक्यांची तावदाने थरथरू लागली. भूकंप असल्याचे लगेच सगळ्यांच्या लक्षात आले. शरद पवार यांनी लगेचच चौकशी केली, तर भूकंपाचा केंद्र लातूर असल्याचं त्यांना सांगण्यात आले. शरद पवार यांनी तातडीने लातूरच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना फोन लावण्याचा प्रयत्न केला. पण तिकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. काहीतरी मोठं अघटित घडल्याची जाणीव तात्काळ शरद पवार यांना झाली. त्यांनी मग तात्काळ आपल्या स्वीय साहयकांना फोन केला. सकाळी ७ वाजता विमान तयार ठेवण्याच्या सूचना दिल्या. ७ वाजून ४० मिनिटांनी शरद पवार लातूरला पोहचले. तिथून लगेच 'किल्लारी' या गावात दाखल झाले. गावच्या गावे निसर्गाच्या या तडाख्याने रात्रीत गाडली होती. भूकंपाने केलेल्या विध्वंसाचे चित्र सकाळच्या उजेडात स्पष्ट दिसू लागले होते. कल्पनेपलीकडचे नुकसान झाले होते. स्वतंत्र भारतात महाराष्ट्राने कधीही न पाहिलेल्या एवढ्या मोठ्या नैसर्गिक आपत्तीला अत्यंत धीरोदात्तपणे शरद पवार सामोरे गेले. त्यांनी तात्काळ कामाला सुरवात केली. सकाळच्या ८.३० वाजल्यापासूनच मदतीला सुरवात देखील झाली. साडेआठ वाजता मिळालेली ही गती पुढे अनेक महिने अविरतपणे सुरु होती. ३०,००० च्या वर घरे पूर्णपणे जमीनदोस्त झाली होती. तर पडझड झालेली

घरांची संख्या १९,९४० होती. मोठ्या प्रमाणात जनावरे दगावली होती. परिसरातील सरकारी कार्यालये उद्ध्वस्तच झालेली होती. अशातच मुसळधार पावसामुळे मदत कार्यात अडचणी येत असताना, स्वतः शरद पवार परिसरात थांबून होते. तीन महिने त्यांनी आपले कार्यालय सोलापूर येथे सर्किट हाऊसला हलविले होते. तेथून ते दररोज उस्मानाबाद-लातूरच्या भूकंपग्रस्त भागात जात होते. कामाची वाटणी आणि विभागणी त्यांनी अतिशय काटेकोरपणे केली होती. भारत तसेच जगभरातून आर्थिक, वैद्यकीय मदत आली होती, त्या मदतीचे वितरण आपद्ग्रस्तांना अत्यंत पारदर्शक पद्धतीने करण्यात आले. युरोपमधून त्यावेळी एक डॉक्टरांच पथक आलं होते. त्यामध्ये डॉ. हॅन्स ज्युसन होते. ते मदतकार्य पूर्ण करून परत मायदेशी जाताना त्यांनी दिलेली प्रतिक्रिया शरद पवारांच्या नेतृत्व कौशल्याची पोहोच पावती असल्याचे दिसून येते. ते म्हणाले होते की, "आम्ही जिथं अश्या नैसर्गिक आपदांच्या जागी जातो, तिथं परिस्थिती वाईट असते. रोगराई पसरलेली असते. नियोजनाचा अभाव असतो, शिवाय आत्यंतिक गोंधळाची स्थिती असते. पण इथे मात्र तशी काहीच परिस्थिती नव्हती. याचे संपूर्ण श्रेय राज्याचे मुख्यमंत्री शरद पवार यांचे आहे." कोणताही पूर्वानुभव नसताना केवळ सक्षम निर्णयक्षमतेच्या जोरावर आणि सामान्य जनतेसाठी झटायच्या प्रेरणेने शरद पवार यांनी किल्लारीतील परिस्थिती अत्यंत जलद गतीने आटोक्यात आणली. देशात पुढे जेंव्हा अश्या घटना घडल्या तेंव्हा सर्वांनीच शरद पवार यांचे आपत्ती व्यवस्थापन बाबतीत मार्गदर्शन मागितले आहे. तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी देखील २००९ मध्ये शरद पवार पवार यांना राष्ट्रीय आपत्ती निवारण समितीचे उपाध्यक्षपद स्वीकारण्याची गळ घातली होती. त्यावेळी शरद पवार विरोधी पक्षात होते.

सर्वसमावेशक निर्णय:

शेतकरी,दलित,अल्पसंख्याक,महिला,ग्रामीण समाज यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवणे यातून त्यांची नेतृत्वशैली लोकाभिमुख आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील असल्याचे दिसते. शरद पवार यांचे नेतृत्व पुढील वैशिष्ट्यांनी ओळखले जाते. अनुभवाधारित, व्यवहारिक समन्वयक, लवचिक, विकासाभिमुख आणि दीर्घकालीन दृष्टिकोन सतत बाळगल्याचे दिसून येते. शरद पवार यांनी काँग्रेसशी फारकत घेत १९७८ मध्ये पुरोगामी लोकशाही दल सरकार महाराष्ट्रात स्थापन करेपर्यंत, सरकारी पातळीवर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता. त्यांच्या

किमान समान कार्यक्रमात सुद्धा याचा उल्लेख होता. ते या संदर्भात आग्रही होते. जुलै १९७८ मध्ये त्यांनी विधानसभेत एकमताने हा नामांतराचा ठराव पारित केला. हा निर्णय जाहीर झाल्याच्या काही तासांनी मराठवाडयातील परिस्थिती चिघळली. जातीय दंगली उसळल्या आणि या भागातील दलित कुटुंबांना लक्ष्य करण्यात आले. 'लोक माझे सांगाती' या आत्मचरित्रात शरद पवार यांनी याबद्दल विस्तृतपणे नमूद केले आहे. शरद पवार यांनी २७ जुलै १९७८ या दिवशी घडलेल्या घटना सविस्तरपणे दिल्या आहेत. पुन्हा एकदा काँग्रेसमध्ये परतलेले शरद पवार मुंबईतील दंगलींनंतर जेव्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा, १९९४ मध्ये पुन्हा एकदा नामांतरासंदर्भातील हालचालींना वेग आला. शरद पवार यांनी पुन्हा एकदा राजकीय एकमत तयार करण्यास सुरुवात केली.

मराठवाडा हा स्थानिक अस्मितेशी संबंधित शब्द बदलण्यास विरोध असल्यामुळे, अशीही एक कल्पना पुढे आली की, हा शब्द काढून टाकण्याऐवजी हा शब्द ठेवून त्यात भर घालून नवीन नाव तयार करावे. म्हणजेच नामविस्तार करावा, त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामकरण करण्याचा प्रस्ताव पुढे आला. यातून दोन्ही गटांच्या भावनांचा आदर केला गेला होता. त्याचप्रमाणे मराठवाडयातील नांदेड शहरात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे दुसरे एक विद्यापीठ स्थापन करण्यात आले. १४ जानेवारी १९९४ रोजी या संदर्भातील अंतिम घोषणा करण्यात आली. आता हा दिवस दर वर्षी नामविस्तार दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

महाराष्ट्रातील पहिल्या महिला धोरणाचे कर्ते:

महाराष्ट्राला पुरोगामी, सामाजिक व राजकीय सुधारणांची प्रदीर्घ परंपरा आहे. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे अशा असंख्य विभूतींनी महाराष्ट्राची वैचारिक जडण- घडण केली आहे. महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेने राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतून ती अधिकाधिक समृद्ध होत गेली आहे. सत्ता मिळाल्यानंतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर दिवंगत इंदिरा गांधी यांनी महिलांचे प्रभुत्व सिध्द केलेले आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी या परंपरेचे जतन केले. समाज सुधारकांमुळे महाराष्ट्राच्या मातीला अभिनव कल्पनांची आणि नाविन्यपूर्ण संस्थांची जन्मभूमी अशी ख्याती प्राप्त झाली आहे. त्या स्त्रिया या धोरणाच्या स्फूर्तीस्थान आहेत. महात्मा ज्योतीराव फुले हे स्त्रीमुक्ती आंदोलनाचे जनक व स्त्री-स्वातंत्र्याचे उद्‌गाते होते. महात्मा फुले यांनी स्त्रियांसाठी शाळा उघडणे, सावित्रीबाईंना त्या शाळेत शिक्षिका नेमणे, विधवांच्या केशवपनाविरुद्ध आंदोलन करणे, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करणे, विधवांसाठी प्रसूतिगृह उभारणे, विधवांच्या पुनर्विवाहास चालना देणे इ. उपक्रमांतून स्त्री-मुक्तीची मोठी चळवळ उभारली होती. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून शरद पवारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर २२ जून १९९४ रोजी सर्वंकष महिला धोरण जाहीर करून, देशात सर्व प्रथम महाराष्ट्रात महिलांना सर्व क्षेत्रांत विकासाचा नवा मार्ग मोकळा करून दिला. १९९४ साली त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांच्या पुढाकाराने महिला धोरण तयार करण्यात आले. अशाप्रकारचे धोरण बनविणारे अग्रेसर राज्य अशी महाराष्ट्राची ओळख त्यातून निर्माण झाली. नंतर २००१ साली पुन्हा महाराष्ट्र शासनाने तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली महिला धोरण तयार केले होते. या दोन्ही धोरणांमुळे काही चांगले निर्णय झाले व उपक्रम मार्गी लागून महिलांबाबतच्या दृष्टिकोनाला दिशा लाभली. शरद पवार यांनी जून १९९४ मध्ये स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्याकडून देशाच्या समृद्धीसाठी समाज परिवर्तनवादी व क्रांतिकारी महिलांविषयक धोरण जाहीर करून आपल्या दूरदृष्टीची जाणीव देशाला करून दिली. देशात सर्वप्रथम महिलांना राजकीय, आर्थिक, व सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. स्त्री व पुरुष हा भेद दूर करण्याचा, समानता आणण्याचा व स्त्रियांना आर्थिक सुस्थितीत आणण्याचा त्यांचा हा निर्णय अत्यंत दूरगामी सकारात्मक परिणाम करणारा ठरल्याचे

दिसून येते. आज महिलांचा सर्व स्तरातील कर्तृत्व पाहिल्यानंतर त्यांच्या निर्णयाचे महत्त्व अधोरेखित होते.

हमीभांवात भरीव वाढ:

शरद पवार देशाचे कृषिमंत्री झाल्यावर त्यांनी कृषी क्षेत्रात तंत्रज्ञान, अन्नसुरक्षा आणि निर्यात धोरणांवर भर दिला. गव्हाच्या उत्पादनात वाढ करायची वा अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण व्हायचे तर अन्नधान्याच्या आधारभूत किंमतीत घसघशीत वाढ करायला हवी, हा धोरणात्मक निर्णय शरद पवारांनी घेतला. प्रसंगी संघर्ष करण्याची भूमिका घेतली. आधारभूत किंमतीत वाढ म्हणजे महागाईला आमंत्रण असे समीकरण जुळवून अर्थतज्ञ, सरकारमधील काही घटक आणि प्रसारमाध्यमांनी उठवलेली टीकेची झोड सहन केली. शरद पवार याबाबत पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनाही याबाबत योग्य ते स्पष्टीकरण देऊन त्यांचे मन वळविण्यात यश मिळविले. परिणामी दरवर्षी हमी भावात वाढ करून घेण्यात शरद पवारांना यश मिळाले. २०१४ पर्यंत म्हणजे एका दशकात गहू, तांदूळ, कापूस, सोयाबीन या सर्व पिकांच्या हमीभावात दुप्पटीपेक्षा अधिक वाढ करण्यात आली. शरद पवार पदावर येण्यापूर्वी आणि पदावरून पायउतार होताना पिकांच्या आधारभूत किंमती काय होत्या, हे पाहिले तर हमीभावात झालेली वाढ लक्षात येईल. तांदूळ (१३८%), गहू (१२२%), सोयाबीन (१९८%), कापूस (११४%), ऊस (१८८%), हरभरा (१२१%), मका (१५९ %), तूर (२१६%) अशी हमीभावात वाढ झाल्याचे कृषी मंत्रालयाच्या आकडेवारीतून दिसून येते. अन्नधान्याच्या हमीभावात वाढ केल्यामुळे शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळाले. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. शरद पवारांनी कृषिभवनचा निरोप घेईपर्यंत भारत जगामध्ये तांदळाचा प्रथम क्रमांकाचा निर्यातदार देश बनला होता, तर गहू निर्यातीत दुसऱ्या स्थानावर होता.

निर्यात वाढीस चालना:

केवळ आधारभूत किंमत वाढवून, उत्पादन वाढवून भागणार नाही याची जाणीव शरद पवार यांना होती. वाढलेल्या उत्पादनाची निर्यातही झाली पाहिजे. शरद पवार यांच्या या निर्णयामुळे निर्यात ७.५ अब्ज डॉलरवरून तब्बल ४२.८४ अब्ज डॉलरवर गेल्याचे दिसून येते. थोडक्यात शरद पवार यांनी पद सोडताना परदेशात होणा-या शेतमालाच्या विक्रीतून शेतक-यांना जवळपास तीन लाख कोटी रुपये मिळत होते. कापसाची निर्यात या दहा वर्षात १२ लाख ११ हजार गाठीवरून तब्बल ११७ लाख गाठीवर गेली. त्यासाठी ब-याचदा शरद पवार यांना वस्त्रोउद्योग मंत्र्यांशी संघर्ष करावा लागला. यातून त्यांचे नेतृत्व केवळ तात्कालिक समस्यांवर आधारित नसून दीर्घकालीन विकासाभिमुख असल्याचे दिसते. त्यांनी कृषी अर्थव्यवस्थेला अधीक स्थैर्य देण्याचा यशस्वी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

कर्जमाफी, व्याजदर कपात:

शेतक-यांच्या आत्महत्यांची खासगी सावकारी व कर्जबाजारीपणा ही मुख्य कारणे आहेत. ते वेगवेगळ्या अहवालांनी अधोरेखीतही केले आहे. शरद पवार तीन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, पण त्यांची त्यापेक्षा अधिक काळ आणि सलग असलेली कारकीर्द म्हणजे केंद्रीय कृषिमंत्री. 'यूपीए' सरकारमध्ये सलग १० वर्षं ते कृषिमंत्री होते आणि त्या काळातल्या त्यांनी घेतलेल्या निर्णयांचा शेती क्षेत्रावर चांगला परिणाम झाला. त्यापैकी एक निर्णय, जो त्यांच्या एकूण कारकीर्दीतही महत्त्वाचा

ठरावा, तो म्हणजे 2008 साली केंद्र सरकारने केलेली कर्जमाफी होय. ७२ हजार कोटींचे देशभरातल्या शेतक-यांवर आणि त्यांच्या शेतीआधारित असलेल्या उद्योगांवरचं माफ केले गेले. अशा प्रकारची कर्जमाफी यापूर्वी भारताच्या इतिहासात सरकारतर्फे देण्यात आली नव्हती. कृषि क्षेत्रातल्या संकटावरुन या सरकारवर सातत्याने टीका होत होती. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा इथल्या कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या हजारो झालेल्या आत्महत्या हा राष्ट्रीय चर्चेचा आणि टीकेचा मुद्दा विषय बनला होता. त्यात दुष्काळानेही शेतकरी अडचणीत होता. या पार्श्वभूमीवर ही कर्जमाफी ऐतिहासिक मानली गेली. शिवाय पीक कर्जाचा व्याजदर १६ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर आणला. यामुळे शेतीसाठी दिले जाणारे कर्ज ८६ हजार ९८९ कोटी रुपयांवरून दहा वर्षात ७ लाख कोटी रूपयांवर गेल्याचे दिसून येते. याबाबत केंद्रीय अर्थसंकल्पांच्या कागदपत्रांमध्ये ही माहिती मिळते. तसेच खाजगी उद्योगांच्या आकडेवारीचा अभ्यास केल्यानंतर आपल्या लक्षात येते. उदा. ट्रॅक्टर शेतकरीच विकत घेतात. ट्रॅक्टरचा २००३/०४ या वर्षात वार्षिक खप होता १ लाख ७९ हजार ६५७. तर २०१३/१४ मध्ये तो ६ लाख ३४ हजार १५१ वर पोहोचला. म्हणजेच दहा वर्षात वार्षिक वाढीचा दर (Calculated Compound Annual Growth (CAGR) होता १४ टक्के. मात्र मागील दोन वर्षात खप पुन्हा कमी झाल्याचे दिसून येते. २०१४/१५ व २०१५/१६मध्ये खपात अनुक्रमे १३ व ११ टक्के घट झाली. ४ लाख 93 हजार ७९४, ग्रामीण भागात मुख्यतः मोटारसायकली वापरल्या जातात. (स्कूटीचा खप कमी आहे कारण मोटरसायकल हे मालवाहू वाहन म्हणूनही अनेकदा उपयोगाला येते. उदा. दुधाच्या चरव्या, देशात २००३/०४ मध्ये मोटारसायकलींचा खप होता ४१ लाख ७० हजार ४४५, तर २०१३/१४ मध्ये हाच खप १ कोटी ४ लाख ७९ हजार ८९७ झाला होता, ग्रामीण भागातून वाढलेल्या मागणीमुळे विक्रमी विक्री झाली अशी कारणमीमांसा त्यावेळी बजाज, हिरो होंडा या मोटरसायकल कंपन्यानी केली होती. गहू, तांदूळ याप्रमाणेच भाज्या आणि फळांचे उत्पादनही शरद पवार केंद्रीय कृषीमंत्री असताना वाढल्याचे दिसून येते. फळांचे उत्पादन ४५.२ दशलक्ष टनांवरून ८९ दशलक्ष टनांपर्यंत गेल्याचे दिसून येते. पालेभाज्यांचे उत्पादन ८८.३ दशलक्ष टनांवरून १६२.९ दशलक्ष टनांपर्यंत वाढले आहे. वरील मुद्दे दूध, मासे, मांस, चहा, कॉफी, मसाले इत्यादी पदार्थांच्या बाबतीतही लागू आहेत.

लोकशाही मूल्ये आणि सर्वसमावेशक नेतृत्व शैली:

शरद पवार यांचे नेतृत्व हे बहुअयामी असून त्यात दूरदृष्टी, समन्वय, संवाद आणि निर्णयक्षमता यांचा प्रभावी संगम दिसतो. त्यामुळे ते भारतीय राजकारणातील एक प्रभावी आणि अभ्यासनीय नेतृत्व मॉडेल ठरतात. त्यांचे नेतृत्व केवळ तात्कालिक समस्यांवर आधारित नसून दीर्घकालीन विकासाभिमुख असल्याचे दिसते. याबाबत सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते,

लेखक जब्बार पटेल यांचे मत अभ्यासले असता याची प्रचीती येते, ते म्हणतात,' सिंहासन' चित्रपटावेळी माझ्याकडे पैसे नव्हते. तेव्हा विजय तेंडुलकर यांनी मला त्यांच्याकडे जायचा सल्ला दिला. राजकारणावर आधारित चित्रपट करतो आहे. काही मदत मिळाली तर? असे त्यांना म्हटल्यावर त्यांनी मंत्रालयात परवानगी देण्याबरोबरच मंत्र्यांचे बंगलेही चित्रीकरणासाठी उपलब्ध करून दिले. कला, क्रीडा,साहित्य या विषयाबाबत त्यांची असलेली जाण यामागे त्यांची फार मोठी सामाजिक,

राजकीय दृष्टी आहे. संविधानाने दिलेली शक्ती पणाला लावली तरच लोकशाही टिकते, असे ठाम मत असलेले जे नेते आहेत, जसे मनुष्याला जगण्याचे, श्वास घेण्याचे अधिकार आहेत तसेच ते आविष्कारांचे आहेत. त्यामुळे कोणाचाही आविष्कार कुणामुळेही थांबता कामा नये, अशीच त्यांची भूमिका असते. प्रत्येक धर्म, त्याच्या शाखा कशा नांदतात, याची एक चिंतनात्मक बैठक त्यांच्याकडे आहे. हा व्यासंग त्यांना वाचनातून व घरातील संस्कारातूनही मिळाला असल्याचे दिसून येते. मनमोकळेपणे संवाद साधणे आणि इतरांच्या अभिव्यक्तीचा आदर राखणे, त्यांना स्वातंत्र्य देणे हे त्यांनी कायमच जपण्याचा प्रयत्न केला. एका विशिष्ट राजकीय टप्प्यावर लोकशाही मूल्यांची जपणूक करणारे यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे राजकीय गुरू त्यांना भेटले आणि त्यांच्या विचारांना नवी दिशा मिळाली. साहित्यिकांसह विविध पक्षांतील मित्र जोडणे आणि स्वभावातील उमदेपणा हा यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू होता. तोच पैलू शरद पवार यांच्यामध्ये अधिक पटीने अनुभवास मिळतो. स्वतःचे व्यक्तिमत्त्व त्यांनी त्या पद्धतीने जपले. लोकशाही मूल्य जपणाऱ्या कोणत्याही गोष्टी मग त्या साहित्य, कला किंवा जगण्यातल्या असो त्यामागे ठामपणे उभे राहिले पाहिजे, याबाबत त्यांचा कटाक्ष असतो. राजकीय व्यक्तिमत्व त्यांना त्या पद्धतीने जपल्याचे दिसून येते. शरद पवार यांची राजनीती ही धर्मनिरपेक्ष आहे. शरद पवार कधीही कुठल्या अंधश्रद्धा पसरविणाऱ्या बुवा, बाबा, महाराजाच्या संपर्कात असल्याचे दिसून येत नाही. मात्र त्यांनी चांगल्या धार्मिक लोकांचा सन्मान केला, मान दिला, पण भोंदूबाबाच्या पासून दूर राहिल्याचे दिसून येते. शरद पवार यांनी त्यांच्या सहा दशकांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत नेहमीच पुरोगामी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासला आहे. ते कधीही कोणत्याही भोंदूगिरी किंवा बुवा-बाबाजीच्या नादी लागलेले दिसले नाहीत. त्यांनी सार्वजनिक जीवनात अशा गोष्टींपासून स्वतःला नेहमीच लांब ठेवले आहे. ते स्वतःला नास्तिक म्हणवून घेत नाहीत, परंतु धर्माचे बाजारीकरण किंवा प्रदर्शन करणे त्यांना मान्य नाही. ते मंदिरात जातात, पण ती त्यांची वैयक्तिक आस्था असते. ते वारकरी संप्रदायाचे आणि संतांच्या उदा. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या मानवतावादी शिकवणुकीचे मोठे समर्थक आहेत. शरद पवार महाराष्ट्राच्या राजकारणात फुले-शाहू-आंबेडकर यांचा वैचारिक वारसा पुढे नेण्यावर अधिक भर दिला आहे. श्रद्धेपेक्षा कर्तृत्वावर त्यांचा जास्त विश्वास राहिला आहे.

समारोप:

शरद पवार यांनी आपली राजकीय आणि सामाजिक प्रतिमा नेहमीच एक तर्कनिष्ठ आणि आधुनिक विचारांचा नेता म्हणून जपली आहे. महाराष्ट्राच्या भूमीवर सहकार आणि शिक्षण क्षेत्रात प्रचंड क्रांती करणारा नेता म्हणून त्यांचे कार्य महत्त्वाचे असल्याचे दिसून येते. त्यांच्या व्यक्तित्वात व्यवहारिक नेतृत्व, संघटन आणि संवाद कौशल्य अतिशय प्रभावी असल्याचे दिसून येते. सामान्य जनता, कार्यकर्ते आणि विविध मतप्रवाहातील नेत्यांशी प्रभावी संवाद साधण्याची त्यांची ख्याती आहे. स्पष्ट आणि समतोल भाषणशैली तसेच माध्यमांशी संवाद-विश्वास निर्माण करते. त्यांच्या संवादशैलीत संयम आणि स्पष्टता दिसून येते. थेट संवाद आणि लोकांचे प्रश्न समजून घेण्याची कला प्रभावी नेतृत्वाची ती पूर्वअट असते, शरद पवार यांच्याकडे ही बाब इतरांपेक्षा अधिक असल्याचे

दिसून येते. शरद पवार यांच्याकडे परिस्थितीनुसार लवचिक आणि वास्तववादी आणि दूरगामी परिणामांचा विचार करून निर्णय घेण्याची क्षमता अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना हे त्याचे अधिक चांगले उदाहरण आहे. पक्षाची स्थापना केल्यानंतर आपल्या विस्तार मर्यादा ओळखून, विविध पक्षांसोबत आघाडी करून महाराष्ट्रात स्थिर सरकार स्थापन करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे दिसून येते. केंद्र आणि राज्याच्या राजकारणात यामुळे त्यांची भूमिका सतत मध्यवर्ती राहिल्याचे कोणीही नाकारू शकत नाही. त्यामुळे त्यांचे नेतृत्व अधिक प्रभावी आणि दूरदृष्टीचे असल्याचे सिद्ध होते.

संदर्भ साधने:

१. कोळेकर सूरज, (संपा) 'पहाटे झोपायला गेलो अन् खिडक्या हलल्या, शरद पवारांनी सांगितल्या किल्लारी भूकंपाच्या कटू आठवणी ,'महाराष्ट्र टाइम्सकॉम. ऑक्टोबर, २०२३.

२. कोणणूर महे, बीबीसी 'शरद पवार वयाची ८३ वर्षं, राजकारणाची ६४ वर्षं आणि ८ निर्णायक घटना ,२ मे ,२०२३.

३. शिंदे संदीप, दै. लोकमत किल्लारी भूकंपाने देशातील आपत्ती व्यवस्थापनाला गती, दिनांक ३० सप्टेंबर २०२३.

४. तांबे सुनील ,ॲग्रोवन ,'शरद पवारांनी कृषी मंत्री म्हणून....' १२ डिसेंबर ,२०२२.

५. पवार शर, लोक माझ्या संगती, राजहंस प्रकाशन, पुणे,डिसेंबर २०१५.

६. पटेल जब्बार, दै लोकमत ,'शरद पवार लोकशाहीची मुल्ये जपणारा सुसंस्कृत नेता, १२ डिसेंबर,२०२०.

७. भराडे श्रीकांत ,बीबीसी, नामविस्ता दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार लढ्याचे स्मरण कशासाठी?, १४ जानेवारी,२०१८.

८. वेबर मॅक्सइकॉनॉमी , अँड सोसायटी, पॉल सीबेक प्रकाशन,१९२२.

९. महाराष्ट्राचे महिला धोरणपहा, महिला व बालविकास विभाग ,वेबसाईट, महाराष्ट शासन , २०१४.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

ग्रामीण विकास आणि पंचायती राज संस्थांचे योगदान

प्रा. गिरीष रेवणसिद्ध पवार

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,

मुधोजी महाविद्यालय, फलटण

***Corresponding Author* - प्रा. गिरीष रेवणसिद्ध पवार**

DOI - 10.5281/zenodo.23524448

सारांश:

पंचायती राज संस्था भारताच्या ग्रामीण विकासाचा 'आत्मा' आहेत आणि विकेंद्रित लोकशाहीचा पाया आहेत. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर १९९२, घटनात्मक दर्जा मिळाल्यापासून या संस्थांनी ग्रामपंचायत विकास आराखडा, मनरेगा, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, स्वच्छ भारत मिशन, जल जीवन मिशन इत्यादी योजनांमध्ये थेट भूमिका बजावली आहे. मार्च 2025 पर्यंत 2,62,523 पंचायती राज संस्था कार्यरत आहेत (ग्रामपंचायती: 2,55,122; ग्रामपंचायती: 2,55,122; इंटरमीडिएट: 6,728; जिल्हा: 673). एकूण निवडून आलेले प्रतिनिधी: 24,14,943 (महिला: 1,169,896 - सुमारे 48.5%). स्वामित्व योजनेअंतर्गत, 3.10 कोटी ग्रामीण मालमत्ता कार्ड तयार करण्यात आली असून मार्च 2026 पर्यंत 2.65 कोटी मालमत्ता कार्ड वितरित करण्यात आली आहेत. आरजीएसए अंतर्गत 1.63 कोटींहून अधिक प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. विकास निर्देशांक 2024 नुसार, राष्ट्रीय सरासरी 43.89 आहे; सर्वाधिक: कर्नाटक (72.23), केरळ (70.59), तामिळनाडू (68.38). या संस्थांनी लोकसहभाग, पारदर्शकता, महिला सक्षमीकरण आणि शाश्वत विकास साध्य केले आहे, परंतु काही राज्यांमध्ये पूर्ण सत्ता, निधी, कर्मचारी विकेंद्रीकरण आणि निवडणुका पुढे ढकलण्याची आव्हाने आहेत.

बीजशब्द : पंचायत राज संस्था, 73 वी घटनादुरुस्ती, 11 वी अनुसूची, विकास निर्देशांक, जीपीडीपी, मनरेगा, स्वामित्व, आरजीएसए, एलएसडीजी, ईग्राम स्वराज, महिला सक्षमीकरण, ग्राम स्वराज, विकसित भारत.

प्रस्तावना:

भारताची 65% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण विकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी, घरकुले नव्हे तर आत्मनिर्भर गाव, सामाजिक न्याय आणि खऱ्या अर्थाने ग्राम स्वराज्य प्राप्त करणे आहे. स्वातंत्र्यानंतर, कलम 40 ने ग्रामपंचायती मजबूत करण्याचे निर्देश दिले, परंतु 73 व्या घटनादुरुस्तीद्वारे (24 एप्रिल 1993 पासून प्रभावी) घटनात्मक बळकटीकरण देण्यात आले. आज पंचायती राज संस्था २९ विषयांवर (११ वी अनुसूची) नियंत्रण ठेवतात आणि योजना राबवितात. 2025-26 मध्ये, 2.53 लाख ग्रामपंचायतींनी ई-ग्रामस्वराजवर विकास योजना अपलोड केल्या आणि 22,769 कोटी रुपयांची ऑनलाइन देयके देण्यात आली. या शोधनिबंधात या संस्थांच्या योगदानाचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

संशोधन पद्धती :

या शोधनिबंधात द्वितीय संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. सरकारी अहवाल, पंचायती राज मंत्रालयाच्या अधिकृत आकडेवारी (मार्च २०२५-२६ पर्यंत), ई-ग्रामस्वराज पोर्टल, विकास निर्देशांक, मनरेगा, स्वामित्व योजना इत्यादी योजनांच्या अधिकृत सांख्यिकीय माहितीचा वापर करून विश्लेषण केले आहे. ७३ व्या घटनादुरुस्ती, बळवंतराव मेहता व अशोक मेहता समिती अहवाल यांचा ऐतिहासिक अभ्यास तसेच राज्यनिहाय तुलनात्मक मूल्यांकन केले आहे. संदर्भित पुस्तके, प्रकाशित साहित्य आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरील उपलब्ध दस्तऐवजांवर आधारित गुणात्मक व परिमाणात्मक विश्लेषण केले आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :

1. ऐतिहासिक घडामोडींचा आणि ७३ व्या घटनादुरुस्तीचा सविस्तर अभ्यास.
2. त्रिस्तरीय रचना, २९ विषयांचे विश्लेषण व अधिकार.
3. प्रत्येक प्रमुख योजनेतून (मनरेगा, पीएमएवाय-जी, स्वामित्व, स्वच्छ भारत) पॉइंट-टू-पॉइंट योगदान आणि 2025-26 साठी आकडेवारी.
4. विकास निर्देशांक, ई-गव्हर्नन्स, आरजीएसए प्रशिक्षण आणि राज्यस्तरीय यश मूल्यांकन.

विषयाची पार्श्वभूमी :

प्राचीन गणसंघ आणि ग्रामसभांपासून ते ब्रिटिश काळातील उपेक्षित पंचायतींपर्यंत बळवंतराव मेहता (१९५७ – तीन स्तर), अशोक मेहता (१९७७ – दोन स्तर + पक्षीय सहभाग), एकल समिती (१९८९) यांनी पाया घातला. 73 व्या घटनादुरुस्तीने भाग IX (अनुच्छेद 243-243O) आणि 11 व्या अनुसूचीचा समावेश केला. राज्य निवडणूक आयोग, राज्य वित्त आयोग, ३३ टक्के (काही राज्यांमध्ये ५० टक्के) महिला आरक्षण अनिवार्य आहे. 2004 मध्ये पंचायती राज मंत्रालयाची स्थापना. राष्ट्रीय पंचायती राज दिन (24 एप्रिल) आज 10 पंचायत विस्तार क्षेत्र (पेसा) राज्यांमध्ये विशेष तरतुदी केल्या जात आहेत.

1. त्रिस्तरीय पंचायती राज संस्था :

भारतातील पंचायती राज व्यवस्था ही ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे (१९९२) त्रिस्तरीय लोकशाही रचनेवर आधारित आहे. यामध्ये गाव, तालुका आणि जिल्हा स्तरावरील संस्थांचा समावेश आहे. ग्रामसभा हा थेट लोकसहभागाचा मूलभूत घटक आहे. मार्च 2025 पर्यंत देशात एकूण **2,62,523 पंचायती राज संस्था** कार्यरत आहेत. • **ग्रामपंचायती** (गाव पातळी) – 2 55,122 • **पंचायत समिती** (केंद्रीय/गट पातळी) – 6,728 • **जिल्हा परिषद** (जिल्हा पातळी) – 673

या सर्व संस्थांमध्ये **निवडून आलेल्या प्रतिनिधी एकूण 24,14,943** आहेत, त्यापैकी **11,69,896 (**सुमारे 48.46%) महिला प्रतिनिधी आहेत. 73 व्या घटनादुरुस्तीनुसार, महिलांसाठी किमान एक तृतीयांश (33.3%) आरक्षण अनिवार्य आहे, तर 21 राज्ये आणि 2 केंद्रशासित प्रदेशांनी 50% आरक्षण लागू केले आहे. परिणामी, महिलांचे प्रतिनिधित्व 46 टक्क्यांहून अधिक झाले आहे.

राज्यनिहाय उदाहरण: • आंध्र प्रदेश - 55.43% महिला प्रतिनिधी • आसाम - 60.08% महिला प्रतिनिधी • उत्तर प्रदेश - 40.77% महिला प्रतिनिधी

काही राज्यांमध्ये पंचायत निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत किंवा संस्था बरखास्त

करण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ: • **कर्नाटक:** ग्रामपंचायत निवडणुका झाल्या आहेत , परंतु 2021 पासून ब्लॉक आणि जिल्हा पंचायत निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. • **तामिळनाडू** – डिसेंबर 2024 मध्ये संस्था विसर्जित झाली, अद्याप निवडणुका घेण्यात आल्या नाहीत. • **तेलंगणा** – मे 2024 मध्ये विसर्जित करण्यात आले, निवडणुका प्रलंबित आहेत. • **जम्मू आणि काश्मीर** – डिसेंबर 2023 मध्ये विसर्जित करण्यात आले, निवडणुका प्रलंबित आहेत.

2. कार्ये व अधिकार (11 वी अनुसूची-29 विषय) :

73 व्या घटनादुरुस्तीनुसार, अकराव्या अनुसूची अंतर्गत 29 विषय राज्यांना पंचायतींकडे हस्तांतरित करण्याची तरतूद आहे, ज्याद्वारे पंचायतींना आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी स्वायत्त अधिकार प्रदान केले आहेत. अकराव्या अनुसूचीअंतर्गत एकूण 29 विषयांवर नियंत्रण ठेवण्याचे व अंमलात आणण्याचे अधिकार पंचायती राज संस्थांना देण्यात आले आहेत. यामध्ये कृषी व कृषी विस्तार, भू सुधारणा, लघु सिंचन, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, कृषी व कृषी विस्तार, जमीन सुधारणा, लघु सिंचन, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, कृषी व कृषी विस्तार, भूमी सुधारणा, गौण सिंचन, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय आदी बाबी समाविष्ट आहेत.

ग्रामपंचायत विकास आराखडा ही अनिवार्य प्रक्रिया असून प्रत्येक ग्रामपंचायतीला ग्रामसभेच्या सहभागाने वार्षिक विकास आराखडा तयार करून तो ई-ग्राम स्वराज पोर्टलवर अपलोड करावा लागतो. 2024-25 या आर्थिक वर्षात, 93.43% ग्रामपंचायतींनी त्यांच्या योजनेचे अपलोडिंग पूर्ण केले आहे. ही योजना शाश्वत विकास उद्दिष्टे आणि स्थानिक शाश्वत विकास उद्दिष्टे यांच्याशी जोडलेली आहे.

इतर महत्त्वाचे अधिकार :

- **सामाजिक लेखापरीक्षण** – सामाजिक लेखापरीक्षण समितीद्वारे योजनांच्या अंमलबजावणीची पारदर्शक छाननी.
- **कर आकारणी** - मालमत्ता कर, व्यवसाय कर इ. सारखे स्थानिक कर आकारण्याचा अधिकार.
- **खरेदी** - सरकारी ई-मार्केटप्लेस पोर्टलद्वारे पारदर्शक आणि आर्थिक खरेदी.

या सर्वांमुळे पंचायतींचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण झाले आहे आणि ग्रामीण विकास, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरणात त्यांची प्रमुख भूमिका आहे. जीपीडीपी, सोशल ऑडिट आणि जीईएम सारख्या डिजिटल साधनांमुळे पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढले आहे.

३. ग्रामीण विकासात व्यावहारिक योगदान:

पंचायती राज संस्था ग्रामीण विकासाच्या केंद्रस्थानी आहेत आणि भारत सरकारच्या महत्वाकांक्षी योजनांच्या अंमलबजावणीत अंमलबजावणी, नियोजन, लाभार्थी निवड आणि पारदर्शकतेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात, ग्रामीण भागात जसे की रोजगार, गृहनिर्माण, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरण यासारख्या मूर्त बदल घडवून आणतात.

- **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) :** ग्रामपंचायतींच्या कामांना मंजुरी, कामाचे नियोजन, कामगारांची नोंदणी, कामाचे वाटप व गावपातळीवर सामाजिक लेखापरीक्षण या कामांमध्ये ग्रामपंचायती सक्रिय भूमिका बजावतात. पंचायत स्तरावर पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी ऑडिट, सार्वजनिक सुनावणी आणि डिजिटल ट्रॅकिंग (ई-

ग्रामस्वराजद्वारे) अनिवार्य आहे. 2024-25 मध्ये देशभरात 220.11 कोटी व्यक्ती-दिवस तयार करण्यात आले (जानेवारी 2025 पर्यंतची आकडेवारी; जानेवारी 2025 पर्यंतची आकडेवारी). संपूर्ण वर्षासाठी अधिक). ही योजना ग्रामीण मजुरांना 100 दिवसांच्या रोजगाराची हमी देते आणि जलसंधारण, रस्ते, कृषी सुधारणा इत्यादी कामे करून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करते. 2025-26 मध्ये, काही राज्यांमध्ये (उदा. उत्तराखंड, तेलंगणा) वैयक्तिक दिवसांमध्ये घट झाली (एप्रिल-सप्टेंबर 2025 मध्ये 11.7% घट), परंतु पंचायत स्तरावर पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढले आहे. काही राज्यांनी त्यांच्या स्वत: च्या निधीतून अतिरिक्त दिवस दिले.

- **प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (पीएमएवाय-जी):** लाभार्थी निवडीमध्ये ग्रामपंचायती महत्त्वाची भूमिका बजावतात (एसईसीसी डेटा, ग्रामसभा मंजूरी). या योजनेंतर्गत घरांचे मालकी हक्क प्रामुख्याने महिला किंवा संयुक्त (जोडीदार) यांच्या नावावर आहेत. ताज्या आकडेवारीनुसार, पीएमएवाय-जी अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांपैकी **74% घरे** ही महिलांच्या मालकीची (एकट्याने किंवा संयुक्तपणे) आहेत. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे, जे महिलांना मालमत्तेचे अधिकार, आर्थिक सुरक्षा आणि निर्णय घेण्याचे अधिकार देते.
- **स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) :** स्वच्छतागृहे बांधणे, पाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन आणि खुल्या दोषमुक्त (ओडीएफ) गावे घोषित करण्यात ग्रामपंचायती आघाडीवर आहेत. पंचायतींनी ग्रामसभांच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम राबवली, ज्यामुळे ग्रामीण भागात स्वच्छता आणि आरोग्य सुधारले.
- **स्वामित्व योजना:** ड्रोन सर्वेक्षणाद्वारे ग्रामीण भागातील मालमत्तांचे नकाशे तयार करून मालमत्ता कार्ड/मालमत्ता पत्र. हक्कांच्या नोंदी प्रदान केल्या आहेत. मार्च 2026 पर्यंत (11 मार्च 2026 पर्यंतची आकडेवारी): **3.10 कोटी** मालमत्ता कार्ड तयार झाले, **2.65 कोटी वितरित** करण्यात आले; 3.29 लाख गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षण पूर्ण झाले (लक्ष्य 3.44 लाख). उत्तर प्रदेशात **1.01 कोटी** कार्डांचे वाटप (1.15 कोटी तयार केले) यामुळे बँक कर्ज मिळवणे सोपे झाले, मालमत्तेचे वाद कमी झाले आणि गावकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण झाले.
- **शिक्षण आणि आरोग्य**: पंचायत माध्यान्ह भोजन योजना आखतात, शाळा व्यवस्थापन समिती (एसएमसी) चालवतात, शाळा सुधारणा करतात आणि कोविडच्या काळात (केरळ मॉडेलप्रमाणे) व्यवस्थापन करतात. आरोग्य केंद्र, आशा कार्यकर्त्या आणि लसीकरण मोहिमेत ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला.
- **महिला सक्षमीकरण:** 21 राज्ये आणि काही केंद्रशासित प्रदेशांमध्ये महिलांना 50% आरक्षण देऊन, महिला साप आणि प्रतिनिधींनी जलसंधारण (जल जीवन मिशन), शिक्षण मोहीम, स्वच्छता आणि आर्थिक उपक्रम यशस्वीरित्या राबविले. आरजीएसए (सुधारित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान) (डब्ल्यूईआर मॉड्यूल अंतर्गत 1

लाख+ विशेष प्रशिक्षण) अंतर्गत 2022-26 या कालावधीत **23**+ लाख महिला प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात आले. यामुळे महिलांची नेतृत्व क्षमता वाढली आहे.

4. डिजिटल क्रांती आणि क्षमता निर्मिती:

पंचायत राजमध्ये डिजिटल साधनांचा वापर वाढल्यामुळे पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता वाढली आहे.

- **ई ग्राम स्वराज + पीएफएमएस:** एक एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्म ज्यावर 2.64 लाख+ पंचायती योजना अपलोड, अंदाजपत्रक, खर्च आणि देय भरणा पाठपुरावा करण्यासाठी सहभागी आहेत. 2025-26 मध्ये**, रु. 22,769 कोटी रुपये (**पीएफएमएसच्या माध्यमातून थेट लाभार्थी/विक्रेत्यांना) देण्यात आले.
- **ऑडिट ऑनलाइन:** 95%+ ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण ऑनलाइन ऑडिट प्रणालीद्वारे पूर्ण झाले. त्यामुळे आर्थिक अनियमितता कमी झाली.
- **ग्राम मानचित्र:** जीपीडीपी (ग्रामपंचायत विकास योजना), संसाधन नियोजन आणि विकास प्रकल्प तयार करण्यासाठी वापरले जाणारे जीआयएस-आधारित मॅपिंग टूल.
- **आरजीएसए (2022-26):** क्षमता निर्माण कार्यक्रमांतर्गत 1.63 कोटी प्रतिनिधी आणि कर्मचारी प्रशिक्षित. "सशक्त पंचायत-नेत्री अभियान" आणि महिला स्नेही ग्राम मॉडेल अंतर्गत महिला प्रतिनिधींवर विशेष भर यामुळे पंचायती अधिक प्रभावी आणि सर्वसमावेशक झाल्या.
- **पंचायत प्रगती निर्देशांक (पीएआय**): पंचायतींच्या एकूण प्रगतीचे मूल्यांकन करणारा बहु-क्षेत्रीय निर्देशांक. 80.81% ग्रामपंचायतींनी डेटा सादर केला (नवीनतम उपलब्ध आकडेवारीनुसार). पीएआय 9 थीमवर (दारिद्र्य मुक्त, स्वच्छ, बालस्नेही इ.) आधारित आहे आणि राज्यांमध्ये स्पर्धात्मक सुधारणा घडवून आणते.

निष्कर्ष :

1. पंचायती राज संस्थांनी संस्थांनी स्वामित्व, ई-ग्राम स्वराज, आरजीएसए आणि एलएसडीजी सारख्या उपक्रमांद्वारे डिजिटल पारदर्शकता आणि सर्वसमावेशक विकास घडवून आणला आहे.
2. ग्रामीण भागात महिला सक्षमीकरण, स्वच्छता, रोजगार आणि मूलभूत सुविधांमध्ये पंचायती राज संस्थांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.
3. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर पंचायतींना घटनात्मक बळ मिळाले असून, ग्राम स्वराज्याच्या दिशेने मोठे पाऊल पडले आहे.
4. राज्य वित्त आयोग (SFC) च्या शिफारशींची त्वरित आणि पूर्ण अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.
5. पंचायत स्तरावर स्वतःचा महसूल (OSR) वाढवण्यासाठी प्रभावी उपाय योजणे आवश्यक आहे.
6. पंचायत प्रगती निर्देशांक (PI) वर आधारित पुरस्कार आणि प्रोत्साहन देऊन स्पर्धात्मक सुधारणा घडवणे महत्त्वाचे आहे.

संदर्भ :

English:

1. Dass, Arvind. *Panchayati Raj and Rural Development*. Discovery Publishing House, 2013.
2. Pal, Mahi. *Rural Local Governance and Development: Theories and Practices of Panchayati Raj Institutions in India*. Rawat Publications, 2026.
3. Sikligar, P. C. *Panchayati Raj and Rural Development: Policy, Practice and Implications*. Concept Publishing Company, 2023.
4. Sisodia, Yatindra Singh, et al., editors. *Two Decades of Panchayat Raj in India: Experiences, Issues, Challenges and Opportunities*. Rawat Publications, 2018.
5. Naik, V. Shriram. *Panchayat Raj and Rural Development in India*. Kalpaz Publications, 2018.

मराठी:

1. गांधी, महात्मा. *पंचायत राज*. नवजीवन प्रकाशन, २०२०. (मूळ लेखनावर आधारित मराठी आवृत्ती).
2. लावटे, किशोर. *पंचायतराज*. ज्ञानदीप अकादमी, ८ वी आवृत्ती, २०२४.
3. पवार, मीनाक्षी. *पंचायती राज और ग्रामीण विकास*. राधा पब्लिकेशन्स, २०१५. (हिंदी-मराठी संदर्भासाठी उपयुक्त).
4. बाबेल, बसंती लाल. *पंचायती राज एवं ग्रामीण विकास योजनाएं*. राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, २०२०. (मराठी संदर्भासाठी समकक्ष).
5. प्रभु, रा. के. *पंचायत राज*. नवजीवन प्रकाशन, मराठी आवृत्ती, २०१०.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत लोकनेते शरदचंद्र पवार साहेबांचा आवाज

प्रा. अमृता दिलीप पाटील

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर.

Corresponding Author - प्रा. अमृता दिलीप पाटील

DOI - 10.5281/zenodo.23524456

प्रस्तावना:

आपला भारत देश हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आणि आपली महाराष्ट्र भूमी ही थोर पुरुषांचा जन्म आणि त्यांच्या जीवनकार्याने समृद्ध झालेली आहे. याच मातीमध्ये क्रांतिकारकांनी आपले रक्त सांडले, याच मातीमध्ये स्वराज्याचे स्वप्न साकारले गेले आणि याच मातीमध्ये महाराष्ट्राच्या राजकारण्यांनी आपल्या परीने महाराष्ट्र भूमी ही सुपीक व पिकाऊ बनविली. इथल्या डोंगरदऱ्याखोऱ्यांनी भूगोल शिकविला .किल्ल्यांनी इतिहास घडविला.आणि इथल्या समाजसुधारकांनी शेतकरी वर्ग आणि त्यांची दुःख आपल्या वाणीतून आणि आपल्या वाङ्मयातून मांडले. स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या" **शेतकऱ्यांचा आसूड**" या ग्रंथातून शेतकऱ्यांची दयनीय परिस्थिती, त्यांचे कष्ट, त्यांना येणाऱ्या अडचणी या अधिक स्पष्टपणे जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला.आपल्या महाराष्ट्राच्या मातीमध्ये काबाडकष्ट करणारा शेतकरी हा दिवस-रात्र कष्ट करून आपली काळी आई (जमीन/शेतीत) राबत असतो आणि एक दिवस याच मातीतून सोने पिकवितो.असा आपला सामान्य शेतकरी,त्यांचे जीवन हे आपल्या दैनंदिन परिचयाचे असून या शेतकरी वर्गास पाठिंबा देणारा राजकारणी कुशल नेता आपल्या महाराष्ट्रभूमीला लाभला हे आपले भाग्यच! महात्मा ज्योतिबा फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये तसेच एका शेतकरी कुटुंबात जन्मास आलेला,स्वतः शेती करणारा तसेच एक मुत्सद्दी, विवेकशील, बुद्धीवादी, पुरोगामी व्यक्तीमत्त्व म्हणजे "**लोकनेते शरदचंद्र पवार साहेब**" यांच्या शेती विषयक, इथल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत शरद पवारांची असणारी भूमिका व शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत उठविलेला आवाज याबद्दल आपण अधिक विवेचन करणार आहोत.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शेतीबद्दल उद्भवणाऱ्या प्रश्नाबाबत किंवा समस्यांबाबतचा अभ्यास करणे.
२. लोकनेते शरदचंद्र पवार साहेब यांच्या शेतकऱ्यांच्या शेतीविषयक कार्याचा आढावा घेणे.
३. लोकनेते शरदचंद्र पवार साहेब व शेतकऱ्यांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेणे.
४. शेतकऱ्यांच्या अडचणींवर मात करणे.

५. शेतकऱ्यांना मिळालेल्या योजनांचा लाभ, त्यांना झालेला फायदा जाणून घेणे.

लोकनेते शरदचंद्र पवार साहेब:

शरदचंद्र पवार साहेब यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात बारामती येथे १२ डिसेंबर १९४० रोजी झाला. आईचे नाव शारदाबाई तर वडिलांचे नाव गोविंदराव होय. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील 'नांदगाव'. गोविंदराव उंच धिप्पाडनिरोगी,, साधी राहणी उच्च विचारसरणी या तत्त्वाप्रमाणे राहणीमान असणारे, शेती व नोकरी सांभाळून सहकारी चळवळीत कार्यशील होते. तर आई शारदाबाई काबाडकष्ट करणाऱ्या त्या शेतात मशागत,पिकांची देखभल करत तसेच. जो शेतमाल आहे तो स्वतः बाजारात विकून संसाराचा गाडा हाकणाऱ्या होत्या. आईचे कष्ट साहेबांनी अगदी जवळून पाहिले होते.गोविंद रावांनी शारदाबाईंना राजकीय क्षेत्रातही काम करण्यात प्रोत्साहित केले. त्यामुळे पुढे पुणे जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीत त्या लोकल बोर्डाच्या प्रथम महिला सदस्य म्हणून निवडून आल्या. शारदाबाई या आपल्या मुलांना एक कान मंत्र सांगत.

'उतू नका, मातू नका, घेतलेला माणुसकीचा वसा कधीही टाकू नका.'

या आधुनिक विचारसरणीच्या आई-वडिलांकडून शेतीविषयक व राजकारण विषय बाळकडू घेतल्याने त्यांचा प्रभाव शरदचंद्र पवार साहेबांवर पडल्याने इथल्या शेतकरी, त्यांच्या समस्या पवार साहेबांना अधिक जवळून पाहता आल्या. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारसरणीचा प्रभाव साहेबांवरती पडला होता. चव्हाण साहेबांच्या उपस्थितीत पवार साहेबांनी राजकारणात प्रवेश केला. त्यांच्या अलौकिक कामगिरीने ते सलग चार वेळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री बनले. व पुढे देशाचे केंद्रीय कृषीमंत्री बनले.

कर्तुत्ववान शेतकरी:

शरदचंद्र पवार साहेब कर्तुत्ववान शेतकरी शेतकरी होते. त्यांना नेहमी इथला शेतकरी समाज व शेतीबद्दल कायमच आस्था वाटत आली आहे.शेतकरी खऱ्या अर्थाने आपला देश बदलू शकतो.तसेच देशाचा भाग्यविधाता शेतकरीच असून तो या देशाचा 'अन्नपोशिंदा'असल्याचे त्यांचे मत होते. पवार साहेबांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुधारित पद्धतीने बारामती सारख्या दुष्काळ भागात शेती करून शेतकऱ्यांपुढे एक आदर्श निर्माण केला व तेथे आधुनिक पद्धतीने स्वतः बाग फुलविली. ही बाग बारामती येथे" **गोविंद बाग** "या नावाने उभी केली. तसेच बारामती येथे स्वतः जमीन घेऊन शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग आधुनिक पद्धतीने करण्यास सुरुवात केली व या प्रयोगाच्या माध्यमातून भरघोस उत्पन्न कसे काढता येईल याचा विचार साहेब नियमित करत आणि त्यांच्या प्रयत्नांची पराकाष्ठा शेती क्षेत्रात आदर्श ठरविणारी होती. शेतीचा विकास आधुनिक पद्धतीने घडवून आणण्यासाठी त्यांनी कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे एक प्रगत शेतकरी या नात्याने आपल्या शेतात स्वतः राबविली. राजकारण सांभाळून सुद्धा स्वतःची अशी शेतकरी प्रतिष्ठाही त्यांनी नेहमी जपली. दुष्काळ भाग असूनही त्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करून शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला. शरद पवार साहेबांनी नेहमी इथला शेतकरी व त्याचे जीवन कसे समृद्ध बनेल याविषयी सतत विचार केला.

यामुळे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी झगडणारा नेता अशी शरद पवार साहेबांची राष्ट्रीय प्रतिमा तयार झाली.

" तू सागर करूनेचा तुजलाची दुःख सांगावेI
तुजवाचून इतरांचे दिनमुख पसरुनी काय मागावे II"

लोकनेते शरदचंद्र पवार साहेब व शेतकऱ्यांसमोरील अडचणी, प्रश्न:

मा. शरदचंद्र पवार साहेब सत्तेवर आले असताना त्यांनी राज्यातील शेतीला चांगला दर्जा व चांगले दिवस दाखविले. राजकारणी व्यक्ती ही एक तर उत्तम राजकारण तरी करू शकते किंवा समाजकारण तरी करू शकते पण साहेबांनी राजकारणाबरोबरच समाजकारणकेले. एका शेतकरी कुटुंबात जन्मास येऊन आपल्या आई सोबत काबाडकष्ट करणारे शेतकरी बांधवांचे कष्ट समजून घेणारे नेते असल्याने त्यामुळे शेतीला चांगले दिवस आले. त्यावेळी राज्यातील काही भागांत शेतकऱ्यांना अनेक बाबतीत अडचणी होत्या. कारण एक उत्तम शेतकरी हाच शेतकऱ्यांचे दुःख समजून घेऊ शकतो. असा प्रत्यक्ष अनुभव साहेबांचा होता. शरद पवार साहेब सत्तेमध्ये असताना साहेबांसमोर शेतकऱ्यांच्या शेतीसंबंधी बऱ्याच अडचणी व समस्या होत्या. त्या समस्या पुढील प्रमाणे :

दुष्काळाचे सावट: नगर जिल्ह्यात सर्वत्र ठिकाणी दुष्काळाचे सावट होते. लोकांना अन्नधान्य मिळणे अवघड होते, जनावरांना शेतीसाठी पाणी व जनावरांसाठी चारापाणी मिळणे अवघड होते, तसेच शेतकऱ्यांना शेतातून पाण्याअभावी अन्नधान्य पिकविणे अवघड होते.

अनियमित पाऊस: राज्यातील पाऊस आणि पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून असल्यामुळे शेतकऱ्यांना पावसाची वाट बघावी लागे. पाऊस पडला तरच पेरणी होते . पाऊस वेळेअवेळी पडल्यामुळे शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान होते. अवकाळी पावसामुळे ऐनवेळी पिके हातातोंडाशी आली असताना वादळी वारा व पाऊस यामुळे पिकांची नासाडी होत असे. तसेच फळबागांची ही नासधूस होत असे.

शेतमालासाठी लागणाऱ्या आवश्यक वस्तूंच्या तुटवडा व शेतकऱ्यांचे अज्ञान:

महाराष्ट्रातील शेतकरी आधुनिक पद्धतीने शेती करण्याऐवजी जुन्या पद्धतीने जुन्या अवजारांच्या सहाय्याने शेती करण्यामुळे अन्नधान्य उत्पादन कमी होत असे. तसेच शेतमालासाठी लागणारे बियाणे, अवजारे यांचा साठा कमी असल्यामुळे व ग्रामीण भागातील शेतकरी यांना आधुनिक पद्धतीने शेती करावयाच्या यंत्रांची माहिती नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडाणीपणामुळे सुद्धा शेतीसाठी लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचा तुटवडा भासत असे. तसेच नवीन पद्धतीच्या संकरित बि-बियाणं वापरून अतिरिक्त धान्य पिकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेता येते याबाबत शेतकऱ्यांचे असणारे गैरसमज ही याला जबाबदार होते. तसेच बी -बियाणे, पाणी, खते,अवजारे या शेती करण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचा तुटवडा असल्याने काही प्रसंगी शेतकऱ्यांचा माल वेळेत व सुखरूप बाजारपेठेत न पोहोचल्याने त्यांच्या शेतमालाचे नुकसान होते असे.

पाणी तुटवडा:

शेतीच्या बाबतीत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतीला लागणारे पाणी. आणि शेती पिकविण्यासाठी शेतकरी विहिरी आणि पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने पाण्याअभावी शेती पडीक राहत असे. तसेच विहिरी, कालवे, तलाव यांची संख्या मर्यादित असल्यामुळे सुद्धा शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचा तुटवडा

भासत असे. पाऊस न पडल्याने तसेच विहिरीतील पाणी आटल्याने परिणामी शेतकऱ्यांना धान्य पिकविणे अवघड होत असे .तसेच जनावरांना चारा पाण्याची सुद्धा सोय होत नसे. यामुळे शेतकरी हा बेकार व दरिद्री अवस्थेमध्ये जगत असे. प्रसंगी कुटुंबाची उपासमार होत असे.

बाजारभावानुसार अन्नधान्य वस्तूंना कमी भाव:

भारतातील जो कच्चा माल आहे तो परदेशी पाठवून परदेशातून पक्का मालाची आयात केली जाते. मात्र निर्यातीपेक्षा आयातच जास्त असल्याने शेतीवरील बोजा व कर्ज वाढत असे. जो जो कच्चा माल परदेशी पाठवला जाई तो सुद्धा तुटपुंजा असल्याने त्यामधून शेतकऱ्यांना फारच कमी नफा मिळत मिळे. भारतातील कच्च्या मालाचा वापर करून पक्का माल तयार करण्याबाबत लोकांमध्ये असलेले अज्ञानामुळे तसेच उद्योगधंद्यांची संख्या कमी असल्याने बाजारपेठेमध्ये अन्नधान्य वस्तूंना कमी भाव मिळाल्याने शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात तोटा होत असे.

लोकनेते शरदचंद्र पवार साहेब यांचे शेतकरी समस्यांवरील उपाय, प्रश्नांवरील तोडगा:

शरद पवार साहेबांनी शेतकऱ्यांना शेतीमध्ये ज्या ज्या अडचणी येतात त्या अडचनींसाठी विविध उपक्रम हाती घेतले व उपक्रमांच्या आधारे शेतीमध्ये अनेक प्रकारचे बदल घडवून आणले. हे उपक्रम पुढीलप्रमाणे.

शेतकरी दिंडी:

महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या **'शेतकऱ्यांचा आसूड'** या ग्रंथात देशातील दरिद्री व अज्ञानी शेतकऱ्यांच्या हलाखीची परिस्थिती मांडली असून ब्राह्मण,व वरिष्ठ सरदार, उमराव हे लोक गरीब शेतकरी यांना कसे लुबाडत असे याविषयी सविस्तर विवेचन केले आहे.आणि त्यातून शेतकऱ्यांच्या बचावासाठी त्यांनी हा ग्रंथ लिहिला. त्यांनी आपल्या ग्रंथात सर्व प्रकारचे अज्ञान दूर करून संघटित झाले पाहिजे अशी त्यांची विचारधारा आणि त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून लोकनेते शरद पवार साहेबांनी महाराष्ट्रातील गरीब शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी शेतकऱ्यांच्या ज्या मागण्या आहेत त्या सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी त्या मागण्यांचा जाहीरनामा काढून सरकारी दरबारापर्यंत शांततेच्या मार्गाने सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी शेतकरी दिंडीचे आयोजन केले आणि हे आयोजन जळगाव ते नागपूर या मार्गावर होते.

या दिंडीचे स्वरूप जसे वारकरी संप्रदाय आपले गाऱ्हाणे घेऊन पंढरपुरात विठ्ठलाकडे साकडे घालतात त्याचप्रमाणे या दिंडीमध्ये कोणत्याही हिंसक मार्गाचा अवलंबून न करता शांततेच्या मार्गाने घोषणा देत आया बहिणी आपले गीतांमधून शरद पवार साहेबांचा जय जय करत आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांचा आग्रह सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी हा मार्ग धरला. सुरुवातीला या दिंडीमधील शेतकऱ्यांची संख्या कमी होती वाटेमध्ये अनेक शेतकरी या दिंडीमध्ये सामील झाले .मात्र सरकारने याकडे दुर्लक्ष केले त्यावेळी शेतकऱ्यांनी आपला मोर्चा अधिकच वाढविला परिणामी सरकारला शेतकऱ्यांच्या प्रश्नांची ,मागण्यांची दखल घ्यावीच लागली.या शेतकरी दिंडीमध्ये शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी त्यांनी पाठपुरावा केला.या दिंडीचा उद्देश म्हणजे सरकारी दरबारात शेतकऱ्यांच्या अडचणी, परिस्थिती मांडणे. शेतकरी दिंडीतील शेतकऱ्यांच्या मागण्या पुढील प्रमाणे.

- जो शेती करणारा किंवा इतरांच्या शेतीमध्ये मजूर म्हणून काम करणारा शेतकरी वर्ग आहे त्याला किमान वेतन मोबदला मिळाला पाहिजे.

- दुष्काळ भाग असो किंवा ज्या भागामध्ये जास्त पाऊस पडतो व शेतीचे नुकसान होत आहे. अशा शेतकऱ्यांना शेतीमध्ये सवलती मिळाल्या पाहिजेत आणि शासनाने स्वतः त्यांना आर्थिक मदत केली पाहिजे.
- ज्या शेतकऱ्यांनी पिकांचे उत्पादन घेतले आहे, त्या पिकांचा जो खर्च आला त्या आधारे त्यांचा जो शेतीमधील माल आहे त्याला योग्य तो बाजारभाव मिळायला पाहिजे.

या सर्व सवलतींचा उद्देश एकच होता की, शेतकऱ्यांना आपल्या शेतीविषयक गरजांसाठी पतपुरवठाद्वारे शेती अवजारे किंवा बी बियाणे खरेदी करण्यासाठी या पतपेढीतून कर्ज मिळावे व तेही ठराविक मुदतीत, व कमी व्याजाने. याशिवाय शेतकऱ्यांच्या शेतीमालाला चांगला भाव मिळावा जेणेकरून शेतकऱ्यांना शेतामधून अधिक उत्पन्न वाढविण्यास प्रोत्साहन मिळेल. शेतकऱ्यांना शेती पिकविण्यामध्ये कोणतीही अडचण येऊ नये यामुळे शेतकऱ्यांच्या सुखासाठी झगडणारा त्यांच्या कल्याणासाठी जगणारा असा नेता अशी लोकनेते शरद पवार साहेबांची प्रतिमा जनतेच्या मनामध्ये तयार झाली.

बारामती पॅटर्न पुन्हा लागू :

लोकनेते शरदचंद्र पवार साहेबांनी बारामती मध्ये दुष्काळ भागात जे कार्य केले ते कौतुकास्पद आहे. येथील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बायोटेक्नॉलॉजीच्या सहाय्याने नवीन बियाणांचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले, शेतीची धारणा कशी असावी शेतीचा वापर कोणत्या कारणासाठी करावा. दुष्काळी भागात किंवा कोरडवाहू जमिनीवर कमी पाण्याचा वापर करून जे धान्य घेता येईल याबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती घडवून आणली.

फळबाग पिके लागवडीस प्राधान्य:

कमी पावसात त कमी पाण्यावर फळांची लागवड कशी करावी व फळ उत्पादनासाठी शेतकऱ्यांना प्राधान्य देऊन फळांच्या लागवडीतून सुद्धा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नफा होतो याचेही शेतकऱ्यांना ज्ञान दिले आणि त्यासंदर्भात फलोत्पादन प्रक्रिया त्यासाठी लागणारे आवश्यक ते फळबियाणे तसेच फळ उत्पादन प्रक्रिया करणारे उद्योगाविषयी मार्गदर्शन केले. परिणाम भारत हा फळ निर्यातीमध्ये अग्रणी स्थानावर पोहोचला.

पाझर तलाव:

शरद पवार साहेब जेव्हा राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते त्यावेळी बारामती तालुक्यात अनेक विधायक कामे त्यांनी हाती घेतली तसेच बारामती येथील तांदळवाडी येथे पहिला पाझर तलाव करण्याचा निर्णय घेतला त्यासाठी त्यांनी गावातील लोकांच्या सहकार्याने हे काम सहा महिन्यात पूर्ण केले पहिल्याच पावसाने हा तलाव पूर्ण भरला. युनेस्कोच्या टीमने पवार साहेबांच्या कामाचे कौतुक केले त्यामुळे बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांना पाण्याचा मुबलक साठा निर्माण होऊन शेतकऱ्यांना शेतीकामांमध्ये पाण्याचा वापर होऊन अन्नधान्य पीक उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाऊ लागले अनेक राजकारणी व्यक्तींनी शरद पवार साहेबांचे कौतुक व अभिनंदन केले. बारामती सारखा दुष्काळ भाग ही त्यांच्या या कार्याने सुपीक, सुफळ व हरित झाला. हे काम शेतकऱ्यांच्या हिताचे असल्याने शेतकरी वर्गामध्ये समाधानकारक वातावरण निर्माण झाले. बारामतीतील शेतकरी शरद पवार साहेबांच्या नेहमी पाठीशी उभे राहिले.

शेतीबरोबर जोडव्यवसायांनाही प्राधान्य:

साहेबांनी शेतीवरील भार कमी करण्यासाठी शेतीबरोबर शेतीच्या जोड व्यवसायाबद्दल ही शेतकऱ्यांना कल्पना दिली.संकरित पैदास करून त्यांची जोपासना करण्याचा मंत्र दिला. घर तेथे **'संकरित गाय'** हा उपक्रम राबवून आर्थिक विकासाचा पाया घातला. त्याचबरोबर कुकुटपालन, शेळी- मेंढी पालन, तसेच शेतकऱ्यांना आपल्याकडे शेती उत्पादने चांगली असून निसर्गसंपन्नता, पोषक हवामान आणि अनुकूल संपत्तीही आपल्याला लाभली असल्याचे सांगून त्यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांनी या संपत्तीचा वापर करून शेतामध्ये भरपूर उत्पादन काढावे यासाठी आवाहन केले. दुग्ध व्यवसाय, कोंबडी पालन,पशुपालन तसेच शेती क्षेत्राशी नियोजनबद्ध विकास करण्यासाठी काही शेती धंद्यास पायाभूत सवलती ही दिल्या होत्या. साहेबांनी तालुक्यात '**धवलक्रांती**' ही घडवून आणली.

लोकनेते शरदचंद्र पवार साहेब यांचे केंद्रीय कृषिमंत्री पद:

लोकनेते शरदचंद्र पवार साहेब सन २००४ मध्ये महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री म्हणून निवडून आले.शेतकऱ्यांच्या कल्याणाचा सतत विचार करणारे आणि त्यांच्या सुख दुःखात सामील होणारे,शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन शेती विषयी अवदाद्य दाखवणारे, शेतीवर नितांत प्रेम करणारे, शेतकऱ्यांच्या हिताचा सतत विचार करणारे. शेतीतून नंदनवन फुलवणारे लोकनेते शरदचंद्र पवार साहेब आपल्या महाराष्ट्र भूमीला 'कृषिमंत्री' म्हणून लाभले खरंतर हे आपले भाग्यच! . शेतीमध्ये नवनवीन प्रयोगसंशोधन,, कृषी विषयक शिक्षण व विस्तार कार्याला त्यांनी अधिकच बळकटी दिली. कृषी मालाच्या उत्पादन खर्चाच्या आधारे परवडणारे भाव अशा अनेक कार्यक्रमांचा समावेश पवार साहेबांनी केल्यामुळे कृषी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर भरभराट घडून आली. कृषिमंत्री झाल्यापासून साहेबांनी आधी शेतकऱ्यांची जीवन प्रणाली त्यांना, शेतीमध्ये येणाऱ्या अडचणी समजून घेतल्या. त्यांची विचारधारा म्हणजे"**आधी केले मग सांगितले** "ही होती. प्रामुख्याने सेंद्रिय शेतीलाच प्रोत्साहन दिले. नव्या युगातील तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन तंत्रज्ञानाची माहिती देण्याचा व्यापक कार्यक्रम गाव पातळीपर्यंत शेतकऱ्यांसाठी हाती घेतला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी नवनवीन योजना आखल्या. कृषी मंत्री म्हणून वावरताना फक्त त्याचे शेतावरती प्रेम असून जमत नाही तर तो प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतातल्या खळ्यात तसेच शेतातील बांधावर वावरणारा किंवा रात्रीचा दिवस करणारा आणि काबाडकष्ट करून शेती पिकविणारा असावा लागतो. शरद पवारांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे शोधून सुद्धा त्यावरती उपाय योजना सुचवण्याचा सुद्धा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला.

- कृषिमंत्री असताना शरद पवारांनी प्रामुख्याने शेतीला पूरक जोडधंदे , मत्स्य व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, शेतामध्ये विविध पिकांची लागवड तसेच शेती पिकांसाठी लागेल ती मदत केली. बी-बियाणे व अवजारांसाठी कर्ज पुरवठ्यामध्ये वाढ होण्यासाठी प्रयत्न केले.
- कृषिमंत्री झाल्यापासून पवार साहेबांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुद्धा शेतीसाठी पाणी वेळेत मिळावे तसेच मृदाविकासाकडे लक्ष देण्यास प्रवृत्त केले. शेतामध्ये रासायनिक खतांचा वापर कमी करून जैविक सेंद्रिय खते वापरण्यास जागृत केले.

- राष्ट्रीय अन्नसुरक्षा मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले.

अशा या थोर नेत्याचा आतला आवाज पुढीलप्रमाणे..

"तुमच्याकडे उत्तमोत्तम बियाणे असेल पण
तुमची शेत जमीन मशागत केलेली नसेल तर
बीजांकुरण कसे होणार ?
तुम्ही जागरूक आणि कृतिशील असायलाच हवे
तरच हाती काही प्राप्त होईल."

लोकनेते शरदचंद्र पवार साहेब

निष्कर्ष:

१. या शोधनिबंधाच्या आधारे शेतकऱ्यांच्या समस्यांचा आपणास जवळून अभ्यास करता आला.
२. या शोधनिबंधाच्या आधारे शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत लोकनेते पवार साहेबांनी शेतकऱ्यांच्या हिताचे, शेतीच्या हिताचे केलेले कार्य जाणून घेता आले.
३. लोकनेते शरदचंद्र पवार साहेबांनी आखलेल्या शेतीविषयक धोरणाचा शेतकऱ्यांना कसा लाभ घेता आला हे जाणले.
४. साहेबांनी बारामती सारख्या दुष्काळ भागात जलसंजीवनी चे कार्य करून दुष्काळ भाग हा हरित केल्याने त्याचा फायदा शेतकरी व दुष्काळग्रस्त लोकांनाही घेता आला. याचा आढावा घेता आला.
५. भविष्य काळामध्ये शेतीच्या व शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने यशस्वी राजकारणी नेता जर का आपल्या महाराष्ट्र भूमीला लाभला तर साहेबांप्रमाणेच नक्कीच शेतीचा कायापालट होऊन आपला भारत देश जागतिक पातळीवर स्वयंपूर्ण व आघाडीचा निर्यातकारक देश म्हणून नावलौकिक आलेला पहावयास मिळेल.

संदर्भ ग्रंथ:

१. अँड. राम कांडगे (२०१२), लोकनेते शरदराव पवार, राजश्री प्रकाशन चाकण, पुणे. पृ.क्र.८७, ६५, २०५, ४४७, ४६६.
२. डॉ. सहदेव चौगुले - शिंदे (२०१२) ,पाथेय - भाग १, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर. पृ.क्र.१३५.
३. श्री धनंजय कीर ,डॉ. स.ग.मालशे व डॉक्टर य.दी फडके,(१९९१) महात्मा फुले समग्र वाड्मय, शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे. पृ.क्र.८७, ३०६.
४. दिपाली मिरजकर (कराडकर) (२०१३), थोर लोकांचा आतला आवाज, नाग-नालंदा प्रकाशन, विशाल नगर इस्लामपूर.पृ.क्र.७.
५. डॉ. यशराज पालखी, शरद पवार (पॉवर नीती), विश्वशक्ती इंटरनॅशनल फाउंडेशन, पुणे. पृ. क्र.६८, २०९.
६. सुहास कुलकर्णी , मिलिंद चंपानेरकर, (२०१३),असा घडला भारत, रोहन प्रकाशन, पुणे.पृ. क्र.६७७.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

शेतकरीविषयक धोरणांतील पद्मविभूषण शरद पवार यांचे योगदान

डॉ. सुशील शिंदे[1], श्री. विष्णू मनोहर गावडे[2]

[1]*सहयोगी प्राध्यापक (राज्यशास्त्र), क.भा.पा.पाटील महाविद्यालय, पंढरपूर(स्वायत्त)*

[2]*पीएच.डी. संशोधक विद्यार्थी*

***Corresponding Author* - डॉ. सुशील शिंदे**

DOI - 10.5281/zenodo.23524468

सारांश:

शरद पवार यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला असल्याने त्यांना शेतकऱ्यांचे शोषण आणि दारिद्र्य यांची जाणीव होती. शेतकरी पिढ्यान पिढ्या अज्ञान, अंधश्रद्धा, सावकारी पास यामुळे नागावला जात असताना त्याला समाज सुधारण्याच्या केंद्रस्थानी मानून सर्वांगीण उन्नतीचे ध्येय-धोरणातून प्रस्तुत केला आहे. शेती आणि शेतकरी अर्थव्यवस्थेतील विकासाचा महत्त्वपूर्ण घटक असल्याने त्या संदर्भात त्यांनी त्यांच्या कार्यकाळात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. महाराष्ट्रातील लोकांना विकासात समान संधी देण्यासाठी मुख्यमंत्री असताना ४० कलमी कार्यक्रमाची योजना आखून त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. अल्पभूधारक शेतकऱ्यांना विहिरीसाठी अनुदान, बिनव्याजी कर्ज, शेतकऱ्यांच्या बैल कडबा इत्यादीसाठी घेतलेले 'तगई' कर्जाची संपूर्ण रक्कम व दंडात्मक व्याज माफ करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. शेतकऱ्यांच्या वीजबिल आकारात सुधारणा केली. 'खारभूमी विकास कायदा' केला. खार जमीन विकासाची कामे रोजगार हमी योजनेअंतर्गत पूर्ण करण्याचे धोरण आखत त्यांनी त्याची यशस्वी अंमलबजावणी केल्याचे त्यांच्या धोरणातून दिसते. शेती क्षेत्राविषयी ते स्थितप्रज्ञ व सुधारणावादी होते.

शरद पवार २००४-२०१४ या कालावधीत भारताचे कृषिमंत्री होते. शेती, शेतकरी आणि ग्रामीण विकास या त्रिसूत्रीचा सर्वांगीण विकास केंद्रभूत मानून ध्येय धोरणे आखली. आखलेल्या ध्येय धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची भूमिका त्यांनी पार पाडली. या ध्येय धोरणामध्ये पारंपरिक शेतीला पर्यायी आधुनिक शेती व तंत्रज्ञान, शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला किमान हमीभाव, शेतकऱ्यांना माफक दरात पतपुरवठा, फळ लागवड धोरण, शेती संस्थांचे विस्तारीकरण, शेतमालाची आयात निर्यातीचे धोरण, शेती क्षेत्रातील परकीय भांडवल गुंतवणूक, ग्रामीण रोजगार निर्मिती, ग्रामीण भागात पायाभूत सुविधा, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविणे इत्यादी धोरणांचा समावेश करून कृषी क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामगिरीची नियोजन व धोरणे प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून केले आहे.

बीज शब्द (Key Words): पारंपरिक शेती, सावकार, अज्ञान, दारिद्र्य, अवर्षण, स्थितीप्रज्ञता, शिक्षण, शेती सक्षमीकरण, ओनामा, तगई.

प्रस्तावना:

शरद पवार यांना शेतकरी वर्गाबद्दल आस्था आहे. शेतकरी वर्गाबरोबर बहुजन समाजातील कष्टकरी शेतकरी वर्गाच्या सर्वांगीण विकासाचा त्यांनी आपल्या धोरणात अंतर्भाव केलेला आहे. त्यामुळे त्यांनी शेती, शेतकरी व ग्रामीण विकास यांना केंद्रभूत मानले होते. त्यांच्यावर होणारा अन्याय यापासून मुक्तता करण्याबाबत व्यापक चिंतन करून वैचारिक, व्यवहारिक, राजकीय भूमिका घेतलेली दिसते. शरद पवार यांच्यावर शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा प्रभाव जाणवतो. त्यांनी शाहू, फुले, आंबेडकरांचा वारसा जपल्याचे दिसते. ते यशवंतराव चव्हाण यांना आपले गुरु मानतात. त्यांनी 'लोक माझे सांगाती' या आत्मचरित्रातून राजकीय, सामाजिक व ऐतिहासिक परिस्थितीची मांडणी केली आहे. तसेच आई शारदाबाई गोविंदराव पवार यांचाही त्यांच्यावर विशेष प्रभाव आढळतो.

'हाऊ टू विन फ्रेंड्स अँड इन्फ्लुन्स पीपल' या जगप्रसिद्ध पुस्तकाचे लेखक डेल कार्नेगी यांचा शरद पवार यांच्या राजकीय प्रवासावर विशेष प्रभाव दिसून येतो. त्याचबरोबर यशवंतराव चव्हाण यांचे 'कृष्णाकाठ' सामाजिक आणि राजकीय विचार, महात्मा गांधी यांच्या 'सत्य आणि अहिंसेचे विचार', जवाहरलाल नेहरू यांच्या 'डिस्कवरी ऑफ इंडिया' या आधुनिक भारताचा इतिहास इत्यादी प्रगतशील आणि सुधारणावादी पुस्तकांचा त्यांचावर प्रभाव दिसतो.

शेती, शेतकरी व शेती क्षेत्राची उन्नती झाल्याशिवाय व्यापक सामाजिक हित साधता येणार नाही! अशी महात्मा फुले यांच्या विचारांची धारणा आहे. याच धारणेचा अवलंब शरद पवार करताना दिसतात. त्यांच्या कृतिशील विचारांचा हाच मूलभूत धागा आहे. याच भूमिकेतून जगाचा पोशिंदा म्हणजे शेतकरी होय. 'शेतकरी सुखी तर जग सुखी' यानुसार शेतकऱ्यांना केंद्रभूत म्हणून राजकीय ध्येयधोरण आखण्यात यावीत हा त्यांचा अट्टाहास त्यांच्या शेती क्षेत्राशी संबंधित दिसून येतो. त्यामुळे ही वास्तवादी शेती, शेतकरी व ग्रामीण विकास यांची कल्पना समाजापुढे मांडून त्याप्रमाणे ध्येय धोरणे व त्याची अंमलबजावणी याच्यावर भर दिलेला दिसतो.

शेतकरी हा समाजाचा मूलाधार:

शेती व्यवसाय हाच भारतीयांच्या उदरनिर्वाचे मुख्य साधन आहे. त्यामुळे शेतकरी हा अर्थव्यवस्था आणि समाजाच्या केंद्रस्थानी आहे. सबंध समाजाच्या मूलभूत गरजा शेतीवरच भागतात. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष लक्ष दिले पाहिजे, असा शरद पवार यांचा आग्रह आहे. त्यासंबंधी विस्तृत निवेदन ही त्यांनी शासनाला दिलेली आहेत. शेतकरी वर्गाला अज्ञानाच्या अंधःकारातून पर्यायाने गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्याची निकड त्यांनी व्यक्त केली होती. या संदर्भात हरी नरके लिहितात, "कोणत्याही देशाचे मूलभूत आधारस्तंभ तीन आहेत. पहिला शेतकरी व कष्टकरी, दुसरा सैनिक आणि तिसरा प्रशासकीय अधिकारी."[१] या तीन आधारस्तंवर देशाची स्थिती अवलंबून असते. या तीन आधारस्तंभापैकी सर्वात वाईट अवस्था असते ती शेतकऱ्याची. त्याचा जन्म गरिबीत, निसर्गाची अवकृपा यांची चटके सहन करण्यात जाता. त्यांचे संपूर्ण जीवन कर्ज फेडण्यात जाते आणि त्याचाही

शेवट गरिबी आणि दारिद्र्यात होतो. तो शेवटपर्यंत आपल्या मूलभूत गरजा देखील पूर्ण करू शकत नाही. अशा शेतकऱ्याला शरद पवार यांनी समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा आणि त्याला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा क्रांतीकारी विचार चिंतनशील असून या वर्गाला उन्नत करणारा आहे.

पारंपरिक आणि मागास शेतीला आधुनिक शेतीचा पर्याय:

शरद पवारांनी शेतकऱ्यांवरील समस्यांचा साकल्याने विचार केलेला आहे. अनुभवजन्य आणि तार्किक बुद्धीने त्यांनी या प्रश्नांची उकल केली आहे. शेतकऱ्यांच्या समस्येला ज्याप्रमाणे मानवी प्रवृत्ती जवळ आहे तशी नैसर्गिक कारणे देखील आहेत, याची जाणीव त्यांना होती. शेतकऱ्यांच्या समस्येचे मूळ निसर्गापेक्षा सामाजिक रचनेत असल्याचे प्रतिपादन ते करतात. त्यांच्यामध्ये आधुनिक शेती हा या समस्यावर एक प्रभावी उपाय आहे. शासनाने आधुनिक शेतीसाठी सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणारे धोरण राबविण्याची गरज आहे.

शरद पवार यांच्यामते, राजकारणाकडे बघण्याचा आपल्या देशाच्या दृष्टिकोन बदलला पाहिजे. राजकारण्यांच्या दृष्टिकोन बदलत नसेल तर निदान नवीन पिढीचा व सर्वसामान्य लोकांचा दृष्टिकोन तरी बदलायला हवा. शेतीबाबत त्यांचे मत असे की, "शेती हेच आमचे प्रगतीचे वाढीचे मुख्य साधन असेल अशी त्यांची दृढ धारणा आहे."[२] सर्व प्रकारच्या अडचणींशी सामना करीत प्रतिकूल परिस्थितीला समोरासमोर भिडून त्यांनी 'बारामती पॅटर्न' यशस्वी केला. बारामतीत वार्षिक पर्जन्यमान ८ इंच असताना त्याचबरोबर ७४% पेक्षा अधिक क्षेत्र आवर्षणग्रस्त असून त्यांनी आधुनिक शेतीचा उपयोग केला. त्यामुळे या परिसरात १२ साखर कारखाने, दूग्धजन्य पदार्थांची निर्यात, द्राक्षांची निर्यात नेहमी होताना दिसते. त्याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्र राज्य फळ फळांच्या निर्यातीत भारत अव्वल आहे. पारंपरिक शेतीला फाटा देऊन आधुनिक शेतीचे अनुकरण आणि त्यासाठी शासकीय ध्येय धोरणाची अंमलबजावणी हे महत्त्वाचे घटक आहेत.

किमान आधारभूत किंमत धोरण:

शरद पवार यांनी २००४ ते २०१४ या कृषीमंत्रीपदाच्या कार्यकाळात काम केले आहे. त्यांनी या काळात 'रास्त भाव' ही संकल्पना दिशाभूल करणारी असल्याचे स्पष्ट सांगितले होते. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षात घेऊन त्यानुसार त्याला उत्पादित केलेल्या कष्टाच्या शेतीमालाला मोबदला मिळाला पाहिजे अशी भूमिका घेतली होती. त्यानुसार त्यांनी शेतकऱ्यांच्याच पिकविलेल्या मालाला योग्य भाव मिळविण्यासाठी सकारात्मक धोरण ठरविले होते. "शेती करत राहण्यासाठीचा त्यांचा उत्साह आणि मनोधैर्य टिकविले पाहिजे. त्याचा दाम त्यांच्या पदरात पडायला हवा."[३] अशी त्यांची भूमिका निर्णायक ठरली. त्यामुळे भारत सरकारद्वारे शेतीमालाच्या भावातील घसरणीपासून शेतकऱ्यांचे संरक्षण होऊन किमान आधारभूत किंमत हमीभाव निश्चिती करण्यात आल्या. त्यामुळे २३ पिकासाठी खरीप आणि रब्बी पेरणीपूर्वी हे भाव जाहीर केले जातात. १९९५-१९९६ ते २००४-२००५ या कार्यकाळाची तुलना केली असता किमान आधारभूत किंमतीत दुपटीहून वाढ केली. त्याचबरोबर त्याला जोडून बोनसची संकल्पना राबविण्यावर भर दिला गेला. त्यांनी

'फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' (फेसाई) मार्फत खरेदी प्रक्रिया राबविली. त्यामुळे शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक फायदा मिळाला. या धोरणामागे त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. त्यांच्या कृषिमंत्री पदाच्या कार्यकाळात २००४ ते २०१४ मध्ये शेतकरी धोरणामुळे किमान आधारभूत किंमतीद्वारे शेतकऱ्यांचे आर्थिक संरक्षण सुनिश्चित होण्यास मदत झाली.

भारतीय कृषी संशोधन परिषदे (आयसीएआर)च्या विस्तारणीकरणामधील भूमिका:

भारतीय कृषी संशोधन परिषद ही भारत सरकारच्या कृषी मंत्रालय कृषी संशोधन आणि शिक्षण विभागात असलेली स्वायत्त संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून शेती, फलोत्पादन आणि प्राणी विज्ञानातील संशोधनाचा समावेश साधला जातो. हे जागतिक स्तरावरील कृषी संशोधन आणि शिक्षण संस्थांचे मोठे जाळे आहे. केंद्रीय कृषिमंत्री या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. शरद पवार २००४ ते २०१४ या काळात भारत देशाचे कृषिमंत्री होते. त्यांनी त्यांच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात शेती, शेतकरी व ग्रामीण विकास या त्रिसूत्रीला केंद्रभूत म्हणून या संस्थेचा विस्तार वाढ करण्यासाठी या संस्थेच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्र निर्मितीवर भर दिला. पूर्वी देशात २९० कृषी विज्ञान केंद्र होती. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी ५९० पर्यंत केंद्राची संख्या वाढविण्याचे धोरण आखले. त्यांनी २००४ ते २०१४ या कार्यकाळात ३०० नवीन कृषी विज्ञान केंद्र स्थापन केली. आजतागायत ही संख्या उच्चांकी मानली जाते.''[४] त्यांनी आयसीएआर अंतर्गत असणाऱ्या विविध संस्थांच्या माध्यमातून ६१ नवी संशोधन प्रकल्प मार्गी लावण्याचे काम केले आहे. शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास हाच त्यांच्या कृषी धोरणांचा मुलाधार होता. त्यानुसार त्यांनी या संस्थेच्या माध्यमातून कृषी संशोधन, कृषी तंत्रज्ञान आणि कृषी विद्यापीठे आणि संशोधन प्रकल्पांना मोठा निधी उपलब्ध करून दिला. यापाठीमागे शरद पवार यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्याचबरोबर त्यांनी त्यांच्या कृषी विषयक धोरणात हवामान बदल, तंत्रज्ञानाचा वापर व बागायती शेतीला प्रोत्साहन आणि नवीन पिकांच्या वाणांचे संशोधन याबाबतची धोरणे महत्त्वाची ठरली. हे सर्व त्यांनी भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या विस्तार वाढीतून शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत तंत्रज्ञान पोहोचवून शेतीला आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले.

कृषी क्षेत्रातील आयात निर्यात धोरण:

शरद पवार यांनी केंद्रीय कृषिमंत्रीच्या कालावधीत डाळी आणि तेलबिया उत्पादन वाढ करण्यासाठी धोरण राबवून त्यांची अंमलबजावणी केली. त्याचबरोबर आयातीचा खर्च कमी केला. तो ४५ हजार कोटी पर्यंत खाली आणला त्यावरून त्यांच्या आयातीच्या धोरणांची यशस्वीता दिसून येते. त्याचा फायदा भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी मिळविण्यासाठी झाला. ५५ हजार कोटींचे परकीय चलन वाचविण्याची कामगिरी त्यांच्या कृषी खात्याने पार पाडली.

तांदूळ हे महत्त्वाचे पीक आहे. देशातील अनेक राज्यात तांदूळ पिकवितात त्यांना संरक्षण व हमीभाव देण्याची गरज त्यांनी ओळखली. त्यानुसार पूर्वीच्या ध्येय धोरणात अमुलाग्र बदल केला. त्याचा परिणाम सकारात्मक झाला. देशातील तांदळाची संपूर्ण गरज भागवून जगातील सर्वाधिक तांदूळ निर्यात करणारा देश म्हणून भारत अव्वल ठरला. पूर्व भारतात हरितक्रांतीचा

ओनामा''[५] 'ब्रिंगिंग ग्रीन रिव्होल्युशन टू ईस्ट इंडिया' असे धोरण त्यांनी २००४ मध्ये स्वीकारले होते. ३.४ दशलक्ष टन तांदळाची निर्यात होत होती तसेच हा आकडा पुढे २०१२ ते २०१३ मध्ये दहा दशलक्ष टनापर्यंत इथपर्यंत गेला. त्यामुळे जगातला सर्वाधिक तांदूळ निर्यात करणारा देश अशी ओळख मिळाली. तसेच २०१० मध्ये ६.२ अब्ज टन शेतमाल भारत निर्यात करत होता. २०१२ मध्ये हीच वाढ ३९ अब्ज टनावर नेऊन ठेवण्यात त्यांचे कृषी धोरण यशस्वी ठरलेले दिसते.

फळबाग धोरण:

शरद पवारांनी १९९० साली फलोत्पादन कार्यक्रम म्हणून सुरुवात केली. १९९० साली ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. १९९० ते १९९१ साली ही योजना 'रोजगार हमी योजना' या संकल्पनेतून निर्माण केली. 'रोजगार हमी योजना' अंतर्गत फळबाग धोरण थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचण्याची अंमलबजावणी त्यांनी केली. शेतकऱ्यांना या योजनेत अनुदान दिले. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या मागास असलेले शेतकरी फळबाग लागवडीसाठी पुढे येताना दिसतात. त्याचा परिणाम सकारात्मक झाला. १९९० ते १९९१ पासून १९९६ ते १९९७ पर्यंत वेगवेगळे टप्पे पाडून गुणवत्तेनुसार मदत उपलब्ध करून देण्याचे धोरण व कालबद्ध कार्यक्रम नियोजन झाल्याने या योजनेत ग्रामीण भागातील शेतकरी यशस्वी झालेले दिसतात. धोरण राबवणारे महाराष्ट्र पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरले.

सन २००४ ते २०१४ साली केंद्रात कृषी मंत्री झाल्यानंतर शरद पवारांनी 'राष्ट्रीय फलोत्पादन अभियान'६ धोरण राबविले. आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान, संशोधन आणि कृषीशास्त्र देशात आले. फळ लागवड धोरणामुळे शेतीक्षेत्राची भाषा या अभियानाने बदललेली दिसली. त्याचा परिणाम म्हणजे देशात कुठल्याही कोपऱ्यात पिकणारी फळे संपूर्ण देशात खेड्यापाड्यापर्यंत उपलब्ध होतात. या धोरणामुळे देशातील प्रगत शेतकरी डॉलरची कमाई करू लागले.

संपूर्ण कर्जमाफी धोरण:

सन २००८ मधील केंद्र सरकारच्या शेतकरी कर्जमाफी योजनेत त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. त्यांनी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना या योजनेची माहिती दिली. अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी थेट कर्जमाफी, मोठ्या शेतकऱ्यांसाठी कर्ज पुनर्गठीत मिळणार आहे. त्यावेळच्या संकटाचा विचार करता शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी त्यांनी "राष्ट्रीय स्तरावरील कर्जमाफीसाठी धोरण यामध्ये त्यांनी पुढाकार घेतला. ही योजना १८ जुलै २०१८ पासून अधिकृतपणे लागू करण्यात आली. या त्यांच्या धोरणातील निर्णयाचा देशातील तीन कोटी ६९ लाख शेतकऱ्यांना लाभ झालेला होता. संपूर्ण कर्जमाफीची रक्कम ७१,६८० कोटी होती. त्या काळातील सर्वात मोठी ऐतिहासिक कर्जमाफी म्हणून आजही या कर्जमाफीला मान दिला जातो.''[७] कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या ६४% शेतकऱ्यांच्या कर्जाची रक्कम ही ७१,६८० कोटी इतकी होती. त्यावरचा हा बोजा हटविल्याशिवाय शेतकऱ्यांची मान मोकळी होणार नव्हती. त्यांच्या या धोरणामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले. त्यांचे या धोरणामुळे शेतकऱ्याला शेतीसाठी काम करण्याची दिशा मिळाली. त्यामुळे त्यांचे हे धोरण शेतकऱ्यांसाठी नव संजीवनी देणारे ठरले.

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरण व महिला बचत गट धोरण:

महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रतिष्ठा मिळविणे ही काळाची गरज असते. त्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचे धोरण शरद पवार यांनी १९९३ मध्ये आखले व त्याची अंमलबजावणी केली. सर्वप्रथम १९९३ साली महिलांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात दाद मागता यावी यासाठी 'महिला आयोगा'ची स्थापना केली. त्याचबरोबर १९९१ साली केंद्रात संरक्षण मंत्री होते, त्या काळात त्यांनी "तिन्ही सैन्य दलात महिलांना प्रवेश दिला. त्याचबरोबर ११ टक्के आरक्षण लागू केले. ग्रामीण भागातील महिलांना राजकीयदृष्ट्या सक्षम करण्यासाठी १९९३ साली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ३३% आरक्षण देण्याच्या निर्णय त्यांनी घेतला. त्याचा परिणाम म्हणजे घराच्या बाहेर पडण्याची मुभा नसणाऱ्या महिलांना सत्तेच्या खुर्चीपर्यंत बसून कारभार करण्याचे समान अधिकार महिलांना मिळाले."[८] त्यामुळे महिला पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून स्थानिक स्वराज्य संस्थेत काम करताना दिसत आहेत. तसेच २०११ पासून आजतागायत आरक्षण ५० टक्के वर पोहोचले आहे. त्याची मूळ विचारधारा शरद पवार यांच्या धोरणांमध्ये दिसते.

सन १९९४ साली महिलांना आपल्या वडिलांच्या संपत्तीत समान वाटा देण्याचा कायदा केलेला होता. हा कायदा २००५ मध्ये भारत सरकारने राबविला. त्याचबरोबर ग्रामसभेला अधिकार देण्याच्या धोरणाला शरद पवार यांच्यामुळे बळकटी मिळाली. ग्रामीण भागातील महिलांना सक्षम करण्यासाठी बचत गट चळवळ त्यांनी उभी केली. महिलांना चार टक्के व्याजाने कर्ज देण्याचे धोरण राबविले. त्यामुळे बचत गट चळवळ उभी राहिली. त्याचबरोबर महिलांना बचत गटांना व्यापारपेठ मिळवून देण्यासाठी तरतूद त्यांच्या धोरणात शरद पवार यांनी केले.

भारताला अन्नधान्य उत्पादन बाबतीत स्वयंपूर्ण करण्यापाठीमागील भूमिका:

शरद पवार यांनी भारताला अन्नधान्य उत्पादनात निर्मिती करण्याची धोरण आखून त्याची अंमलबजावणी केली. एकीकडे भारतावर 'सतत मागणी करणारा देश' अशी प्रतिमा होती. त्यांनी २००४ ते २०१४ या कृषिमंत्री पदाच्या कार्यकाळात प्रतिमा पुसून काढली. त्याऐवजी 'पुरवठादार देश' म्हणून प्रतिमा तयार केली. त्यांच्या ध्येय धोरणामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघाच्या अन्न आणि कृषी संस्थेने भारत देशाचे कौतुक केले. याविषयीचे पत्र संस्थेचे महासंचालक जोन ग्रॉझिआनो हासिलव्हा यांनी २०१२ मध्ये पाठविले. या पत्रात ते नमूद करतात, "भारतातल्या छोट्या आणि मोठ्या शेतकऱ्यांनी शंभर दशलक्ष टन तांदूळ आणि २५० दशलक्ष टन उत्पादन करून इतिहास घडविला."[९]

संदर्भ सूची:

१. नरके हरी, महात्मा फुलेः साहित्य और विचार, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशित समिती, महाराष्ट्र शासन मुंबई, प्रथम संस्करण १९९३, पृष्ठ ३१

२. पवार आप्पासाहेब, सकाळ प्रकाशन, बारामती कृषी पॅटर्न, पृष्ठ १४१

३. पवार शरद, लोक माझे सांगाती राजकीय आत्मकथा, राजहंस प्रकाशन पुणे, पृष्ठ २२५

४. पवार शरद यांचे युट्युब भाषण संग्रह

५. पवार शरद लोक माझे सांगाती, उनि, पृष्ठ २२९
६. देशपांडे पद्मभूषण, पर्व प्रगतीचे परिवर्तनाचे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, पृष्ठ ५५
७. तत्रैव, पृष्ठ ९६
८. लोखंडे एन डी, महाराष्ट्राला न समजलेले शरद पवार, अक्षरगंध प्रकाशन नीरा, पुणे, पृष्ठ ४१
९. पवार शरद, लोक माझे सांगाती, उनि, पृष्ठ २३१

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

शरदचंद्रजी पवार यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान

श्री. शामराव ज्ञानोबा वाघमारे[1], शिल्पा चंद्रकांत पाटील[2]

[1]*संशोधक विद्यार्थी, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर*

[2]*संशोधक विद्यार्थी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर*

Corresponding Author - श्री. शामराव ज्ञानोबा वाघमारे

DOI - 10.5281/zenodo.23524575

प्रस्तावना:

शरद पवार हे भारतीय राजकारणातील एक प्रभावी, अभ्यासू आणि दूरदृष्टीचे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील बारामती येथे झाला. ग्रामीण भागातून पुढे येत त्यांनी राज्य आणि राष्ट्रीय राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांचे पूर्ण नाव शरदचंद्र गोविंदराव पवार असे आहे. विद्यार्थी जीवनापासूनच त्यांना सामाजिक आणि राजकीय कार्याची आवड होती. त्यांनी युवक काँग्रेसमधून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. अत्यंत कमी वयात ते महाराष्ट्र विधानसभेत निवडून आले आणि पुढे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, भारताचे संरक्षणमंत्री आणि केंद्रीय कृषिमंत्री अशी अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहेत. कृषी, सहकार, उद्योग, शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या कार्यामुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावर विशेष मान्यता मिळाली.

ग्रामीण विकास, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सहकार चळवळीला बळकटी देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने क्षेत्राच्या विकासात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. तसेच भारतीय क्रिकेट प्रशासनातही त्यांनी प्रभावी नेतृत्व केले आहे. त्यांच्या नेतृत्वशैलीत निर्णयक्षमता, समन्वय आणि व्यावहारिक दृष्टिकोन दिसून येतो. विविध राजकीय पक्षांशी संवाद साधण्याची क्षमता आणि प्रशासनातील अनुभव यामुळे ते भारतीय राजकारणातील ज्येष्ठ नेत्यांपैकी एक मानले जातात.

आजही शरद पवार हे सामाजिक, राजकीय आणि राष्ट्रीय प्रश्नांवर आपले मत प्रभावीपणे मांडत असून अनेकांसाठी प्रेरणास्थान आहेत.

भारतीय राजकारणात महाराष्ट्राच्या मातीतून अनेक दिग्गज नेते उदयास आले. त्यापैकी लोकनेते शरद पवार एक बहुआयामी, दूरदृष्टी असलेले आणि राष्ट्रीय पातळीवर प्रभाव टाकणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. कृषी, शिक्षण, उद्योग, महिला सक्षमीकरण,

सहकार, क्रीडा आणि राष्ट्रीय राजकारण अशा विविध क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. महाराष्ट्राच्या विकासाला दिशा देताना त्यांनी भारताच्या राष्ट्रउभारणीमध्येही मोलाचे योगदान दिले. ग्रामीण भारताचा विकास, शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबतची संवेदनशीलता आणि प्रगतिशील धोरणे ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये आहेत. भारतीय राजकारणात अनेक नेत्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. शरद पवार हे नाव अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या राजकीय, सामाजिक, कृषी, औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. दूरदृष्टी, प्रशासन कौशल्य, लोकसंपर्क आणि विकासाभिमुख धोरणे यांमुळे ते भारतीय राजकारणातील प्रभावी व्यक्तिमत्त्व ठरले. राष्ट्र उभारणीमध्ये त्यांनी शेतकरी, महिला, युवक, उद्योग आणि क्रीडा क्षेत्रासाठी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

राजकीय नेतृत्व व प्रशासनिक योगदान:

शरद पवार यांनी अत्यंत कमी वयात महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषवले. राज्याच्या प्रशासनात त्यांनी विकासाभिमुख निर्णय घेतले. त्यांची निर्णयक्षमता, समन्वय कौशल्य आणि प्रशासनातील पकड यामुळे ते राष्ट्रीय राजकारणात प्रभावी नेते म्हणून उदयास आले. त्यांनी ग्रामीण विकासाला प्राधान्य दिले. सर्वसमावेशक विकास धोरणांचा अवलंब त्यांनी केला. त्यांचाकडे विविध राजकीय पक्षांशी संवाद साधण्याची क्षमता होती. त्यांनी राष्ट्रीय ऐक्य आणि लोकशाही मूल्यांचे समर्थन केले. त्यांनी संरक्षणमंत्री, कृषिमंत्री आणि विविध केंद्रीय जबाबदाऱ्या सांभाळून देशाच्या धोरणनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली. यांनी अत्यंत कमी वयात राजकारणात प्रवेश केला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी अनेक विकासात्मक निर्णय घेतले. प्रशासनात पारदर्शकता, जलद निर्णयक्षमता आणि लोकाभिमुख धोरणे यांवर त्यांनी भर दिला. केंद्रीय संरक्षणमंत्री आणि कृषिमंत्री म्हणूनही त्यांनी देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने संरक्षण क्षेत्र मजबूत करण्यासाठी त्यांनी उपाययोजना केल्या.

कृषी क्षेत्रातील योगदान:

भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतकऱ्यांचा विकास हा राष्ट्र उभारणीचा मुख्य घटक आहे. कृषिमंत्री म्हणून शरद पवार यांनी कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली. फळबाग आणि बागायती शेतीला प्रोत्साहन दिले. कृषी उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. अन्नसुरक्षा मजबूत करण्यासाठी धोरणे आखली. शेतकऱ्यांसाठी कर्जसुविधा व बाजारपेठ उपलब्ध केल्या. कृषी संशोधन आणि निर्यात वाढीस प्रोत्साहन दिले. त्यांच्या धोरणांमुळे भारत अन्नधान्य उत्पादनात अधिक सक्षम झाला. भारतीय कृषीव्यवस्थेच्या आधुनिकीकरणासाठी शरद पवार यांनी मोठे प्रयत्न केले. केंद्रीय कृषिमंत्री म्हणून त्यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवल्या. त्यांचे

कृषी क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कार्य कार्य आहे. अन्नधान्य उत्पादन वाढीस त्यांनी प्रोत्साहन दिले. फलोत्पादन व बागायती विकासाला चालना देण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार करण्याचे काम त्यांनी केले. शेतकऱ्यांना कर्जसुविधा व विमा योजना राबविण्यात आली. कृषी निर्यात वाढविण्याचे प्रयत्न केले गेले. त्यांच्या कार्यकाळात भारताने अन्नधान्य उत्पादनात उल्लेखनीय वाढ केली. दुष्काळी परिस्थितीतही शाश्वत शेतीवर भर देण्यात आला.

सहकार चळवळीतील योगदान:

महाराष्ट्रातील सहकार चळवळीला बळकटी देण्यात शरद पवार यांचे मोठे योगदान आहे. साखर कारखाने, दूध संघ, पतसंस्था आणि सहकारी बँका यांमधून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. सहकार क्षेत्रात विवध योजना त्यांनी राबवल्या. त्यांनी ग्रामीण रोजगारनिर्मितीला प्राधान्य दिले. शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण केले. ग्रामीण भागात औद्योगिक विकास घडवून आणला. स्थानिक नेतृत्वाचा विकास केला. सहकार मॉडेलमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडले.

औद्योगिक व आर्थिक विकास:

औद्योगिक गुंतवणूक वाढवून राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी त्यांनी प्रयत्न केले. माहिती तंत्रज्ञान, उत्पादन उद्योग आणि पायाभूत सुविधा यांना चालना देण्यात त्यांचा वाटा महत्त्वाचा आहे. त्यांनी औद्योगिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले. औद्योगिक वसाहतींचा विकास केला. परदेशी गुंतवणुकीस प्रोत्साहन दिले. रोजगारनिर्मितीवर विशेष भर दिला. शहरीकरण आणि पायाभूत सुविधांचा विस्तार केला. त्यांच्या धोरणांमुळे महाराष्ट्र देशातील आघाडीचे औद्योगिक राज्य बनले आहे. औद्योगिक गुंतवणूक वाढविण्यासाठी त्यांनी विविध धोरणे राबवली. महाराष्ट्रात औद्योगिक वसाहती, रोजगारनिर्मिती आणि पायाभूत सुविधा विकासावर त्यांनी भर दिला.

त्यांच्या कार्यकाळात माहिती तंत्रज्ञान, उत्पादन उद्योग आणि निर्यात क्षेत्राला प्रोत्साहन मिळाले. यामुळे महाराष्ट्र देशातील प्रगत औद्योगिक राज्यांपैकी एक बनला.

संरक्षण क्षेत्रातील योगदान:

भारताचे संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी देशाच्या संरक्षण व्यवस्थेला बळकट करण्यासाठी काम केले. त्यांचे संरक्षण क्षेत्रातील कार्य भरीव स्वरूपाचे आहे. त्यांनी सैन्य व्यवस्थेचे आधुनिकीकरण केले. संरक्षण क्षेत्रातील प्रशासन सुधारणा करण्याचे काम त्यांनी केले. राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य दिले. त्यांनी संरक्षण दलांच्या कार्यक्षमतेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

शिक्षण क्षेत्रातील योगदान:

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे असे मानून त्यांनी ग्रामीण भागात शैक्षणिक संधी वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यांचे शैक्षणिक कार्य उल्लेखनिय आहे. ग्रामीण भागातील शिक्षण संस्थांना प्रोत्साहन देण्याचे काम त्यांनी केले. व्यावसायिक शिक्षणाचा विस्तार केला. उच्च शिक्षण संस्थांना चालना दिली. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षण व्यवस्था राबवली. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या. राष्ट्राच्या विकासासाठी शिक्षण आवश्यक असल्याची जाणीव ठेवून त्यांनी अनेक शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहन दिले. ग्रामीण भागात शिक्षण पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले. उच्च शिक्षण संस्थांची स्थापना केली. ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन दिले युवकांच्या कौशल्य विकासासाठी योजना आणल्या. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याचा आढावा खालील मुद्द्याच्याआधारे घेता येईल.

ग्रामीण शिक्षणाला प्रोत्साहन:

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी अनेक शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयांना त्यांनी प्रोत्साहन दिले. शिक्षण गावागावात पोहोचवण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

उच्च व तांत्रिक शिक्षणाचा विकास:

विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यावसायिक शिक्षणाला त्यांनी विशेष महत्त्व दिले. आधुनिक शिक्षणामुळे युवक स्वावलंबी बनतील आणि देशाच्या विकासात योगदान देतील, हा त्यांचा दृष्टिकोन होता.

शैक्षणिक संस्थांना पाठबळ:

अनेक शैक्षणिक संस्था, विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांना त्यांनी सहकार्य केले. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी पायाभूत सुविधा, प्रयोगशाळा आणि आधुनिक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी संधी:

आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी शिष्यवृत्ती, वसतिगृहे आणि विविध शैक्षणिक योजनांना त्यांनी प्रोत्साहन दिले.

महिला शिक्षणाला प्राधान्य:

महिलांचे शिक्षण हे समाजाच्या विकासाचे महत्त्वाचे माध्यम आहे, या विचारातून मुलींच्या शिक्षणासाठी विविध उपक्रमांना चालना दिली. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

कौशल्य विकासावर भर:

फक्त पदवीपुरते शिक्षण न राहता युवकांना रोजगारक्षम बनविण्यासाठी कौशल्याधारित शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण कार्यक्रमांना त्यांनी प्रोत्साहन दिले.

शरद पवार यांचे शैक्षणिक कार्य समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार, तांत्रिक शिक्षणाला चालना, महिला शिक्षण आणि युवकांच्या कौशल्य विकासामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रगतीच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या. त्यांच्या शैक्षणिक दृष्टिकोनामुळे शिक्षण क्षेत्राच्या विकासाला मोठी गती मिळाली.

महिला सक्षमीकरणासाठी कार्य:

महिलांचा विकास हा राष्ट्र उभारणीचा महत्त्वाचा आधार आहे. महिलांना शिक्षण, रोजगार आणि राजकारणात संधी मिळाव्यात यासाठी त्यांनी प्रयत्न केले. महिलांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी त्यांनी अनेक धोरणांना पाठिंबा दिला. महिला स्वयं सहायता गटांना प्रोत्साहन दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना संधी दिली. महिलांच्या शिक्षणावर भर दिला. ग्रामीण महिलांच्या आर्थिक विकासासाठी योजना राबविल्या. महिलांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

क्रीडा क्षेत्रातील योगदान:

Board of Control for Cricket in India आणि International Cricket Council यांसारख्या संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधा, खेळाडूंना प्रोत्साहन आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची ओळख निर्माण करण्यात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

शरद पवार यांनी क्रीडा प्रशासनातही महत्त्वपूर्ण कार्य केलेआहे. विशेषतः क्रिकेट क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. क्रीडा क्षेत्रातील कार्य महत्त्वपूर्ण आहे. क्रीडा संघटनांचे नेतृत्व त्यांनी केले. ग्रामीण भागीतील क्रीडापटूंना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. क्रीडा विकास कार्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास त्यांनी केला. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय क्रीडेला बळकटी मिळाली. त्यांच्या या कार्यामुळे भारतीय क्रिकेट प्रशासनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा मिळाली.

राष्ट्रीय एकात्मता व लोकशाही मूल्ये:

भारतीय लोकशाहीतील समन्वयवादी नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. विविध सामाजिक, भाषिक आणि प्रादेशिक घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला. त्यांनी धर्मनिरपेक्षतेचे समर्थन केले. त्यांनी सामाजिक सलोखा टिकविण्याचा प्रयत्न केला. लोकशाही संस्थांवर विश्वास ठेवला. राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले.

आपत्ती व्यवस्थापन व सामाजिक कार्य:

दुष्काळ, पूर किंवा नैसर्गिक संकटांच्या काळात त्यांनी प्रभावी नेतृत्व केले. शेतकरी आणि सामान्य जनतेच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी त्यांनी तत्परता दाखविली. सामाजिक ऐक्य, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही मूल्ये टिकवण्यासाठीही त्यांनी कार्य केले.

राष्ट्रउभारणीत त्यांच्या कार्याचे महत्त्व:

शरद पवार यांचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून संपूर्ण देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासाशी जोडलेले आहे. ग्रामीण भारताला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य त्यांनी केले. कृषी, उद्योग, शिक्षण आणि सहकार या क्षेत्रांतील त्यांचे योगदान राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण मानले जाते.

निष्कर्ष:

लोकनेते शरद पवार हे भारतीय राजकारणातील एक प्रभावी, अभ्यासू आणि दूरदृष्टीचे नेतृत्व मानले जाते. त्यांनी विविध क्षेत्रांत केलेले कार्य राष्ट्रउभारणीसाठी प्रेरणादायी आहे. कृषी सुधारणा, सहकार चळवळ, औद्योगिक विकास, शिक्षण आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांतील त्यांच्या योगदानामुळे समाजाच्या सर्व घटकांच्या प्रगतीस चालना मिळाली. त्यामुळे त्यांचे कार्य भारतीय राष्ट्रनिर्मितीच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान बहुआयामी आहे. कृषी, सहकार, शिक्षण, उद्योग, महिला सक्षमीकरण आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या कार्यामुळे देशाच्या प्रगतीला चालना मिळाली. दूरदृष्टी आणि विकासाभिमुख नेतृत्वामुळे ते भारतीय राजकारणातील प्रभावी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांचे कार्य हे राष्ट्र विकासासाठी समर्पित नेतृत्वाचे उत्तम उदाहरण आहे. यांचे शैक्षणिक कार्य समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार, तांत्रिक शिक्षणाला चालना, महिला शिक्षण आणि युवकांच्या कौशल्य विकासामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रगतीच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या. त्यांच्या शैक्षणिक दृष्टिकोनामुळे शिक्षण क्षेत्राच्या विकासाला मोठी गती मिळाली.

संदर्भ ग्रंथ :

१) स्पर्धा काळाशी (शरद पवार) – अरुण टिकेकर (संपा.) रोहन प्रकाशन, पुणे. प्र.आ.- डिसेंबर,२००८.

२) लोकनेते शरदराव पवार – ॲड. राम कांडगे, राजश्री प्रकाशन, (चाकण) पुणे. प्र.आ.- नोव्हेंबर,२०१०.

३) लोक माझे सांगाती – शरद पवार, राजहंस प्रकाशन, पुणे. प्र.आ.- डिसेंबर,२०१५.

४) वर्तमानपत्र व मासिक

५) आंतर महाजाल

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

खासदार शरद पवार साहेब यांचा राजकीय प्रवास

प्रा. संतोष संजय कोकरे

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,

कला व वाणिज्य महविद्यालय, पुसेगाव

Corresponding Author - प्रा. संतोष संजय कोकरे

DOI - 10.5281/zenodo.23524624

प्रस्तावना:

भारतीय राजकारणात खासदार शरद पवार साहेब हे एक अत्यंत प्रभावी, व्यवहारिक आणि दीर्घकाळ सक्रिय राहिलेले नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या राजकीय प्रवासामध्ये राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्व, सत्तेतील बदल, पक्षीय पुनर्रचना आणि बदलत्या राजकीय समीकरणांशी जुळवून घेण्याची क्षमता स्पष्ट दिसून येते. प्रस्तुत शोध निबंधात त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा कालानुक्रमाने आणि विश्लेषणात्मक आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रारंभिक जीवन आणि राजकारणात प्रवेश:

खासदार शरद पवार साहेब यांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी महाराष्ट्रातील बारामती येथे एका सामाजिक जाणीव व शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या आई शारदाबाई पवार या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सक्रिय होत्या, तर वडील गोविंदराव पवार हे शिक्षण आणि सहकार क्षेत्राशी संबंधित होते. घरातील या सामाजिक व शैक्षणिक वातावरणामुळे पवार यांच्यात लहानपणापासूनच नेतृत्व, संघटनकौशल्य आणि समाजकार्याची जाणीव विकसित झाली. पुण्यातील ब्रिहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (BMCC) येथे शिक्षण घेत असताना त्यांनी विद्यार्थी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला. महाविद्यालयीन जीवनातच त्यांनी युवक संघटनांमधून कार्य करत नेतृत्वगुण, लोकांशी संवाद साधण्याची क्षमता आणि समस्यांचे व्यवहारिक निराकरण करण्याची दृष्टी आत्मसात केली. याच काळात त्यांची राजकीय जडणघडण झाली आणि सार्वजनिक जीवनात कार्य करण्याची प्रेरणा दृढ झाली.

सन १९६७ साली, केवळ २७ व्या वर्षी, ते प्रथमच महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले हा त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील निर्णायक टप्पा ठरला. तरुण वयात मिळालेल्या या यशाने त्यांच्या नेतृत्वक्षमतेची आणि जनाधाराची प्रचिती दिली. त्यानंतर त्यांनी राज्य सरकारमध्ये विविध मंत्रीपदे भूषविली, ज्यामुळे प्रशासन, धोरणनिर्मिती आणि सत्तेतील कार्यपद्धती यांचा सखोल अनुभव त्यांना मिळाला. या प्रारंभिक टप्प्यातच खासदार शरद पवार यांनी स्वतःला केवळ राजकारणी म्हणून नव्हे, तर एक दूरदर्शी आणि सक्षम नेतृत्व म्हणून घडविले

ज्याचा प्रभाव त्यांच्या पुढील संपूर्ण राजकीय प्रवासात ठळकपणे दिसून येतो.

मुख्यमंत्रीपद आणि राज्यस्तरीय नेतृत्व:

खासदार शरद पवार यांनी सन १९७८ साली, अवघ्या ३८ व्या वर्षी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली आणि त्या काळातील देशातील सर्वात तरुण मुख्यमंत्री म्हणून एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या नेतृत्वात तरुणाईची ऊर्जा, निर्णयक्षमता आणि परिस्थितीनुरूप धोरण आखण्याची क्षमता स्पष्टपणे दिसून आली. त्यांनी तीन वेळा मुख्यमंत्रीपद भूषवले (१९७८–८०, १९८८–९१, १९९३–९५), आणि प्रत्येक कार्यकाळात बदलत्या सामाजिक, आर्थिक गरजांना प्रतिसाद देणारे निर्णय घेतले. मुख्यमंत्री म्हणून शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासावर ठाम भर दिला. औद्योगिक प्रगतीसाठी त्यांनी गुंतवणूक आकर्षित करण्याचे धोरण अवलंबविले, ज्यामुळे राज्यातील औद्योगिकीरणाला गती मिळाली. त्याचबरोबर शेती क्षेत्रातील सुधारणांवर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले सिंचन सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनवाढीसाठी विविध योजना राबविण्यात आल्या. सहकार चळवळीला त्यांनी दिलेले बळ हे त्यांच्या नेतृत्वाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरले. विशेषतः सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीतून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती झाली आणि स्थानिक अर्थव्यवस्था सक्षम झाली. यामुळे ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक पायाभरणीत मोठा बदल घडून आला. याशिवाय, पायाभूत सुविधांचा विकास व ररस्ते, वीज, पाणीपुरवठा यांवर त्यांनी भर देत राज्याच्या दीर्घकालीन प्रगतीचा पाया मजबूत केला. संकटकाळातही ठाम निर्णय घेण्याची त्यांची क्षमता आणि प्रशासनावरची पकड यामुळे ते एक प्रभावी आणि परिणामकारक मुख्यमंत्री म्हणून ओळखले गेले. या काळात शरद पवार यांनी केवळ शासन चालविले नाही, तर महाराष्ट्राच्या विकासाला एक स्पष्ट दिशा दिली ज्याचा परिणाम पुढील अनेक दशकांपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणावर जाणवतो.

राष्ट्रीय राजकारणातील भूमिका:

शरद पवार साहेब यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न ठेवता राष्ट्रीय पातळीवरही ठसा उमटविला. राज्यातील यशस्वी नेतृत्वानंतर त्यांनी केंद्राच्या राजकारणात प्रवेश केला आणि देशाच्या धोरणनिर्मितीत सक्रिय भूमिका बजावली. सन १९९१ साली ते भारताचे संरक्षण मंत्री झाले. या जबाबदारीच्या पदावर त्यांनी देशाच्या संरक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम आणि आधुनिक बनविण्यासाठी प्रयत्न केले. बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करून संरक्षण क्षेत्रातील नियोजन, समन्वय आणि सज्जता यांवर त्यांनी भर दिला. त्यांच्या कार्यकाळात संरक्षण व्यवस्थेतील निर्णय प्रक्रियेला अधिक गती आणि स्पष्टता मिळाल्याचे मानले जाते. यानंतर, सन २००४ ते २०१४ या कालावधीत त्यांनी कृषी मंत्री म्हणून दीर्घकाळ काम पाहिले हा त्यांच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या काळात भारताच्या कृषी क्षेत्रासमोरील अनेक आव्हाने जसे की हवामान बदल, उत्पादनातील अस्थिरता आणि शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न यांना सामोरे जाण्यासाठी त्यांनी विविध धोरणे राबविली. अन्नसुरक्षा मजबूत करणे, कृषी उत्पादनवाढ करणे, पिकविमा योजना, कृषी संशोधन आणि तंत्रज्ञानाचा प्रसार यांसारख्या क्षेत्रांमध्ये त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. त्यांच्या

धोरणांमुळे देशाच्या अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली आणि भारताने अन्नसुरक्षेच्या दृष्टीने अधिक स्थैर्य प्राप्त केले. जरी काही धोरणांवर टीका झाली आणि शेतकरी समस्यांबाबत प्रश्न उपस्थित झाले, तरी एकूणच कृषी क्षेत्र स्थिर ठेवण्यात आणि दीर्घकालीन धोरणात्मक दिशा देण्यात त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. या प्रकारे, शरद पवार यांनी राष्ट्रीय राजकारणात एक अनुभवी, निर्णयक्षम आणि व्यवहारिक नेता म्हणून आपली ओळख निर्माण केली, ज्यांचा प्रभाव केवळ धोरणांपुरता मर्यादित न राहता देशाच्या विकासाच्या व्यापक प्रक्रियेतही दिसून येतो.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना:

सन १९९९ हे वर्ष शरद पवार साहेब यांच्या राजकीय कारकिर्दीतील एक निर्णायक वळण ठरले. त्यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून वेगळे होत राष्ट्रवादी काँग्रेस या नव्या पक्षाची स्थापना केली. या निर्णयामागे नेतृत्वाच्या प्रश्नांबरोबरच राष्ट्रीय ओळख, धोरणात्मक दिशा आणि संघटनात्मक स्वायत्तता यांसारखे मूलभूत मतभेद कारणीभूत होते. हा निर्णय धाडसी आणि दूरगामी परिणाम करणारा ठरला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेनंतर पवार यांनी अत्यंत कुशलतेने पक्षाची उभारणी केली. मर्यादित कालावधीतच त्यांनी महाराष्ट्रात मजबूत संघटन निर्माण करून पक्षाला जनाधार मिळवून दिला. ग्रामीण भाग, सहकार क्षेत्र आणि स्थानिक नेतृत्व यांना केंद्रस्थानी ठेवत त्यांनी पक्षाचा विस्तार केला. आघाडीच्या राजकारणात NCP लवकरच एक महत्त्वाचा आणि निर्णायक घटक बनला. विशेषतः महाराष्ट्रात राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांची आघाडी दीर्घकाळ सत्तेत राहिली, ज्यामुळे स्थिर सरकार आणि सातत्यपूर्ण धोरणे राबविणे शक्य झाले. या आघाडीच्या माध्यमातून शरद पवार यांनी सत्तासंतुलन राखण्याची आणि विविध पक्षांमध्ये समन्वय साधण्याची आपली राजकीय कौशल्ये सिद्ध केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेतून शरद पवार यांनी केवळ एक नवीन पक्ष निर्माण केला नाही, तर भारतीय राजकारणात स्वतंत्र विचारसरणी, प्रादेशिक प्रभाव आणि आघाडीच्या युगातील नेतृत्वाची एक नवी दिशा दिली.

आघाडी राजकारण आणि रणनीती:

शरद पवार हे भारतीय राजकारणातील आघाडी राजकारणाचे अत्यंत कुशल आणि दूरदर्शी रणनीतीकार म्हणून ओळखले जातात. बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये विविध विचारधारांच्या पक्षांना एकत्र आणून स्थिर आणि कार्यक्षम सरकार निर्माण करण्याची त्यांची क्षमता विशेष ठरते. त्यांच्या राजकीय शैलीत लवचिकता, संवादकौशल्य आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची कला यांचा प्रभाव स्पष्ट दिसतो. आघाडी राजकारणात शरद पवार यांनी नेहमीच "सामायिक किमान कार्यक्रम" या तत्त्वावर भर दिला. मतभेद असतानाही समान ध्येयांवर आधारित सहकार्य घडवून आणणे, हे त्यांच्या रणनीतीचे मुख्य वैशिष्ट्य राहिले आहे. त्यामुळेच ते विविध पक्षांमधील मतभेद कमी करून स्थैर्य निर्माण करण्यात यशस्वी ठरले. सन २०१९ साली महाराष्ट्रात घडलेल्या राजकीय उलथापालथीत त्यांनी अत्यंत निर्णायक आणि प्रभावी भूमिका बजावली. महा विकस आघाडी या आघाडीच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार आणि मध्यस्थी महत्त्वाची ठरली. शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांसारख्या भिन्न विचारसरणीच्या पक्षांना एकत्र आणणे हे मोठे राजकीय आव्हान होते; परंतु शरद पवार यांच्या अनुभव, संयम आणि वाटाघाटी

कौशल्यामुळे हे शक्य झाले. या आघाडीने केवळ सत्ता स्थापनेपुरते मर्यादित न राहता, विविध मतप्रवाहांना एकत्र आणून प्रशासन चालविण्याचा एक नवीन आदर्श निर्माण केला. विरोधाभास विचारसरणी असूनही सहकार्याने शासन करता येते, हे या प्रयोगातून सिद्ध झाले. एकंदरीत, शरद पवार यांची आघाडी राजकारणातील भूमिका ही केवळ सत्तासमीकरणांपुरती मर्यादित नसून, ती भारतीय लोकशाहीतील सहकार्य, समन्वय आणि राजकीय परिपक्वतेचे प्रभावी उदाहरण आहे.

नेतृत्वशैली आणि राजकीय वैशिष्ट्ये:

शरद पवार यांची नेतृत्वशैली ही भारतीय राजकारणात वेगळी आणि परिणामकारक म्हणून ओळखली जाते. त्यांनी केवळ तत्त्वनिष्ठ राजकारणावर भर न देता, परिस्थितीनुसार लवचिक आणि व्यवहारिक दृष्टिकोन स्वीकारला. त्यामुळेच बदलत्या राजकीय परिस्थितीतही त्यांनी आपले स्थान टिकवून ठेवले आणि प्रभावी नेतृत्व सिद्ध केले. त्यांच्या निर्णयप्रक्रियेत दीर्घकालीन विचार, सूक्ष्म निरीक्षण आणि राजकीय गणितांची अचूक मांडणी यांचा समतोल दिसून येतो. त्यांच्या नेतृत्वातील काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे अधिक स्पष्टपणे दिसतात.

व्यावहारिक दृष्टिकोन:

शरद पवार हे तत्त्वज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष परिणाम साधण्यावर भर देणारे नेते आहेत. परिस्थितीनुसार भूमिका बदलण्याची आणि योग्य तो मार्ग स्वीकारण्याची त्यांची तयारी ही त्यांच्या यशाची किल्ली ठरली आहे.

संघटन कौशल्य:

पक्ष उभारणी, कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करणे आणि स्थानिक पातळीवर मजबूत नेतृत्व विकसित करणे यामध्ये त्यांचे कौशल्य उल्लेखनीय आहे. त्यांनी नेहमीच कार्यकर्त्यांशी थेट संवाद ठेवत पक्षाला मजबूत पाया दिला.

प्रशासनिक अनुभव:

राज्य आणि केंद्र या दोन्ही स्तरांवर विविध जबाबदाऱ्या सांभाळल्यामुळे त्यांना प्रशासन, धोरणनिर्मिती आणि अंमलबजावणी यांचे सखोल ज्ञान प्राप्त झाले आहे. त्यामुळे निर्णय घेताना व्यापक दृष्टीकोन दिसून येतो.

राजकीय संतुलन आणि संवादकौशल्य:

विरोधी पक्षांशी संवाद राखणे, मतभेदांवर मार्ग काढणे आणि सहकार्याची भूमिका ठेवणे हे त्यांच्या नेतृत्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. यामुळेच ते आघाडी राजकारणात यशस्वी ठरले.

संकट व्यवस्थापन क्षमता:

राजकीय किंवा सामाजिक संकटांच्या काळात शांतपणे आणि ठामपणे निर्णय घेण्याची त्यांची क्षमता त्यांना इतर नेत्यांपासून वेगळी ठरविते. एकंदरीत, शरद पवार यांची नेतृत्वशैली ही अनुभव, व्यवहारिकता आणि रणनीती यांचा संगम आहे. त्यामुळेच ते दीर्घकाळ भारतीय राजकारणात प्रभावी राहिले आणि आजही एक मार्गदर्शक नेता म्हणून भारतीय राजकारणात ओळखले जातात.

टीका आणि वाद:

शरद पवार यांच्या दीर्घ आणि बहुआयामी राजकीय प्रवासात यशाबरोबरच टीका आणि वाद यांचाही महत्त्वाचा वाटा राहिला आहे. अनेक दशकांच्या सक्रिय राजकारणात त्यांनी विविध सत्तास्थानांवर काम केल्यामुळे

त्यांच्या निर्णयांवर आणि भूमिकांवर सतत सार्वजनिक व राजकीय परीक्षण झाले. भ्रष्टाचाराच्या आरोपांपासून ते धोरणात्मक निर्णयांवरील मतभेदांपर्यंत, तसेच आघाडी राजकारणातील सत्तासंघर्षांपर्यंत विविध कारणांमुळे ते अनेकदा वादाच्या केंद्रस्थानी राहिले. विशेषतः कृषी धोरणे, सहकार क्षेत्रातील हस्तक्षेप आणि काही औद्योगिक निर्णय यांवर विरोधकांनी टीका केली. काही प्रसंगी त्यांच्या राजकीय लवचिकतेलाही "संधिसाधूपणा" असे संबोधून प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. तथापि, या सर्व टीका आणि वादांमध्येही पवार यांनी शांत, संयमी आणि व्यवहारिक भूमिका घेतली. त्यांनी आरोपांना राजकीय प्रक्रियेचा एक भाग मानत आपले कार्य सुरू ठेवले. संकटांच्या काळातही त्यांनी संवाद, समन्वय आणि रणनीतीच्या आधारे परिस्थिती हाताळली, ज्यामुळे त्यांचे राजकीय अस्तित्व आणि प्रभाव टिकून राहिला. यातून असे दिसून येते की, टीका आणि वाद हे त्यांच्या प्रवासातील अडथळे ठरले नाहीत, तर त्यांनी त्यांना एक प्रकारे राजकीय परिपक्वतेचे साधन बनविले. त्यामुळेच, अनेक आव्हानांनंतरही ते भारतीय राजकारणात एक प्रभावी आणि टिकाऊ नेतृत्व म्हणून उभे राहिले.

निष्कर्ष:

शरद पवार यांचा राजकीय प्रवास हा भारतीय लोकशाहीच्या बदलत्या प्रवाहांचा एक जिवंत आणि सखोल आरसा आहे. राज्य आणि केंद्र या दोन्ही स्तरांवर त्यांनी प्रभावी, परिणामकारक आणि दीर्घकालीन नेतृत्व देत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या कारकिर्दीत सातत्य, परिस्थितीनुरूप जुळवून घेण्याची क्षमता आणि दूरदृष्टी यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. शरद पवार यांच्या प्रवासातून राजकारणातील केवळ सत्ताप्राप्ती नव्हे, तर सत्तेचा उपयोग विकास, स्थैर्य आणि समन्वय साधण्यासाठी कसा करावा, याचे महत्त्व अधोरेखित होते. बदलत्या राजकीय समीकरणांमध्येही त्यांनी आपली भूमिका प्रभावीपणे मांडत नेतृत्वाची एक ठोस परंपरा निर्माण केली. आजही ते भारतीय राजकारणातील एक अनुभवी, मार्गदर्शक आणि रणनीतीकार नेता म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याचा आणि निर्णयप्रक्रियेचा अभ्यास केल्यास भारतीय राजकीय व्यवस्थेतील गुंतागुंत, आघाडी राजकारणाचे स्वरूप आणि नेतृत्वाचे विविध पैलू अधिक स्पष्टपणे समजून येतात. एकंदरीत, शरद पवार यांचा राजकीय प्रवास हा केवळ एका नेत्याची कहाणी नसून, तो भारतीय लोकशाहीच्या विकासाचा आणि परिवर्तनाचा एक महत्त्वपूर्ण अध्याय आहे.

संदर्भ:

1. महाराष्ट्र शासनाची अधिकृत माहिती पुस्तिका – महाराष्ट्र सरकार
2. भारत सरकार, संसदीय कामकाज अहवाल (Parliament of India Records)
3. Sharad Pawar यांचे अधिकृत चरित्र आणि भाषणे
4. "Political History of Maharashtra" – संदर्भ ग्रंथ (सामान्य राजकीय इतिहास पुस्तक)
5. Nationalist Congress Party अधिकृत संकेतस्थळ (NCP Official Website)
6. India Today, The Hindu, आणि Times of India यांसारख्या राष्ट्रीय वृत्तपत्रांतील राजकीय विश्लेषण लेख
7. "Indian Politics: A Comprehensive Study" – राजकीय शास्त्राचे संदर्भ पुस्तक

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

मा.खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांचे राष्ट्र उभारणीतील आर्थिक योगदान

प्रा. एल. के. पवार

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव

***Corresponding Author* - प्रा. एल. के. पवार**

DOI - 10.5281/zenodo.23524639

प्रस्तावना:

भारतीय राजकारणात दीर्घकाळ प्रभाव टाकणारे आणि महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे नेते म्हणजे शरद पवार. त्यांनी मुख्यमंत्री, केंद्रीय कृषिमंत्री आणि विविध महत्त्वाच्या पदांवर कार्य करताना आर्थिक धोरणांची अंमलबजावणी केली. त्यांच्या धोरणांचा केंद्रबिंदू "कृषी व ग्रामीण विकासासह औद्योगिक प्रगती" हा होता. भारतासारख्या विकसनशील देशात आर्थिक धोरणे ही केवळ वाढीपुरती मर्यादित नसून ती सामाजिक न्याय, समावेशक विकास आणि प्रादेशिक संतुलन साधणारी असावी लागतात. पवार यांच्या धोरणांमध्ये हे सर्व घटक स्पष्टपणे दिसून येतात.

ऐतिहासिक व राजकीय पार्श्वभूमी:

शरद पवार यांनी 1970 नंतरच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश केला. त्या काळात राज्याची अर्थव्यवस्था मुख्यतः कृषी आधारित होती.हरितक्रांतीनंतरही ग्रामीण भागात विषमता होती. औद्योगिकीकरण काही भागापुरते मर्यादित होते.सहकार चळवळ विकसित होत होती.या पार्श्वभूमीवर पवार यांनी "संतुलित आर्थिक विकास" ही संकल्पना पुढे आणली. कृषी व उद्योग यांचा समन्वय पवार साहेबांचा विश्वास होता की केवळ औद्योगिकीकरण करून देशाचा विकास होऊ शकत नाही. कृषी क्षेत्र मजबूत असेल तरच उद्योगांना कच्चा माल व बाजारपेठ उपलब्ध होते. उद्योग वाढले तर रोजगार निर्मिती होते. त्यामुळे त्यांनी "कृषी + उद्योग = समतोल विकास" हा दृष्टिकोन स्वीकारला.

आर्थिक विचारसरणी:

शरद पवार यांची आर्थिक विचारसरणी पुढील तत्त्वांवर आधारित होती:

व्यवहार्य अर्थनीती:

ते कोणत्याही एका विचारसरणीला (भांडवलशाही/समाजवाद) पूर्णपणे झुकलेले नव्हते. परिस्थितीनुसार निर्णय घेणे ही त्यांची वैशिष्ट्ये होती. शरद पवार यांची अर्थनीती ही पूर्णपणे व्यवहार्य होती. त्यांनी कधीही केवळ समाजवाद किंवा भांडवलशाही यापैकी एकच मार्ग स्वीकारला नाही, तर दोन्हींचा समन्वय साधला. शरद पवार यांची व्यवहार्य अर्थनीती ही वास्तववादी आणि परिणामकारक होती. त्यांनी

परिस्थितीनुसार निर्णय घेत आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या धोरणांचा मुख्य संदेश असा होता. **"आर्थिक धोरणे ही पुस्तकांतील सिद्धांतांवर नव्हे, तर प्रत्यक्ष परिस्थितीवर आधारित असली पाहिजेत."**

समावेशक विकास:

शरद पवार यांनी आपल्या धोरणांमध्ये केवळ आर्थिक वाढ न पाहता, त्या वाढीचा फायदा समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचावा यावर भर दिला. शेतकरी, कामगार आणि उद्योगपती यांच्यात संतुलन ग्रामीण व शहरी भागातील दरी कमी करणे. शरद पवार यांची समावेशक विकासाची संकल्पना ही समाजातील सर्व घटकांना आर्थिक प्रवाहात आणण्यावर आधारित होती. त्यांचा मुख्य विचार: **"विकासाचा लाभ काही मोजक्या लोकांपुरता न राहता, तो प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला पाहिजे."**

सार्वजनिक-खाजगी भागीदारी:

सार्वजनिक-खाजगी भागीदारी म्हणजे सरकार आणि खाजगी उद्योग यांच्यातील सहकार्याने विकास प्रकल्प राबवणे. "सरकार + खाजगी क्षेत्र = संयुक्त विकास". पवार साहेबांच्या दृष्टिकोनातून सरकारकडे मर्यादित आर्थिक संसाधने असतात. खाजगी क्षेत्राकडे तंत्रज्ञान, गुंतवणूक आणि व्यवस्थापन कौशल्य असते. त्यामुळे दोन्हींचा समन्वय करून जलद विकास साधता येतो. शरद पवार यांनी महाराष्ट्रात आणि राष्ट्रीय स्तरावर सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेलचा वापर वाढवण्यावर भर दिला. शरद पवार यांच्या आर्थिक धोरणांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेलला महत्त्वाचे स्थान होते. त्यांनी सरकार आणि खाजगी क्षेत्र यांच्यातील समन्वयातून विकास साधण्याचा प्रयत्न केला. त्यांचा मुख्य विचार **"सरकार एकटे विकास करू शकत नाही, खाजगी क्षेत्राच्या सहभागानेच विकास जलद आणि प्रभावी होतो."**

कृषी धोरणे:

शरद पवार यांच्या आर्थिक धोरणांमध्ये कृषी क्षेत्राला विशेष महत्त्व होते. यांच्यामुळेच भारतातील शेतकऱ्यांना 70,000 कोटी रुपयांची कर्जमाफी मिळाली, शेतकरी मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झाले होते. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत होते. अशा परिस्थितीत पवार यांनी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन शिंग यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला त्यानंतर केंद्र सरकारने 70,000 कोटी रुपयांची कर्जमाफी योजना लागू केली. ही योजना UPA सरकारच्या काळात (2008) लागू झाली होती आणि ती भारतातील सर्वात मोठ्या कृषी कर्जमाफी योजनांपैकी एक मानली जाते.

सिंचन व जलव्यवस्थापन:

मोठ्या प्रमाणावर सिंचन प्रकल्प उभारले ,जलसंधारण आणि जलव्यवस्थापनावर भर दिला.

बाजारपेठ व किंमत धोरण:

कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ आणि योग्य किंमत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. शरद पवार यांनी आपल्या आर्थिक धोरणांमध्ये "बाजारपेठ व किंमत स्थैर्य" यावर विशेष भर दिला. National Agricultural Cooperative Marketing Federation of India च्या माध्यमातून शेतमाल विक्री किमान आधारभूत किंमत धोरणाला पाठिंबा दिला होता.

तंत्रज्ञान व आधुनिकीकरण:

आधुनिक अर्थव्यवस्थेत तंत्रज्ञान आणि आधुनिकीकरण हे विकासाचे मुख्य आधारस्तंभ मानले

जातात. कृषीप्रधान भारतात शेती आणि उद्योग दोन्ही क्षेत्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय उत्पादनक्षमता वाढविणे शक्य नाही. शरद पवार यांनी आपल्या आर्थिक धोरणांमध्ये या घटकाला विशेष महत्त्व दिले. उत्पादन वाढविण्यासाठी आणि शेतीला फायदेशीर बनविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे" हा त्यांचा ठाम विचार होता. शरद पवार यांनी तंत्रज्ञान व आधुनिकीकरणाच्या माध्यमातून शेती आणि उद्योग क्षेत्रात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांचा मुख्य विचार **"आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय आर्थिक विकास शक्य नाही."**

सहकार चळवळ:

महाराष्ट्रातील सहकार चळवळ ही शरद पवार यांच्या धोरणांचा केंद्रबिंदू होती. शरद पवार यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रात सहकार चळवळ रुजली आणि मोठ्या प्रमाणात विस्तारली, महाराष्ट्रातील सहकार चळवळ आज "वटवृक्ष" बनली आहे. शरद पवार यांनी अनेक सहकारी साखर कारखान्यांना परवानगी दिली. डिस्टिलरी आणि इतर प्रकल्पांना चालना दिली. कारखान्यांसोबत शाळा व कॉलेज उभारणीवरही भर दिला. यामुळे सहकार क्षेत्र फक्त उद्योग न राहता सामाजिक व शैक्षणिक विकासाचे केंद्र बनले.

साखर उद्योग:

महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जाणारा उद्योग म्हणजे साखर उद्योग. सहकार चळवळीच्या माध्यमातून हा उद्योग विकसित झाला आणि त्याला बळकटी देण्यात शरद पवार यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. सहकारी साखर कारखान्यांची स्थापना, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती केली. सहकारी साखर कारखान्यांना प्रोत्साहन दिले. शेतकऱ्यांच्या मालकीचे कारखाने शेतकरी = उत्पादक + मालक "लोकशाही उद्योग" ही संकल्पना त्यांनी पुढे आणली. शरद पवार यांनी साखर उद्योगाला केवळ औद्योगिक क्षेत्र म्हणून न पाहता, तो ग्रामीण विकासाचा मुख्य आधार बनवला. **"साखर उद्योग हा शेतकरी, उद्योग आणि समाज यांना जोडणारा विकासाचा पूल आहे." असा त्यांचा विचार होता.**

दुग्ध व्यवसाय:

भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत दुग्ध व्यवसायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शेतीसोबत पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय शेतकऱ्यांना नियमित उत्पन्न देतो. शरद पवार यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून या क्षेत्राच्या विकासावर विशेष भर दिला. शरद पवार यांनी दुग्ध व्यवसायाला ग्रामीण विकासाचा मजबूत आधार बनवला.त्यांचा मुख्य विचार होता कि **"दुग्ध व्यवसाय हा शेतकऱ्यांना दररोज उत्पन्न देणारा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा उद्योग आहे."**

औद्योगिक धोरण:

औद्योगिकीकरणाला चालना:

एखाद्या राज्याच्या किंवा देशाच्या आर्थिक विकासात औद्योगिक क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी औद्योगिकीकरण आवश्यक असते. शरद पवार यांनी आपल्या आर्थिक धोरणांमध्ये कृषी आणि उद्योग समन्वय साधत औद्योगिक विकासाला चालना दिली. शरद पवार यांचे औद्योगिक धोरण हे संतुलित आणि व्यवहार्य होते. त्यांनी कृषी व उद्योग यांचा समन्वय साधून आर्थिक विकासाचा मार्ग दाखवला. त्यांचा मुख्य विचार असा

होता कि "औद्योगिक विकास हा सर्वसमावेशक आणि ग्रामीण विकासाला पूरक असला पाहिजे."

परदेशी गुंतवणूक:

आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत परदेशी गुंतवणूक ही विकासाचा महत्त्वाचा घटक मानली जाते. भारतासारख्या विकसनशील देशात उद्योग, तंत्रज्ञान आणि रोजगार वाढवण्यासाठी परदेशी गुंतवणूक आवश्यक आहे. शरद पवार यांनी आपल्या आर्थिक धोरणांमध्ये परदेशी गुंतवणूकीला व्यवहार्य पद्धतीने स्वीकारले. शरद पवार यांनी परदेशी गुंतवणूकीला पूर्णपणे विरोध न करता, संतुलित आणि व्यवहार्य दृष्टिकोन स्वीकारला."परदेशी गुंतवणूक ही विकासासाठी आवश्यक आहे, पण ती देशाच्या हिताशी सुसंगत असली पाहिजे." असा त्यांचा मानस होता. त्या माध्यमातून जग प्रसिध्द फेरारी ही इटलीची बहुराष्ट्रीय चॉकलेट कंपनी आहे. तिचे उत्पादन युनिट बारामती मध्ये उभारले.

राष्ट्रीय स्तरावरील योगदान:

2004 ते 2014 या काळात शरद पवार यांनी भारताचे केंद्रीय कृषिमंत्री म्हणून काम केले. या कालावधी भारतीय कृषी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. त्यांनी कृषी उत्पादन वाढविणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारणे आणि अन्नसुरक्षा मजबूत करणे यावर भर दिला. 2000 नंतर भारतातील कृषी क्षेत्र अनेक समस्यांना सामोरे जात होते. शेतकरी कर्जबाजारीपणा, उत्पादनात अस्थिरता आत्महत्यांचे वाढते प्रमाण या पार्श्वभूमीवर पवार यांनी विविध धोरणात्मक उपाय केले. कृषी कर्जमाफी योजना (2008) सुमारे 70,000 कोटी रुपयांची कर्जमाफी लहान व सीमांत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला. National Agricultural Cooperative Marketing Federation of India सारख्या संस्थांना बळकटी दिली. 2004–2014 या कालावधीत शरद पवार यांनी कृषिमंत्री म्हणून भारतीय कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले.

तुलनात्मक विश्लेषण:

शरद पवार यांच्या धोरणांची तुलना इतर नेत्यांशी केल्यास

- त्यांनी कृषी आणि उद्योग यांचा समन्वय साधला
- ग्रामीण विकासावर अधिक भर दिला
- व्यवहार्य आणि संतुलित दृष्टिकोन ठेवला

निष्कर्ष:

शरद पवार यांची आर्थिक धोरणे ही बहुआयामी आणि समतोल होती. त्यांनी कृषी, सहकार, उद्योग आणि पायाभूत सुविधा यांचा समन्वय साधून महाराष्ट्र आणि भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या धोरणांमध्ये "विकासासोबत सामाजिक न्याय" ही संकल्पना ठळकपणे दिसून येते. जरी काही मर्यादा आणि टीका असल्या तरी त्यांचे योगदान भारतीय अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे राहिले आहे.

संदर्भ:

1. भारत सरकार – कृषी मंत्रालय अहवाल
2. महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण
3. योजना आयोग अहवाल
4. विविध संशोधन लेख आणि जर्नल्स
5. शरद पवार यांची भाषणे व मुलाखती

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

खासदार शरद पवार यांचे कृषी क्षेत्रातील योगदान

प्रा. डॉ. हनुमंत गणपत निमसे

सहयोगी प्राध्यापक व प्रमुख, मराठी विभाग

कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव ता. खटाव जि. सातारा.

Corresponding Author - प्रा. डॉ. हनुमंत गणपत निमसे

DOI - 10.5281/zenodo.23524669

प्रस्तावना:

लोकनेते शरद पवार यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबामध्ये बारामती येथे १२ डिसेंबर १९४० रोजी झाला. शरद पवार यांचे बालपण इतर शेतकरी कुटुंबातील मुलासारखेच गेले.आई शारदाबाईच्या चांगल्या संस्काराने आणि पुरोगामी विचारांनी त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झाली होती. त्यामुळेच शरद पवारांना शेती विषयक समस्या आणि शेतकरी यांच्या दुःखाची कारणे माहीत होती. काटेवाडीला शेती असल्यामुळे शेतातील भाजीपाला आणि काही शेती माल दौंड, इंदापूर, वालचंद नगर येथील आठवडा बाजारात विकण्याचे काम शरद पवारांकडे होते .त्यामुळे व्यापारी, दलाल यांच्याकडून शेतकऱ्यांची कशी प्रकारे लूट होते.हे त्यांना चांगले माहीत होते

सन १९७४ मध्ये १२० कोटीचे अन्नधान्य खरेदी करणारा महाराष्ट्र फक्त तीन वर्षात १९७७ मध्ये अन्नधान्य निर्यात करू लागला. त्यामुळे महाराष्ट्राचे शेकडो कोटी रुपये वाचले .पुढे १९७८ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर राज्यातील पहिली कर्जमाफी करून शेतकऱ्यांच्या गळ्याभोवतीचा कर्जाचा फास सोडविणारे शरद पवार होते. तसेच पुलोद सरकारच्या २० महिन्याच्या काळात जमीन, महसुलात सुट , विहिरीसाठी अनुदान, व बिनव्याची कर्ज, बैल आणि चाऱ्यासाठी घेतलेले कर्ज माफ केल .खार जमिनीच्या विकासाचे काम, रोजगार हमी योजनेत समाविष्ट करणे, किमान आधारभूत किंमत इ. अनेक योजना राबविल्या कर्जाचा विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना बाहेर काढले. सन १९८० मध्ये ऐतिहासिक 'शेतकरी दिंडीच्या' माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले. देश विदेशातील शेतीविषयक संस्थांना भेटी देऊन शेती क्षेत्रातील बदलते प्रवाह समजून घेण्याची सवय त्यांनी स्वतःला लावून घेतली. तसेच सन १९८८ मध्ये महाराष्ट्राचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी फळबाग लागवडीला मोठी चालना दिली. प्रतिवर्षी अर्थसंकल्पातून शंभर कोटी रुपयांची तरतूद केली. तीन लाख एकर जमिनीवर चिंच, काजू, सीताफळ, आंबा, संत्री लागवडीचे उद्दिष्ट ठेवले. कोकणातील शेतकऱ्यांनी आंबा आणि काजूच्या बागा लावल्या त्यामुळे हापूस आंब्याचे उत्पादन वाढले. परिणामी मनीऑर्डरवर अवलंबून असणारा कोकणी माणूस आर्थिक दृष्ट्या सक्षम

बनला.कोकणी माणसांची आर्थिक उन्नती झाली. तसेच द्राक्ष, डाळिंब, संत्री अशा फळाने युरोपीय देशांतील बाजारपेठ काबीज केली. या सर्व प्रत्येक टप्प्यावर शरद पवार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. डॉ. स्वामीनाथन यांनी शरद पवार यांचा 'फळ क्रांतीचे जनक' या शब्दांत गौरव केला आहे.

सन २००४ ते २०१४या दहा वर्षात देशाचे कृषिमंत्री म्हणून त्यांनी केलेले काम महत्त्वाचे आहे. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारकडून गृह, अर्थ, संरक्षण, परराष्ट्र यापैकी कोणतेही खाते मिळत असताना ते त्यांनी नाकारून कृषी खाते मागून घेतले. आणि गहू आयतीसाठीच्या प्रस्तावना मंजुरी दिली. देशाला स्वातंत्र्य मिळून सुद्धा शेतीप्रधान म्हणून घेणाऱ्या भारताला अन्नधान्याच्या बाबतीत भारत देश स्वयंपूर्ण नाही ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली. कृषी खात्याकडे गांभीर्याने पाहिले नव्हते. देशातील शेती आणि शेतकरी संकटात सापडला होता. कृषी विषयक संशोधन पूर्णपणे थांबलेले होते. अन्न प्रक्रिया, पशुपालन, अन्न व नागरी पुरवठा या खात्यामध्ये सुसंवाद नव्हता. शेती विकासासाठी त्यांनी संशोधन संस्थातील शास्त्रज्ञांच्या सर्व रिक्त जागा भरल्या व संशोधनाला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. देशात कृषी विद्यापीठे, संशोधन संस्थाचे जाळे निर्माण केले. शेतकऱ्यांच्या विविध पिकांच्या हमीभावात वाढ केली. या सर्व केलेल्या कामगिरीमुळे सन २००० मध्ये गहू या पिकांची आयात करणारा भारत गहू पिकांचा निर्यातदार देश बनला. भाजीपाल्याच्या उत्पादनात मध्ये दुप्पट वाढ झाली. तेल ,डाळीचे आयात घटली त्यामुळे देशाचे ६५ हजार कोटीचे परकीय चलन वाचले. त्यामुळे युनेस्कोच्या अन्न आणि कृषी संस्थेने शरद पवार साहेबांचे अभिनंदन केले. तसेच तत्कालीन भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी "The most creative agriculture minister I have ever seen"असे गौरव उद्गार काढले. हे सर्व करत असताना देशातील ७० हजार कोटींची ऐतिहासिक कर्जमाफी देऊन कर्जाच्या विळख्यातून भारतीय शेतकऱ्यांची कायमची मुक्तता केली. कमी व्याजदराने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याचे नव्याने धोरण आखले. देशाचे कृषिमंत्री असताना अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत उच्चांक प्रस्थापित करणारे शरद पवार महान राजकीय नेते आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पादित शेतीमालाला योग्य भाव मिळावा आणि शेतीमालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी संसदेमध्ये आवाज उठवितात व कृषी संस्कृती आणि व्यापारी वृत्ती यांच्यातील फरक सांगतात. शरद पवार केंद्रात कृषिमंत्री असताना गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी हे पवार साहेबांच्या मदतीने गुजरातसाठी कृषी विकासाच्या योजना राबत होते यावरूनच शरद पवार यांचे शेतीविषयक महान कार्य दिसून येते. यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातील कृषी, सहकार ,औद्योगिक विकास सत्यात उतरावी यासाठी स्वतःला झोकून दिले. केंद्रात काँग्रेस प्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार निवडून आले. डॉ. मनमोहन सिंग हे भारताचे पंतप्रधान झाले. आपणाला कोणते खाते हवे आहे. अशी विचारणा काँग्रेसकडून झाली तेव्हा शरद पवारांनी कृषी खाते मागून घेतले नावाप्रमाणे ते कामाला लागले. याच काळात आजारपणाच्या वेदना सहन करत कृषी खात्याचा कारभार त्यांनी वेगाने पुढे नेहला .अशा अवस्थेमध्ये कृषी खात्यातील बैठका घेणारे कृषिमंत्री पाहून दिल्लीतील लोकांना शरद पवारांना मराठा स्ट्रॉंग मॅन का म्हटले जाते ते कळले.तसेच कृषी खात्याशी नवीन योजना आखून अन्नधान्य उत्पादनात विक्रमी वाढ केली. शरीराने धड

धाकट कृषी मंत्र्यांना अनेक दशके जे जमले नाही ते आजाराची लढा देत शरद पवारांनी काही वर्षातच करून दाखविले .शरद पवारांनी आपलं संपूर्ण आयुष्य विधायक आणि रचनात्मक कार्यात वेचलेले आहे. बुद्धी आणि आवाका मर्यादित असलेल्या लोकांच्याकडे शरद पवारांनी फारशी लक्ष दिले नाही.जनतेच्या हिताचे अनेक निर्णय त्यांनी घेतले. जे तरुण आयटी सेल, सोशल मीडिया आणि व्हाट्सअपच्या युनिव्हर्सिटी यांच्या जाळ्यातून बाहेर पडतील त्याचवेळी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शरद पवारांनी उभे केलेले काम आणि संस्था दिसतील.

शेती मालाच्या विक्रीसाठी मॉडेल ॲक्ट ,बी-बियाणे विषयक कायदा १९६६ फेरबदल केला .त्यामुळे शेतकऱ्यांच्या अधिकारात वाढ होऊन बियाण्याचा संचय, वापर, देवाणघेवाण, विक्री इ. तरतुदीचा समावेश केला .देशातील घाऊक बाजारपेठाशी ऑनलाइन कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून दिली. शेतीमालाच्या विक्रीच्या संदर्भात 'मॉडेल ॲक्ट' हा महत्त्वाचा कायदा केला.तसेच कृषी संबंधी व्यवसायात प्रगती व्हावी यासाठी कृषी मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेली 'लघु शेतकरी कृषी व्यवसाय संघ' ही स्वायत्त यंत्रणा एक नवीन योजना सुरू केली. आय. सी. आर संस्था महत्त्वाची आहे. या संस्थेमार्फत मग ते शेतीशी निगडित संशोधन केरळ मुंबई येथे केले जाते. उंटाशी निगडित संशोधन राजस्थान येथे होते. कांदा, लसूण इत्यादी पिकाबाबतचे संशोधन राजगुरुनगर येथे होते. परंतु संशोधन कमी प्रमाणात झालेले होते. त्यामुळे पुन्हा आयसीएआर च्या कामकाजावर लक्ष देण्याचे ठरविले त्यासाठी त्यांनी 'ॲग्रीकल्चरल सायंटिस्ट रिक्रुटमेंट बोर्ड 'या संस्थेमार्फत नवीन कृषी शास्त्रज्ञ यांची भरती केली. त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी दिली. तसेच आय. सी. आर. अंतर्गत सर्व संस्थांना स्वायत्तता दिली. त्यामुळे त्यांच्या कामात होणारा मंत्रालयाचा हस्तक्षेत थांबला.आणि संशोधकांना प्रतिष्ठा, संस्थेला स्वायत्तता आणि संशोधनाचा भक्कम पाया या त्रिवेणी संगमामुळे आयसीएआर ही संस्था पुन्हा नव्या जोमाने शेती विकासासाठी काम करू लागली.

नव्या आधुनिक पद्धतीने आदर्श शेती करण्यासाठी शास्त्रीय शेतीचा आदर्श सर्वसामान्य शेतकऱ्यांसमोर ठेवला. त्यांचे थोरले बंधू कृषी तज्ञ अप्पासाहेब यांना बरोबर घेऊन बारामती येथे 'कृषी प्रतिष्ठान' ची स्थापना सन १९७१ मध्ये केली. पाण्याबरोबरच शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणण्याची गरज असून शेतीला पूरक असे जोडधंदे सुरू केले तर शेतकरी सुखी होईल असे शरद पवारांचे ठाम मत होते. शरद पवार यांच्या कार्यात अप्पासाहेब यांचे योगदान महत्त्वाचे आहे .या दोघांच्या प्रेरणामुळे बारामती परिसराचा तेथील शेतकऱ्यांचा कायापालट झाला. अप्पा साहेबांच्या कृषी क्षेत्रातील कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना ' पद्मश्री' मानाचा बहुमान पुरस्कार दिला. त्याचबरोबर कृषी क्षेत्रातील संशोधनासाठी नव्या तंत्र साठी राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट या पदवीने गौरविले होते. शरद पवार यांचे कृषी क्षेत्रातील ज्ञान पुस्तके नव्हते तर प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आहे हे लक्षात येते. शेतीचा विकास हा प्रत्यक्ष कृतीतून झाला पाहिजे असा त्यांचा विचार आहे. बारामती कृषी प्रतिष्ठानच्या माध्यमातून शेतकऱ्यांची शेती उद्योग, फुल उत्पादन ,रेशीम उद्योग, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, वराह पालन, शेळी मेंढी पालन ,मत्स्य पालन, मधुमक्षिका पालन इत्यादी उद्योगासारख्या जोड व्यवसायाची जोड

दिली पाहिजे व त्याद्वारे कृषी क्षेत्रात क्रांती घडून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे आर्थिक परिस्थिती मजबूत होईल याविषयीचा विश्वास शरद पवारांचा आहे.

खेड्यातील लोकांना आपल्या गावात रोजगाराची संधी उपलब्ध होईल व त्यामुळे शेतकरी सुखी होईल या प्रेरणेतून देशात व महाराष्ट्रात कृषी क्रांती घडवून आणावयाची होती. शेतीबरोबर जोड व्यवसायाला प्रतिष्ठा मिळवून देऊन शेती क्षेत्राला नवीन दृष्टी दिली. संकरित गायींची पैदास करून त्यांची शास्त्रीय दृष्टीने जोपासना करण्याचा मंत्र दिला.

महाराष्ट्रात विशेषता बारामती परिसरात अभिनव स्वरूपाची चळवळ उभी केली. 'घर तेथे संकरित गाय' हाआर्थिक विकासाचा कार्यक्रम राबविला त्यामुळे महाराष्ट्रात धवलक्रांती झाली .दूध संकलन, वितरणासाठी 'गाव तेथे दुग्ध सहकारी सोसायटी' निर्माण केल्या तसेच काही दुधावर प्रक्रिया करण्याचे प्रकल्प उभारले, वाढती जनावराची संख्या लक्षात घेता जनावरांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी त्या प्रतिष्ठानने जनावरांच्या उपचारासाठी फिरते उपचार केंद्र सुरू केले. व वाहनावर काही व्हेटनरी डॉक्टरांची नेमणूक केली. परिणामी बारामती परिसरात ऊस, कापूस, द्राक्ष ही महत्त्वाची नगदी पिके शेतकरी मोठ्या प्रमाणात घेऊ लागला. या भागात माळेगाव, सोमेश्वर, संसर येथे सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या मालकीचे सहकारी साखर कारखाने सुरू झाले. द्राक्षावर प्रक्रिया करणारे वाईन उद्योग सुरू करण्याचा विचार केला. सन १९७४ - ७५ च्या दरम्यान खासदार शरद पवार यांनी बारामती तालुक्यातील व इतर परिसरातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना संघटित करून' बारामती ग्रेप वाईन इंडस्ट्री' हा कृषी उद्योग सुरू केला. या कामासाठी तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांचे मोठे सहकार्य लाभले. देशातील शेती क्षेत्राला खऱ्या अर्थाने गती द्यायची असेल तर कृषी विज्ञान केंद्र भूमिका बजावतात म्हणून त्यांनी कृषी विज्ञान केंद्राचं जाळ विस्तारण्यावर भर दिला. सन १९७४ मध्ये देशातील पहिले कृषी विकास केंद्र 'पद्दुच्चारी येथे कोईमतुर' या ठिकाणी कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत उभारण्यात आले होते.कृषी हा देशातील उत्पन्नाचा एक प्रमुख भाग आहे. त्याच बरोबर रोजगार उपलब्ध करून देणारे मोठे क्षेत्र आहे. ६१ ठिकाणी वेगवेगळ्या संस्थाच्या समन्वयातून नवे संशोधन प्रकल्प मार्गी लावले .शेती करताना काही विशिष्ट कीटक हे शेती क्षेत्रातील संशोधनासाठी फलदायी असतात. त्यावरच्या संशोधनासाठी आणि स्वतंत्रपणे त्यावर अभ्यास करण्यासाठी 'नॅशनल ब्युरो ऑफ ॲग्रीकल्चर इनसेक्टस रिसोर्सची' निर्मिती केली.

निष्कर्ष:

१. शरद पवार साहेबांनी आपली राजकीय आणि सामाजिक प्रतिमा पुरोगामी विचारांची बनविली आहे.

२. शरद पवार साहेबांनी महाराष्ट्रानाध्ये कृषी, सहकार, शिक्षण क्षेत्रात मोठ्याप्रमाणात क्रांती केली आहे.

३. शरद पवार साहेबांनी विविध मतप्रवाहांचे पक्ष आणि कार्यकर्त्यांशी योग्य प्रभावी संवाद साधला आहे.

४. संवादाची भाषा शैली शांत, संयमी दिसून येते.

५. शरद पवार साहेबांनी घेतलेले निर्णय सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासाला चालना देणारे आहेत.

६. सत्ताकाळामध्ये विविध क्षेत्रांच्या विकासासाठी घेतलेले निर्णयांमध्ये लोकशाही मुल्ये आणि धार्मिक निरपेक्षता यांचा पुरस्कार केलेला आहे.

समारोप:

आज महाराष्ट्रातील राजकीय संस्कृतीला एक नवीन वळण दिसून येते. कारण आपण कुणाबद्दल काय आणि कोणत्या भाषेत बोलतो त्याचे अनेक राजकीय नेत्यांना भान राहिलेलं नाही. व्यापलेला आहे अशावेळी संस्कृत बोलणारे, वागणारे शरद पवार खूप मोठे वाटतात त्याच्यावर किती ही टोकाची टीका झाली तर त्यांनी आपल्या भाषेचा दर्जा घसरू दिलेला नाही. शेतकरी, कारखानदार, सरकारी नोकरदार, व्यापारी, महिला, दलित, आदिवासी आणि भटके यांच्या हिताचे अनेक चांगले निर्णय घेतले. मोठा राजकीय वारसा नसताना शरद पवार राजकारणात गेली सहा दशके केंद्रस्थानी राहिलेले आहे. ते त्यांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक औद्योगिक, कृषी क्षेत्राला भरीव असं केलेले हे राष्ट्र बांधणीतील महत्त्वाचे योगदान आहे.

संदर्भ:

१) शरद पवार , 'लोक माझे सांगाती'राजहंस प्रकाशन, प्रा.लि.पुणे, आवृत्ती दुसरी, डिसेंबर २०१५

२) प्रा.डॉ. एन. डी .लोखंडे, 'महाराष्ट्राला न समजलेले शरद पवार' अक्षरबंध प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १४ जानेवारी २०२४.

३) ॲड. राम कांडगे , 'लोकनेते शरदराव पवार' राजश्री प्रकाश, चाकण ,पुणे प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २०१०.

४) संपादन:-अरुण टिकेकर ,रोहन प्रकाशन, पुणे पाचवी आवृत्ती, डिसेंबर २०१३.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

खासदार शरद पवार यांचे शैक्षणिक कार्य व विचार संशोधनात्म विश्लेषण

प्रा. कविता म्हेत्रे

संशोधक विद्यार्थी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

Corresponding Author - प्रा. कविता म्हेत्रे

DOI - 10.5281/zenodo.23524691

प्रस्तावना:

भारताच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात खासदार शरद पवार यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी केवळ राजकारणातच नव्हे तर शिक्षण क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात कार्य केले आहे. शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे साधन आहे. या विचारातून त्यांनी महाराष्ट्रात विविध शैक्षणिक संस्था उभारल्या आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या शिक्षण विषयक दृष्टिकोनात व्यवहारिकता, कौशल्य विकास आणि समावेशकता दिसून येते .या संशोधन पेपर मध्ये त्यांच्या शैक्षणिक कार्यांचा आणि विचारांचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे.

महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,राजर्षी शाहू महाराज, पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण क्षेत्रातील विचारांचा व त्यांच्या शैक्षणिक कार्याचा पगडा खासदार शरद पवार यांच्यावर आहे. या त्यांच्या विचाराने व कार्याने शिक्षण क्षेत्रात बहुमोल अशी कामगिरी करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. विशेषता शिक्षण क्षेत्रातील विचारांचे मार्गदर्शन आई-वडील यांनीही त्यांना लहानपणी दिले. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाई हे शिक्षण मंत्री असताना शिक्षणाचे सार्वत्रिकरण होण्यासाठी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचली पाहिजे या उद्देशाने महाराष्ट्रातील पालकांचे वार्षिक उत्पन्न बाराशे रुपये पेक्षा कमी असलेल्या मुलास शिक्षण मोफत देण्याचा निर्णय झाला. याही निर्णयाचा प्रभाव शरद पवार यांच्यावर झाला. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांच्यानंतर सन १९८८ मध्ये शरद पवार रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले. या संस्थेचे नेतृत्व स्वीकारून पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दाखविलेला शिक्षणाचा मार्ग प्रसार व शिक्षणाचे फायदे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे यासाठी शरद पवार मोठ्या तळमळीने संस्थेत कार्यरत आहे . रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या वार्षिक सभेत आपले शिक्षण विषयक विचार व्यक्त करत असतात. त्यांची शिक्षण क्षेत्राविषयीची वैचारिक भाषणे महत्त्वाची आहेत .त्याच्या भाषणातील विचारांचा संदेश केवळ रयत शिक्षण संस्थेपुरता मर्यादित न राहता शिक्षण क्षेत्राविषयी तळमळ वाटणाऱ्या सर्व संबंधितांना ते संदेश देतात. विद्यार्थी हा

संपूर्ण शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे. यावर त्यांचा विश्वास आहे.उच्च शिक्षण हे मानवी जीवनातील महत्त्वाचे आहे.तसेच उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी वेळोवेळी व्यापक आणि सखोल चिंतन होऊन त्याद्वारे शिक्षणाला उचित असे आयाम प्राप्त होणे आवश्यक आहे. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया बनायला हवी याचे सर्वांनी भान ठेवले पाहिजे असे ते सांगतात.

उच्च शिक्षणा बाबतचे विचार:

खासदार शरद पवार यांना उच्च शिक्षणाची गुणवत्ता ही अभ्यासक्रमातील आशय आणि पाठ्यक्रमातील विषयात यावर अवलंबून असते असे वाटते. अभ्यासक्रमातील आशय आणि पाठ्यक्रमातील विषयात यात सातत्याने गतिमान घटक असले पाहिजे सतत बदलत असणाऱ्या सामाजिक जीवनाशी आणि अधिकाधिक गुंतागुंतीच्या व सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानाची सुसंगत अशी गुणवत्ता आणि कौशल्य प्राप्त करून देणारे शिक्षण पाहिजे.हे कार्य प्रशिक्षित शिक्षक व्यक्तींना शक्य होईल त्यासाठी उच्च शिक्षण देणाऱ्या देशातील संस्थानी उपयोजित घटक समाविष्ट असलेले आणि सतत अद्यावत केले जाणारे अभ्यासक्रम विकसित केले गेले पाहिजे असे सांगतात.

शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबंधी विचार:

शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबंध असलेला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शिक्षक होय. इतर कोणत्याही व्यवसायात वाव मिळत नाही म्हणून सामान्य बुद्धिमत्तेच्या व्यक्तीनी उच्च शिक्षण क्षेत्रात शिक्षक म्हणून प्रवेश करू नये, कारण अत्यंत उत्तम बुद्धिमत्ता असलेली समाजातील व्यक्ती जर उच्च शिक्षण क्षेत्राकडे अध्यापनासाठी आकर्षित झाली तर उच्च शिक्षणातील गुणवत्ता वाढू शकते .उच्च बौद्धिक क्षमता, आत्मविश्वास, कार्यक्षमता, परिणामकारक संवाद कौशल्य हे गुण ज्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये असतात अशाच व्यक्तींनी उच्च शिक्षणा क्षेत्रात अध्यापन केले पाहिजे, तसेच विद्यार्थ्याकडून शिक्षकांचे मूल्यमापन झाले पाहिजे, ज्ञानाच्या नवीन क्षितिजांना शिक्षकाने सतत सामोरे गेले पाहिजे. तरच शिक्षक आपले अध्यापन क्षमता व कौशल्य अद्यावत राखू शकतात. म्हणूनच विद्यापीठ अनुदान आयोगासारख्या संस्था दरवर्षी मोठ्या प्रमाणावर खर्च करून अभ्यासक्रम, उजळणी अभ्यासक्रम, मोठमोठ्या परिषदा, परिसंवाद कार्यशाळा, आयोजित करत असतात. हे सर्व विचार उच्च शिक्षणांच्या गुणवत्तेशी संबंधित असणारे आहेत.

ग्रंथालय आणि प्रयोगशाळा या सुविधा बाबतचे विचार:

शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबंधित असलेला तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे ग्रंथालय आणि प्रयोगशाळा या सुविधा होय. उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये महाविद्यालयाचे ग्रंथालय आणि प्रयोगशाळा या प्राथमिक पायाभूत सुविधा म्हणून गणल्या जात असतात. तर विद्यार्थी वसतिगृह, आरोग्य केंद्र, क्रीडांगण आणि इतर सांस्कृतिक सुविधा या दुय्यम पायाभूत सुविधा असतात. उच्च शिक्षण व्यवस्थेतील या पायाभूत सुविधांच्या बाबतीत काळजीपूर्वक नियोजन करणे त्या अद्यावत राखणे आणि त्या सतत वृद्धिंगत करणे आवश्यक आहेत.

संघटन कौशल्य आणि योग्य व्यवस्थापन:

उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आवश्यक असलेला महत्त्वाचा घटक संघटन आणि व्यवस्थापन हा आहे. व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांची ग्रहण क्षमता वाढविणे, शिक्षकांची अध्यापन क्षमता वृद्धिंगत केल्यामुळे विद्यार्थी

व शिक्षक यांना अध्ययन आणि अध्यापना बाबत अधिकाधिक प्रेरणा मिळेल अशा पायाभूत सुविधा पुरविणे यावर भर दिला पाहिजे. हे सर्व साध्य करण्यासाठी उच्च शिक्षणासाठी योग्य असे वित्तीय नियोजन सुद्धा अत्यंत आवश्यक आहे प्रत्येक विद्यार्थ्यामागे किती खर्च येतो याचे काटेकोरपणे परिगणना करून त्यांच्या आधारे विद्यार्थ्याकडून शुल्क पद्धतीची सामाजिक न्याय दृष्टिकोनातून फेररचना करणे अत्यंत गरजेचे ठरते. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांमध्ये होणारा संपूर्ण खर्च फीच्या रूपाने विद्यार्थ्यांच्या कडून वसूल करणे हे आजही शक्य नाही. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. त्यासाठी उच्च शिक्षणावरील खर्चाचा काही भाग हा सार्वजनिक निधीतून भागविला पाहिजे.

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्पर्धेकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे कारण १९८८मध्ये गेट करारावर स्वाक्षरी केल्यापासून उच्च शिक्षणातील स्पर्धा निरनिराळ्या देशांमध्ये जाणवू लागली.त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा विषय ठरलेल्या उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांना स्पर्धेसाठी व्यूहरचना करत असताना गुणवत्तेबरोबर विपणन या अनुषंगाने विचार केला पाहिजे. त्यामुळे उच्च शिक्षण भारतीय शिक्षण संस्थांना शिक्षण क्षेत्रातील बदलती आव्हाने आणि तीव्र स्पर्धा यांना तोंड द्यावे लागणार आहे. या नव्या व्यवस्थेमध्ये टिकून राहण्यासाठी त्यांना साधन संपत्ती जमवावी लागणार आहे. उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये अर्थात वैद्यकीय शिक्षण हे अत्यंत महागडे व्यवसायिक शिक्षण समजले जाते.तसेच वैद्यकीय महाविद्यालय चालविणाऱ्या खाजगी संस्था शुल्क वाढवितात त्यामुळे वैद्यकीय शिक्षण हे अधिकच महागडे होत चाललेले आहे. त्यामुळे समाजातील आर्थिक दुर्बल असणाऱ्या कुटुंबातील बुद्धिमान मुलांना वैद्यकीय शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. अशा परिस्थितीमध्ये शिक्षणाच्या खाजगीकरणाच्या परिणामाची शासनाने आणि समाजाने अधिक गांभीर्याने दखल घ्यायला हवी.कारण सामाजिक बांधिलकीच्या जाणवेतून बुद्धिमान परंतू आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आर्थिक साह्य करण्याची पद्धती आणि व्यवस्था निर्माण करावी लागेल तसेच प्रवेशाची कार्यपद्धती पारदर्शक, आधारित असली पाहिजे. समानता, सामाजिक न्याय, आणि व्यापक संधी या तत्त्वांना बळी देऊन जर या क्षेत्रात स्पर्धा तयार झाली तर वैद्यकीय सेवा ही चैनीची बाब ठरेल याविषयी चिंता व्यक्त केली गेलेली आहे. म्हणून. वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थेवर अल्प प्रमाणात का होईना परंतू शासनाचे नियंत्रण आणि देखरेख आवश्यक आहे. याविषयी विचार मांडलेला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्ताधारक दर्जेदार उच्च शिक्षण मिळाले पाहिजे. वैद्यकीय शिक्षणामुळे माणसाचे सरासरी आयुर्मान वाढले आहे. आरोग्य विज्ञान शिक्षणात गुणवत्ता, काटेकोरपणा आणि मानवता यांचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. म्हणूनच आरोग्य विज्ञान शिक्षणावरील दर्जा, नियंत्रणाचा अंकुश. बारकाईने देखरेख करणे आवश्यक आहे.सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव राखणे फार आवश्यक आहे असे सांगतात .तसेच तसेच उच्च शिक्षण क्षेत्रातील आरोग्य विज्ञान शिक्षणामध्ये संशोधनाला विशेष महत्त्व आहे. कारण वैद्यकीय क्षेत्रातील प्रत्येक नवीन संशोधन म्हणजे आजारी व्यक्तींना ते वरदान असते. संशोधन पद्धतीचा पाया भक्कम करणारे प्रशिक्षण आरोग्य विज्ञानातील पद्धत आणि संशोधन शिक्षण क्रमामध्ये समाविष्ट केले गेले पाहिजे याबाबत आपले विचार सांगतात ही दोन उद्दिष्टे वैद्यकीय संशोधकांपुढे असायला पाहिजे.

प्राथमिक शिक्षणाबाबतचे विचार:

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणातील गळती बाबत चिंता व्यक्त करतात. प्राथमिक शिक्षणात जिल्हा परिषद, नगर परिषद, नगरपालिकांच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे वर्ग आणि खाजगी शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे वर्ग अशी विभागणी झाल्याचे ते सांगतात प्राथमिक शिक्षणाची होत असणारी हेळसांड थांबविण्यासाठी लोकांत,समाजात सहभाग असला पाहिजे, गुणवत्ता वाढीसाठी गावातील नागरिकांचे लक्ष असले पाहिजे.ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रत्येक गावात महिलांची शिक्षण समिती असली पाहिजे असे शरद पवार साहेब सुचविता.मुलींना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे त्यासाठी गावकऱ्यांचा, समाजाचा कल असला पाहिजे असा आग्रह ते सतत करतात.

स्वातंत्र्यानंतर आजही देशांमध्ये निरक्षरता संपलेली नाही. अजूनही ५३ टक्क्यापेक्षा जास्त लोकांना लिहिता वाचता येत नाही. हे वास्तव आहे. निरक्षरतेमुळे स्त्रिया समाज विकास व समृद्धी पासून बाजूला राहिलेले चित्र दिसून येते. हे निरक्षरतेचे आव्हान महाराष्ट्रा समोर मोठ्या प्रमाणामध्ये आहे. निरक्षरता कमी करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील हितचिंतक, विद्यार्थी,विद्यार्थीनी यांना बरोबर घेऊन काम केले पाहिजे. याविषयी विचार मांडलेला आहे .तसेच आजही विशेषता मुलींचा फार मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे .त्यामुळे समाजाची मानसिक बैठक तयार होत नाही. ज्याप्रमाणे मुलांना उच्च शिक्षण दिले जाते. त्याच पद्धतीने मुलींच्या उच्च शिक्षणासाठी प्रयत्न कमी दिसतात. गावात हायस्कूल नाही तिथे पालक बाहेरच्या गावच्या हायस्कूलमध्ये मुली शिक्षणासाठी पाठविण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण बंद होते. या गरीब कुटुंबात जन्माला आल्यामुळे कौटुंबिक जबाबदारी सांभाळण्याची जबाबदारी निर्माण होते. आई-वडील दोघेही पोट भरण्यासाठी मोल मजुरीच्य कामावर जात असतात. त्यामुळे अशा कुटुंबांमधील अवस्थेत मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवण्याची वृत्ती आजही आपल्याला पाहावयास मिळते. म्हणून समाज शक्तीशाली बनविण्यासाठी समाजातल्या ५० टक्के वर्गाला या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले पाहिजे तरच साक्षरतेचा प्रश्न सुटणार आहे. ज्याप्रमाणे मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे त्याचप्रमाणे अर्धवट शिक्षण सोडणाऱ्या मुलांचा प्रश्न सुद्धा अत्यंत महत्त्वाचा आहे. शैक्षणिक, सामाजिक दृष्ट्यांची काही महत्त्वाचे आव्हाने निर्माण होत आहेत. त्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने कामगिरी करून दाखविली आहे.हे आपण समाजापुढे आदर्श म्हणून ठेवले पाहिजे. पुढच्या काळामध्ये समाजाची व तरुण पिढीची गरज लक्षात घेऊन त्यांना व्यवसायिक शिक्षण देऊन आधुनिक शिक्षणाची जोड देणं मोठ्या प्रमाणावर देणे गरजेचे आहे. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची ज्ञानगंगा समाजातल्या सर्व घटकापर्यंत पोहोचविली. कर्मवीर अण्णांच्या या शिक्षण क्षेत्रातील पवित्र कार्यात अनेकांनी आपले योगदान दिले. त्यामध्ये शरद पवार साहेब यांची कामगिरी महत्वाची आहे. तळागाळातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे ही भूमिका घेऊन ग्रामीण भागातील, आदिवासी भागातील, उपेक्षित समाजातील आणि शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींना ज्ञानाचे धडे देऊन त्यांना शिक्षण क्षेत्राच्या मुख्य प्रवाहात आणण्याची भूमिकां मांडून विचारांची कृती करण्याचा आग्रह धरतात .याबाबत आपण नेमके काय करायला हवे याबाबतचा ऊहापोह सतत ते करत आहेत. कर्मवीर

अण्णांच्या शैक्षणिक विचारावर व कार्यावर श्रद्धा असणारे खासदार शरद पवार विचाराचा ध्यास घेऊन सातत्याने पाठपुरावा करतात आणि बदलत्या काळाची आव्हाने स्वीकारण्याचा विचार सतत दाखवून देत असतात. संस्थेच्या ध्येय धोरणानुसार आधुनिक काळातील बदलाशी सुसंगत अशी आधुनिक शिक्षण पद्धतीतून सर्व घटकापर्यंत शिक्षण पोचविण्यासाठी सतत प्रयत्न करतात. शरद पवार यांचा हा शिक्षण विषयकचा दृष्टिकोन केवळ रयत शिक्षण संस्थेपुरता मर्यादित नाही तर संपूर्ण महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी महत्त्वाचा आहे. आणि त्यांचा हा दृष्टिकोन सबंध भारतभर पसरण्याचा आशावाद आहे.

शरद पवार शिक्षणाचे सार्वत्रिकरण व विस्तार याविषयी आपले विचार मांडतात. प्राथमिक शिक्षणातील गळती चिंता व्यक्त करतात. मुलींची शिक्षणाबद्दलची समाजाची बेफिकीर त्यांना अस्वस्थ करते. म्हणून शिक्षणाचे सार्वत्रिकरण, विस्तार गुणवत्ता दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्नशी पराकाष्टा करण्याचे आव्हान वेळोवेळी आपल्या भाषणातून करतात. व्यावसायिक शिक्षण, शिक्षणाचे जागतिकीकरण, इंटरनेट आणि जैविक तंत्रज्ञान याबद्दल त्या काळाशी सुसंगत अशा आधुनिक शिक्षणाचा अंगीकार करून ज्ञानसंपन्न पिढी बनविण्याचे धोरण ते प्रत्यक्ष कृतीने राबवतात.

प्रौढ साक्षरता कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे प्रौढांना देशातील प्रचलित घडामोडीचे ज्ञान देणे होय. साक्षरता अभियान राबविण्यास जोमाने सुरुवात केली. या अभियाना अंतर्गत राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण, संरक्षण, स्वच्छता, स्त्री पुरुष समानता, लहान कुटुंबाचा आदर्श, आर्थिक शोषणाबद्दलची जागृती या लोक हितोपती कार्यक्रमाचा समावेश शरद पवार यांनी या अभियानातून केलेला दिसून येतो. देशाची सांस्कृतिक एकात्मता आणि भारतीय भाषेचा विकास होण्यासाठी संस्कृत भाषेला शालेय व विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रमावर स्थान देण्याचा निर्णय शरद पवार यांनी घेतला त्यामुळे महाराष्ट्राच्या थोर सांस्कृतिक प्रतिष्ठितेची जोपासना झाली.

गेट कराराने संपूर्ण जग जवळ आले. आंतरराष्ट्रीय बदलत्या परिस्थितीने सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढली, स्पर्धेत टिकायचे असेल तर गुणवत्ता, दर्जा असला पाहिजे याविषयीचा व्यवहारवादी विचार ते मांडतात. या स्पर्धेत स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी समाजातील सर्व स्तरातील घटकांनी आधुनिक शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे. ते शिक्षण समाजातील सर्व घटकांना मिळाले पाहिजे असा ते आग्रह करतात. व त्याप्रमाणे ते कृती करतात हा शिक्षणाचा उदात्त विचार मांडत असताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत त्याचबरोबर तळागाळातल्या घटकापर्यंत मुला-मुलींना शिक्षण पोहचविण्यास सतत प्रयत्न केला गेला पाहिजे याविषयी ते मार्गदर्शन करतात .कारण शिक्षणापासून समाजातील मोठा वर्ग अद्यापही बाजूला असल्याचे सांगून आजही साक्षरतेचे प्रश्न आहेत स्त्री शिक्षणाची परवड आहे. विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रश्न आहेत. असा मूलभूत विचार ते व्यक्त करतात. शिक्षणाच्या विस्तारणाबरोबरच गुणवत्ता वाढीची खबरदारी घेण्याचा आग्रह ते सातत्याने धरतात. बुद्धिमत्तेचा मक्ता ठराविक वर्गाचा नाही, उपेक्षित वर्गातील मुला मुलींना शिक्षणाची संधी मिळाल्यास ते आपल्या कर्तृत्वाने समाजासाठी बुद्धीचा प्रकाश दाखवू शकतात. डोंगरी, आदिवासी भागातील मुले -मुली या बदलापासून दूर राहणार नाही त्याची काळजी घेतली पाहिजे त्यांना चांगल्या शिक्षणाची संधी मिळवून दिली पाहिजे. मुलींच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. समानता शिक्षण आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया या मुलींना चांगली संधी

दिली पाहिजे अशी संधी ज्या देशात दिली जाते तो देश समृद्ध होतो. त्यासाठी मुलींच्या शिक्षणाचा विस्तार करणे, त मुलींना जबाबदारीची भूमिका पार पाडण्याची संधी देणे आणि त्यांना मोठ्या मनाने निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे हे काम केले तर आपला देश समृद्ध होईल हा आधुनिक विचार त्यांनी देशाला दिलेला आहे.

शिक्षणाच्या जागतिकीकरणात स्पर्धेच्या युगात विद्यार्थी टिकला पाहिजे म्हणून शासनाच्या प्रयत्ना बरोबरच विद्या प्रतिष्ठान, मातोश्री शारदाबाई पवार, यांच्या माध्यमातून सामान्यातल्या सामान्य विद्यार्थ्यास संगणक तंत्रज्ञान शिक्षण मिळाले पाहिजे, कोणताही विद्यार्थी संगणक प्रशिक्षणापासून दूर राहणे भविष्यामध्ये परवडणार नसल्यामुळे खेड्यापाड्यातल्या मुलापर्यंत संगणक शिक्षणाची सोय बारामती मध्ये उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी सुव्यवस्थित अशा संगणक लॅब उभा केल्या आहेत. त्यांना आधुनिक व दर्जेदार शिक्षण देण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. मातृभाषेबरोबर इंग्रजी भाषेचे विद्यार्थ्यांनी ज्ञान संपादन केले पाहिजे या विषयाचा आग्रह धरतात. जागतिक भाषा म्हणून इंग्रजी भाषेला महत्त्व आहे. शैक्षणिक विस्तार, गुणवत्ता आणि जगाच्या स्पर्धेत उतरल्याने शिक्षणाद्वारे सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक भूमिका स्वीकारण्याचे आव्हान करतात.शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व घटकांना सातत्याने ते मार्गदर्शन करतात. समाजातील उपेक्षित, आदिवासी समाजातील स्त्रियांच्या शिक्षणा बरोबर अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रयत्न झाले पाहिजे याविषयीचा देशातील युवकांना संदेश देताना ते सतत म्हणतात स्वतःची गुणवत्ता, ज्ञान, कष्ट या गोष्टी जमेच्या असतील तर व्यक्तीचा विकास आपोआप होतो .आपल्या कर्तृत्व आणि चिकाटीने मेहनतीने समाजात मोठी माणसं झाल्याची अनेक उदाहरणं आहेत याचा बोध तरुणांनी घेतला पाहिजे. जगात होणाऱ्या बदलावर दृष्टी ठेवली पाहिजे व ज्या समाजातून आपण जन्माला आलो. समाजात वाढलो त्याच्याशी बांधिलकी ठेवली पाहिजे.खासदार शरद पवार यांचे हेच दृष्टे पण देशाला निश्चितच सामर्थ्यवान बनवेल अशा या दृष्ट्या शरद पवारांना अमेरिकेतील डेट्राईट विद्यापीठासह भारतातील अन्य चार विद्यापीठाने डिलीट पदवीने सन्मानित केलेले आहेत.

संदर्भ:

१) अँड. राम कांडगे, 'लोकनेते शरद राव पवार', राजश्री प्रकाशन चाकण, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २०१०.

२) संपादन:अरुण टिकेकर, रोहन प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, डिसेंबर २०१३.

३) प्रा.डॉ.एन.डी .लोखंडे,' 'महाराष्ट्राला न समजलेले शरद पवार' ', अक्षरबंध प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १४
जानेवारी २०२४.

४) शरद पवार,'लोक माझे सांगाती', राजहंस प्रकाशन प्रा लि.पुणे, आवृत्ती दुसरी, डिसेंबर २०१५.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीतील खा. शरद पवार यांचे योगदान

सौ. स्वाती विकास कुंभार

संशोधक विद्यार्थी,

एस.एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई

Corresponding Author - सौ. स्वाती विकास कुंभार

DOI - 10.5281/zenodo.23524713

प्रस्तावना:

ग्रंथालये ही समाजाची वैचारिक ऊर्जा केंद्रे असतात. महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळ रुजविण्यात अनेक समाजसुधारकांचा वाटा आहे. महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळीची सुरुवात सामाजिक सुधारणा चळवळींबरोबर झाली. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण आणि वाचनसंस्कृतीला महत्त्व दिले. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासासाठी स्वतंत्र धोरण स्वीकारले.

सन १९६७ मध्ये महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम लागू करण्यात आला. या कायद्यामुळे राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता, अनुदान आणि प्रशासकीय चौकट उपलब्ध झाली. पुढील काळात ग्रामीण भागात वाचनालये वाढविणे, पुस्तक खरेदीसाठी निधी उपलब्ध करणे आणि विद्यार्थ्यांना अध्ययन सुविधा निर्माण करणे या बाबींवर भर देण्यात आला.

खा. शरद पवार यांची शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टी:

खा. शरद पवार यांची राजकीय कारकीर्द केवळ प्रशासनापुरती मर्यादित नसून सामाजिक आणि शैक्षणिक विकासाशी निगडित आहे. त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रमांना पाठबळ दिले. त्यांच्या मते शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी वाचनसंस्कृती आवश्यक आहे. ग्रामीण युवकांनी केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता संदर्भग्रंथ, चरित्रे, इतिहास, विज्ञान आणि साहित्य यांचे वाचन करावे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये ग्रंथालयांच्या उभारणीसाठी आर्थिक सहाय्य आणि धोरणात्मक प्रोत्साहन देण्यात आले.

शासकीय धोरणे आणि अनुदान विकास:

खा. शरद पवार यांनी महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्थेला अधिक सक्षम आणि व्यापक करण्यासाठी विविध शासकीय धोरणांना प्राधान्य दिले. मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात ग्रंथालय विकास हा केवळ सांस्कृतिक विषय न राहता शिक्षण आणि सामाजिक विकासाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिला

गेला. महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या कार्यक्षमतेनुसार त्यांचे अ, ब, क आणि ड अशा वर्गांमध्ये वर्गीकरण करण्यात आले होते. या वर्गीकरणानुसार शासनाकडून अनुदान दिले जात असे. खा. शरद पवार यांनी या अनुदानामध्ये वाढ करण्याचे धोरण स्वीकारले, ज्यामुळे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागातील वाचनालयांना मोठा आधार मिळाला. वाढीव अनुदानामुळे ग्रंथालयांना नवीन पुस्तके, नियतकालिके आणि संदर्भ साहित्य खरेदी करणे शक्य झाले.

लहान गावांमधील अनेक ग्रंथालये आर्थिक अडचणींमुळे बंद पडण्याच्या स्थितीत होती. खा. शरद पवार यांच्या धोरणांमुळे अशा ग्रंथालयांना स्थैर्य प्राप्त झाले. कर्मचाऱ्यांचे वेतन, इमारतींची देखभाल, वाचनकक्ष व्यवस्था आणि प्रकाशन यासाठी निधी उपलब्ध होऊ लागला. यामुळे सार्वजनिक वाचनालयांची कार्यक्षमता वाढली. ग्रामीण भागातील युवकांसाठी ग्रंथालये माहिती केंद्र म्हणून विकसित करण्यावर त्यांनी भर दिला. कृषी, पशुसंवर्धन, सहकार, उद्योग, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांसंबंधी पुस्तके व माहिती साहित्य उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करण्यात आले. शेतकरी आणि ग्रामीण उद्योजकांना आधुनिक माहिती मिळावी यासाठी कृषीविषयक नियतकालिके आणि शासन योजनांची माहिती ग्रंथालयांमार्फत उपलब्ध करून देण्यात आली. स्पर्धा परीक्षांची वाढती गरज लक्षात घेऊन जिल्हा आणि तालुका ग्रंथालयांमध्ये स्पर्धा परीक्षा विभाग सुरू करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी., बँकिंग, पोलीस भरती आणि इतर शासकीय परीक्षांसाठी आवश्यक पुस्तके, प्रश्नसंच आणि मासिके उपलब्ध करून देण्यात आली. ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरांमध्ये जाऊन महागडी अध्ययन सामग्री खरेदी करण्याची गरज कमी झाली. महिलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचन संस्कृती वाढविण्यासाठी महिला वाचनालय योजना आणि प्रौढ शिक्षणाशी संबंधित साहित्य उपलब्ध करण्यावरही भर देण्यात आला. काही भागांमध्ये फिरती ग्रंथालये आणि गावपातळीवरील वाचन केंद्रे सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. ग्रंथालय संचालनालयाच्या माध्यमातून ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, पुस्तक निवड प्रक्रिया आणि ग्रंथालय व्यवस्थापन सुधारण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. यामुळे ग्रंथालय प्रशासन अधिक संघटित आणि परिणामकारक बनले. खा. शरद पवार यांच्या धोरणांमुळे सार्वजनिक ग्रंथालये ही केवळ पुस्तक ठेवण्याची ठिकाणे न राहता सामाजिक शिक्षण, माहिती प्रसार आणि लोकजागृतीची केंद्रे बनली. ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य नागरिक यांना ज्ञानसंपन्न करण्यामध्ये या ग्रंथालयांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

शैक्षणिक संस्थांतील ग्रंथालय विकास:

शैक्षणिक संस्थांतील ग्रंथालय विकास खा. शरद पवार यांनी शिक्षण क्षेत्राच्या विकासामध्ये ग्रंथालयांना केंद्रस्थानी मानले. त्यांच्या मते, दर्जेदार शिक्षणासाठी केवळ वर्गखोल्या आणि शिक्षक पुरेसे नसून समृद्ध ग्रंथालय व्यवस्था देखील अत्यावश्यक आहे. त्यामुळे त्यांनी महाविद्यालये, विद्यापीठे आणि ग्रामीण शिक्षणसंस्थांमध्ये आधुनिक ग्रंथालय सुविधा विकसित करण्यास प्रोत्साहन दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये स्वतंत्र आणि सुसज्ज ग्रंथालय इमारती उभारण्यात आल्या. विद्यार्थ्यांना शांत वातावरणात अभ्यास करता यावा म्हणून प्रशस्त वाचनकक्ष, संदर्भ विभाग आणि नियतकालिक विभाग सुरू करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी विद्यार्थ्यांप्रमाणेच अध्ययन सुविधा मिळाव्यात, हा या

उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. त्यामुळे ग्रामीण महाविद्यालयांमध्ये पुस्तक खरेदीसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यात आला. विज्ञान, वाणिज्य, इतिहास, समाजशास्त्र, कृषी आणि तंत्रज्ञान या विविध विषयांवरील संदर्भग्रंथ उपलब्ध करण्यावर भर देण्यात आला. संशोधन संस्कृतीला चालना देण्यासाठी विद्यापीठीय ग्रंथालयांमध्ये संशोधन साहित्य, प्रबंध, संदर्भकोश आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय जर्नल्स उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करण्यात आले. संशोधक आणि प्राध्यापकांना अद्ययावत माहिती मिळावी यासाठी नियतकालिक आणि माहिती सेवा वाढविण्यात आल्या. शैक्षणिक संस्थांमध्ये ग्रंथालयांचे संगणकीकरण करण्यासही प्रोत्साहन देण्यात आले. पुस्तकांची डिजिटल सूची, बारकोड प्रणाली आणि ऑनलाइन माहिती शोध सेवा यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य सहज उपलब्ध होऊ लागले. काही संस्थांमध्ये ई-लायब्ररी आणि डिजिटल वाचन सुविधा सुरू करण्यात आल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन अध्ययन सामग्रीचा लाभ मिळू लागला. खा. शरद पवार यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी "ग्रंथालय वापर संस्कृती" विकसित करण्यावर भर दिला. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षापुरते वाचन न करता अवांतर वाचन, चरित्रग्रंथ, साहित्य आणि संशोधनपर पुस्तके वाचावीत, असे ते नेहमी सांगत असत. यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला आणि बौद्धिक क्षमतेला चालना मिळते, असा त्यांचा विश्वास होता.

महाविद्यालयीन परिसरामध्ये पुस्तक प्रदर्शन, वाचन प्रेरणा दिन, लेखक भेट कार्यक्रम आणि व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठीही त्यांनी प्रोत्साहन दिले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला. ग्रंथालय विकासामुळे शैक्षणिक संस्थांचा दर्जा उंचावण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाची गुणवत्ता सुधारली, संशोधनाला चालना मिळाली आणि ग्रामीण युवकांना उच्च शिक्षणासाठी आवश्यक माहिती सहज उपलब्ध झाली. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रामध्ये ज्ञानाधारित वातावरण निर्माण होण्यास मदत झाली.

वाचन संस्कृतीचा प्रसार:

खा. शरद पवार यांनी वाचन संस्कृतीला समाजाच्या प्रगतीचा पाया मानले. त्यांच्या मते, कोणत्याही समाजाची बौद्धिक उंची त्या समाजातील वाचन परंपरेवर अवलंबून असते. त्यामुळे त्यांनी विविध साहित्यिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमधून वाचनाचे महत्त्व सातत्याने मांडले. पवार यांनी अनेक साहित्य संमेलने, पुस्तक प्रदर्शन, व्याख्यानमाला आणि सार्वजनिक चर्चासत्रांना उपस्थित राहून लेखक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. त्यांनी मराठी साहित्य, चरित्रग्रंथ, इतिहास, विज्ञान आणि सामाजिक विषयांवरील पुस्तकांचे वाचन वाढावे यासाठी आवाहन केले. त्यांच्या मते, वाचनामुळे व्यक्तीमध्ये चिकित्सक विचारशक्ती, निर्णयक्षमता आणि सामाजिक जाणीव विकसित होते. ग्रामीण भागातील युवकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी सार्वजनिक वाचनालयांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी अनेकवेळा स्पष्ट केले. गावपातळीवरील वाचनालये ही केवळ पुस्तक ठेवण्याची ठिकाणे नसून ती समाज प्रबोधनाची केंद्रे आहेत, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे ग्रामीण वाचनालयांमध्ये वृत्तपत्रे, मासिके, स्पर्धा परीक्षा साहित्य आणि कृषीविषयक पुस्तके उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाबरोबरच अवांतर वाचनाची सवय निर्माण व्हावी यासाठी त्यांनी शाळा आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांना

प्रोत्साहन दिले. चरित्रे, आत्मचरित्रे आणि समाजसुधारकांचे साहित्य विद्यार्थ्यांनी वाचावे, कारण त्यातून प्रेरणा आणि मूल्यशिक्षण मिळते, असे ते सांगत असत. खा. शरद पवार यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावाची जाणीव ठेवूनही पुस्तक वाचनाचे महत्त्व कमी होऊ नये यावर भर दिला. मोबाईल, दूरदर्शन आणि सामाजिक माध्यमांमुळे युवकांचे वाचन कमी होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली होती. त्यांच्या मते, डिजिटल माध्यमांचा उपयोग ज्ञानासाठी व्हावा; परंतु पुस्तक वाचनाची सवय टिकून राहणे अधिक आवश्यक आहे. वाचन संस्कृतीमुळे लोकशाही मूल्ये आणि सामाजिक समता बळकट होतात, असा त्यांचा विश्वास होता. समाजातील विविध घटकांमध्ये संवाद, विचारमंथन आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी ग्रंथालये प्रभावी माध्यम ठरू शकतात, असे त्यांनी नमूद केले. विशेषतः शेतकरी, महिला आणि ग्रामीण युवकांमध्ये माहिती व शिक्षण पोहोचविण्यासाठी वाचनालयांचे जाळे मजबूत असणे आवश्यक आहे, असे ते मानत होते. त्यांच्या प्रेरणेमुळे अनेक शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनी वाचन प्रेरणा अभियान, पुस्तक प्रदर्शन, ग्रंथ दिंडी आणि वाचन स्पर्धा यांसारखे उपक्रम राबविले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्य:

यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा वारसा पुढे नेहण्यासाठी खा. शरद पवारांनी मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची स्थापना केली. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी ग्रंथ प्रसार केंद्र सुरू केले. दुर्मीळ हस्तलिखितांचे जतन करणे आणि ती संशोधकांसाठी उपलब्ध करून देणे, यात पवारांचे मोठे योगदान आहे. या संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक, सांस्कृतिक आणि संशोधनपर उपक्रम राबविण्यात आले. व्याख्यानमाला, चर्चासत्रे, संशोधन प्रकल्प आणि ग्रंथसंपदा विकास या माध्यमांतून विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना प्रोत्साहन देण्यात आले. या संस्थेतील ग्रंथालय आणि अभ्यासकेंद्रांमुळे अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि संशोधनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले. आधुनिक संदर्भसाहित्य, इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि राजकारण विषयक पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली.

तंत्रज्ञान आणि आधुनिकता:

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयांचे डिजिटायझेशन आवश्यक असल्याचे खा. शरद पवार यांनी विविध विचार मंचांवर मांडले. महाराष्ट्रात ई-ग्रंथालय, संगणकीकृत पुस्तक सूची आणि डिजिटल माहिती सेवा यांसाठी वातावरण तयार करण्यात आले. ई-ग्रंथालयामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन संदर्भ साहित्य, संशोधन लेख आणि शैक्षणिक माहिती उपलब्ध होऊ लागली. ग्रामीण भागात डिजिटल साधनांचा वापर वाढविण्यासाठी शासन आणि शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहन देण्यात आले. १९९० नंतर भारतात माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल घडू लागले. शिक्षण, प्रशासन आणि संशोधन क्षेत्रामध्ये संगणकाचा वापर वाढत असताना ग्रंथालय व्यवस्थेमध्येही आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्याची गरज निर्माण झाली. खा. शरद पावर यांनी या बदलत्या परिस्थितीची जाणीव ठेवून ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणासाठी सकारात्मक भूमिका घेतली. पवार यांच्या मते पारंपरिक ग्रंथालय व्यवस्था केवळ पुस्तकांच्या संचयनापुरती मर्यादित न राहता ती माहिती केंद्र म्हणून विकसित होणे आवश्यक होते.

त्यामुळे त्यांनी शैक्षणिक संस्था, सार्वजनिक वाचनालये आणि जिल्हा ग्रंथालयांमध्ये संगणकीकरणाला प्रोत्साहन दिले. या प्रक्रियेमध्ये पुस्तकांची संगणकीकृत नोंद, डिजिटल माहिती शोध प्रणाली आणि ई-डेटाबेस यांचा वापर वाढविण्यावर भर देण्यात आला.

महाराष्ट्रातील अनेक जिल्हा ग्रंथालयांमध्ये संगणक, इंटरनेट सुविधा आणि डिजिटल संदर्भ विभाग निर्माण करण्यासाठी शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्यात आला. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक साधनांचा लाभ मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. स्पर्धा परीक्षा, संशोधन आणि उच्च शिक्षणासाठी आवश्यक माहिती इंटरनेटद्वारे सहज उपलब्ध व्हावी यासाठी ई-लायब्ररी संकल्पना विकसित करण्यात आली. याच काळात महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय ग्रंथालयांमध्ये डिजिटल डेटाबेस, ई-जर्नल्स आणि ऑनलाइन संदर्भ सामग्री उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. विद्यार्थ्यांना जगभरातील संशोधन साहित्य सहज उपलब्ध होऊ लागले. यामुळे अध्ययन आणि संशोधन प्रक्रियेला गती मिळाली.

ग्रंथालयांच्या संगणकीकरणामुळे प्रशासनिक कामकाजामध्येही सुधारणा झाली. पुस्तकांचे वर्गीकरण, निर्गमन नोंद, सदस्य नोंदणी आणि पुस्तक शोध प्रक्रिया अधिक वेगवान आणि अचूक झाली. यामुळे ग्रंथपालांचे कार्य सुलभ झाले तसेच वाचकांना कमी वेळेत आवश्यक पुस्तके उपलब्ध होऊ लागली. डिजिटल तंत्रज्ञानामुळे ज्ञानप्रसाराचा व्याप वाढला. ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि संशोधक यांना महानगरांतील मोठ्या ग्रंथालयांवर अवलंबून राहण्याची गरज कमी झाली. इंटरनेटच्या माध्यमातून विविध विषयांवरील माहिती सहज मिळू लागली. त्यामुळे ज्ञानाचे लोकशाहीकरण होण्यास मदत झाली. पवार यांनी अनेक व्याख्यानांमध्ये तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या मते, "आधुनिक शिक्षण व्यवस्थेत माहिती तंत्रज्ञान आणि ग्रंथालये यांचा परस्परसंबंध अत्यंत महत्त्वाचा आहे." त्यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांवर अवलंबून न राहता डिजिटल माहिती स्रोतांचा वापर करावा, असे आवाहन केले होते. तथापि, ग्रंथालयांच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये काही अडचणी देखील होत्या. ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा मर्यादित होत्या, प्रशिक्षित तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नव्हते आणि अनेक ग्रंथालयांकडे आवश्यक आर्थिक साधनांची कमतरता होती. तरीही संगणकीकरण आणि ई-लायब्ररी उपक्रमांमुळे महाराष्ट्रातील ग्रंथालय व्यवस्थेला आधुनिक स्वरूप प्राप्त झाले.

निष्कर्ष:

खा. शरद पवार यांचे ग्रंथालय विकासातील योगदान हे महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक इतिहासातील महत्त्वपूर्ण योगदान मानले जाते. त्यांनी ग्रंथालयांना केवळ पुस्तक संग्रहाची केंद्रे न मानता ज्ञानप्रसार, सामाजिक जागृती आणि व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी साधने म्हणून पाहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक ग्रंथालयांना शासकीय अनुदान वाढविणे, ग्रामीण भागात वाचनालयांचे जाळे मजबूत करणे, शैक्षणिक संस्थांमध्ये आधुनिक ग्रंथालय सुविधा निर्माण करणे आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे यांसारखे महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. विशेषतः ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, संशोधन आणि आधुनिक ज्ञानसंपदा उपलब्ध करून देण्यात ग्रंथालयांची भूमिका अधिक प्रभावी करण्यात आली.

खा. शरद पवार यांनी वाचन संस्कृतीच्या संवर्धनावर विशेष भर दिला. साहित्य संमेलने, व्याख्यानमाला आणि शैक्षणिक कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी युवकांना पुस्तक वाचनाची प्रेरणा दिली. त्यांच्या मते, वाचन ही समाजाच्या बौद्धिक प्रगतीची मूलभूत गरज असून लोकशाही मूल्ये आणि सामाजिक समता मजबूत करण्याचे ते प्रभावी माध्यम आहे.

तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयांचे संगणकीकरण आणि ई-लायब्ररी संकल्पना राबवून त्यांनी ग्रंथालय व्यवस्थेला आधुनिक स्वरूप दिले. यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांमधील माहितीची दरी कमी होण्यास मदत झाली. तसेच संशोधन आणि उच्च शिक्षणासाठी आवश्यक माहिती सहज उपलब्ध होऊ लागली.

जरी आर्थिक मर्यादा, डिजिटल सुविधांची कमतरता आणि घटती वाचन सवय यांसारखी आव्हाने आजही अस्तित्वात असली तरी खा. शरद पवार यांनी घालून दिलेला पाया महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतो. त्यांच्या कार्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांना सामाजिक परिवर्तन आणि ज्ञाननिर्मितीची केंद्रे म्हणून नवी ओळख प्राप्त झाली. म्हणूनच, महाराष्ट्रातील वाचनसंस्कृती, सार्वजनिक शिक्षण आणि ज्ञानाधारित समाजनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये शरद पवार यांचे योगदान दीर्घकालीन आणि प्रेरणादायी मानले जाते.

संदर्भ सूची:

1. Sharad Pawar on My Terms, Speaking Tiger Publishing Pvt. Ltd., New Delhi, 2015. P. 112-118, 245-252.
2. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, मुंबई, २०१०,पृ. क्र. ५-१८.
3. डायरेक्टरेट ऑफ महाराष्ट्र,वार्षिक अहवाल २०१९-२० महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. क्र. २३-३९.
4. डॉ. एम. जी. पवार,महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्था सुविचार प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. क्र. १०१-१२८.
5. डॉ. शंकरराव खरात, ग्रामीण विकास आणि वाचन संस्कृती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०१४, पृ. क्र. ८८-१०९.
6. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, वार्षिक अहवाल २०२८-२९, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, पृ. क्र. ५४-६१.
7. B. S. Kesavan, Public Library System and Knowledge Society, Ess Publications, New Delhi, 2005. P. 90-115.
8. डॉ. अरुण टिकेकर, वाचन संस्कृती आणि आधुनिक समाज, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. क्र. ४०-५८.
9. J. S. Apte, Educational Development in Maharashtra, Himalaya Publishing House, Mumbai, 2009, P.166-184.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

खा. शरद पवार यांचे कृषी क्षेत्रातील योगदान

प्रा. श्रीमती मनुजा भास्कर सोनार

भूगोल विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव

***Corresponding Author* - प्रा. श्रीमती मनुजा भास्कर सोनार**

DOI - 10.5281/zenodo.23524728

गोषवारा:

प्रस्तुत शोधनिबंधात भारताचे माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी कृषी क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी दिलेल्या बहुआयामी योगदानाचे विश्लेषण करण्यात आले आहे. पवार यांच्या कार्यकाळात भारताने अन्नधान्य उत्पादनात केवळ स्वयंपूर्णता प्राप्त केली नाही, तर देश प्रमुख शेतीमाल निर्यातदार म्हणूनही उदयास आला. संशोधनात प्रामुख्याने त्यांनी राबविलेली धोरणे, जसे की किमान आधारभूत किमतीतील वाढ, कृषी कर्जाची ऐतिहासिक कर्जमाफी आणि 'राष्ट्रीय फलोत्पादन अभियान' यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. तंत्रज्ञानाचा वापर आणि ठिबक सिंचनासारख्या आधुनिक पद्धतींना प्रोत्साहन देऊन त्यांनी पारंपारिक शेतीचे रूपांतर व्यावसायिक शेतीत केले. बारामती येथील 'ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट'च्या माध्यमातून त्यांनी मांडलेले 'प्रयोगाशील शेती'चे मॉडेल ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती घडवून आणणारे ठरले आहे. सहकार चळवळीचे बळकटीकरण आणि कृषी-प्रक्रिया उद्योगांना दिलेली चालना यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानावर झालेला सकारात्मक परिणाम या शोधनिबंधात अधोरेखित केला आहे. निष्कर्षतः, शरद पवार यांची धोरणे ही भारतीय कृषी क्षेत्राच्या आधुनिकीकरणाचा पाया मानली जातात.

महत्त्वाचे मुद्दे : खा. शरद पवार, कृषी विकास, सहकार चळवळ, शेतकरी कल्याण, भारतीय शेती.

प्रस्तावना:

भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासामध्ये कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या कृषी क्षेत्राच्या प्रगतीसाठी अनेक धोरणात्मक निर्णय, तांत्रिक सुधारणा आणि शेतकरी-केंद्रित योजना राबविण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र तसेच राष्ट्रीय स्तरावर कृषी विकासाला चालना देण्यात शरद पवार यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. खा. शरद पवार यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत कृषीमंत्री म्हणून कार्य करताना भारतीय शेतीसमोरील विविध आव्हाने ओळखून त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला. अन्नसुरक्षा, कृषी उत्पादनवाढ, बागायती विकास, साखर उद्योग, सहकार चळवळ, जलसंधारण, पीकविमा योजना तसेच शेतकऱ्यांच्या आर्थिक सबलीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात त्यांचा मोलाचा सहभाग राहिला आहे. विशेषतः महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने, दूध संघ, कृषी प्रक्रिया उद्योग आणि ग्रामीण विकास यांना त्यांनी दिलेली चालना कृषी क्षेत्राच्या परिवर्तनामध्ये महत्त्वाची ठरली.

कृषी क्षेत्रातील बदलत्या जागतिक परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठेतील स्पर्धा आणि हवामान बदल यांसारख्या समस्यांचा सामना करण्यासाठी धोरणात्मक नेतृत्व आवश्यक असते. या दृष्टीने शरद पवार यांचे धोरणात्मक निर्णय, दूरदृष्टी आणि शेतकरी हितसंबंध जपण्याचा दृष्टिकोन अभ्यासण्याजोगा आहे. सदर संशोधन प्रबंधामध्ये खा. शरद पवार यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाचा सखोल अभ्यास करण्यात येणार असून त्यांच्या धोरणांचा शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी विकासावर झालेला परिणाम विश्लेषित करण्यात येईल. तसेच त्यांच्या कार्यामुळे कृषी क्षेत्रामध्ये घडून आलेल्या सकारात्मक बदलांचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न या संशोधनातून केला जाईल.

संशोधनाचा उद्देश:

1. कृषी धोरण आणि तांत्रिक क्रांतीमधील भूमिकेचे विश्लेषण करणे.
2. फलोत्पादन आणि सहकार क्षेत्रातील बदलांचे मूल्यमापन करणे.

शरद पवार यांचा कृषी क्षेत्रातील प्रवास:

शरद पवार यांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी बारामती येथे झाला. ग्रामीण भागात वाढ झाल्यामुळे त्यांना शेतकरी आणि ग्रामीण समस्यांची जवळून जाणीव होती. त्यामुळे त्यांच्या राजकीय कारकिर्दीत कृषी आणि ग्रामीण विकास हे केंद्रस्थानी राहिले. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने, दूध संघ आणि बँकिंग क्षेत्राच्या विकासात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. त्यांनी सहकार चळवळीला बळकटी देऊन ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याचा प्रयत्न केला.

कृषी क्षेत्रातील प्रमुख योगदान:

अन्नधान्य उत्पादन वाढविणे:

केंद्रीय कृषिमंत्री म्हणून शरद पवार यांच्या कार्यकाळात भारतातील अन्नधान्य उत्पादनात मोठी वाढ झाली. हरित क्रांतीनंतर दुसऱ्या टप्प्यात उत्पादनक्षम शेतीवर भर देण्यात आला. भारतासारख्या कृषिप्रधान देशात अन्नधान्य सुरक्षा हा केवळ आर्थिक नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेचा विषय आहे. २००४ ते २०१४ या काळात भारताचे केंद्रीय कृषिमंत्री म्हणून शरद पवार यांनी केलेल्या कामामुळे भारत अन्नधान्य आयातक देशाकडून एक प्रमुख निर्यातदार देश बनला. त्यांच्या कार्यकाळात कृषी विकासाचा दर वाढवण्यासाठी त्यांनी अवलंबलेली धोरणे आजही संशोधनाचा विषय आहेत. शरद पवार यांनी कृषी क्षेत्राची सूत्रे हाती घेतली तेव्हा देशात शेती विकासाचा दर मंदावला होता. त्यांनी सर्वप्रथम शेतीतील सार्वजनिक गुंतवणुकीत मोठी वाढ केली. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीक कर्जाचा व्याजदर कमी करून तो ४ टक्क्यांपर्यंत खाली आणला, जेणेकरून अल्पभूधारक शेतकरी सावकारी पाशातून सुटून आधुनिक निविष्ठा (बियाणे, खते) खरेदी करू शकेल. यामुळे जमिनीची उत्पादकता वाढण्यास मदत झाली.

बागायती विकासाला चालना:

१९९० च्या दशकात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना शरद पवार यांनी 'रोहयो' (रोजगार हमी योजना) आणि 'फलोत्पादन' यांची सांगड घातली. ही संकल्पना बागायती विकासाचा पाया ठरली. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी १००% अनुदान देण्यात आले. यामुळे कोरडवाहू जमिनीवर हापूस आंबा, डाळिंब, द्राक्षे आणि लिंबूवर्गीय फळांच्या बागा फुलल्या. बागायती शेतीसाठी पाण्याची उपलब्धता महत्त्वाची

असते. पवार यांनी इस्रायलसारख्या देशांतील तंत्रज्ञानाचा अभ्यास करून भारतात ठिबक सिंचन (Drip Irrigation) आणि तुषार सिंचन पद्धतीला प्रोत्साहन दिले. यामुळे उपलब्ध पाण्यात जास्त क्षेत्रावर बागायती पिके घेणे शक्य झाले. फळे आणि भाजीपाला लवकर खराब होणारा माल असल्याने, त्यांनी 'व्हॅल्यू चेन' विकसित करण्यावर भर दिला. शीतगृहे (Cold Storage), पॅक हाऊस आणि प्रक्रिया उद्योगांना दिलेल्या सवलतींमुळे शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळण्यास मदत झाली. बारामती येथील 'ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट' आणि 'कृषी विज्ञान केंद्र' (KVK) हे त्यांच्या कार्याचे जिवंत उदाहरण आहे. येथे इस्रायलच्या सहकार्याने उभारलेले 'Center of Excellence' शेतकऱ्यांना भाजीपाला आणि फुलांच्या शेतीसाठी (Polyhouse/Greenhouse) आधुनिक प्रशिक्षण देते. या मॉडेलमुळे हजारो तरुण शेतकरी पारंपरिक शेती सोडून व्यावसायिक बागायतीकडे वळले.

कृषी निर्यात धोरण:

भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषीप्रधान आहे, मात्र जागतिक बाजारपेठेत भारतीय शेतीमालाचा दबदबा निर्माण करण्यात शरद पवार यांनी घेतलेल्या निर्णयांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी केवळ उत्पादन वाढवण्यावर भर दिला नाही, तर भारताला 'अन्न टंचाई' असलेल्या देशातून 'अन्न निर्यातदार' देश बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) बैठकांमध्ये भारतीय शेतकऱ्यांचे हित जपतानाच, त्यांनी द्विपक्षीय व्यापार करार करून भारतीय शेतीमालासाठी नवीन बाजारपेठा (उदा. आखाती देश, दक्षिण-पूर्व आशिया) शोधल्या. यामुळे भारतीय कृषी निर्यातीने त्यांच्या काळात ३ लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला होता. थोडक्यात सांगायचे तर, शरद पवार यांनी कृषी क्षेत्राला केवळ 'उदरनिर्वाहाचे साधन' न मानता ते एक 'व्यावसायिक क्षेत्र' म्हणून विकसित केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारतीय शेतकरी जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेत उतरू शकला. आज भारत जो कृषी निर्यातीत जगात आघाडीवर आहे, त्याचा पाया पवार यांनी आखलेल्या निर्यातधोरणामुळेच रचला गेला आहे.

सहकार क्षेत्राचा विकास:

भारताच्या कृषी राजकारणात शरद पवार हे एक असे नाव आहे ज्यांनी केवळ धोरणे आखली नाहीत, तर ती जमिनीवर उतरवली. महाराष्ट्राच्या सहकार चळवळीला आधुनिकतेची जोड देऊन तिला जागतिक स्तरावर नेण्याचे श्रेय त्यांना जाते. सहकार हा केवळ मदतीचा मार्ग नसून तो ग्रामीण समृद्धीचा मंत्र आहे, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. पवार यांनी सहकार क्षेत्राची सुरुवात साखर कारखानदारीपासून केली. त्यांनी केवळ नवीन कारखाने काढण्यास प्रोत्साहन दिले नाही, तर अस्तित्वात असलेल्या कारखान्यांनी 'बाय-प्रॉडक्ट्स' (उपपदार्थ) कडे वळावे यासाठी आग्रह धरला. वीज निर्मिती आणि इथेनॉल: साखर कारखान्यांनी केवळ साखर न बनवता मळीपासून इथेनॉल आणि चोयटापासून (Bagasse) वीज निर्मिती करावी, यासाठी त्यांनी धोरणात्मक बदल घडवून आणले. यामुळे कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारली आणि शेतकऱ्यांना चांगला दर मिळणे शक्य झाले.

सिंचन आणि जलव्यवस्थापन:

भारतीय शेती ही मुख्यत्वे पावसावर अवलंबून आहे. मात्र, महाराष्ट्रासारख्या भौगोलिक वैविध्य असलेल्या राज्यात पावसाची अनिश्चितता मोठी आहे. शरद पवार यांनी मुख्यमंत्री असताना आणि नंतर देशाचे

कृषिमंत्री म्हणून काम करताना हे ओळखले होते की, जोपर्यंत शेतीला शाश्वत पाण्याचा पुरवठा होत नाही, तोपर्यंत शेतकरी समृद्ध होणार नाही. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच राज्यात सिंचन प्रकल्पांचे जाळे विणले गेले आणि आधुनिक जलव्यवस्थापन तंत्राचा पाया रचला गेला. शरद पवार यांनी सिंचन क्षमता वाढवण्यासाठी केवळ मोठे प्रकल्पच नव्हे, तर सूक्ष्म नियोजनावर भर दिला. त्यांच्या कार्यकाळात 'कृष्णा खोरे विकास महामंडळा'ची स्थापना हा एक ऐतिहासिक निर्णय ठरला. या माध्यमातून निधी उभा करून पश्चिम महाराष्ट्रातील रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्णत्वास नेण्यास गती मिळाली. यामुळे हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आली आणि दुष्काळी भागाचा चेहरामोहरा बदलला. केवळ धरणातून पाणी सोडणे म्हणजे जलव्यवस्थापन नव्हे, तर पाण्याचा थेंब न् थेंब वापरणे महत्त्वाचे आहे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी इस्रायलच्या धर्तीवर ठिबक सिंचन (Drip Irrigation) आणि तुषार सिंचन (Sprinkler Irrigation) या तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रात आणि देशात प्रसार केला.

शेतकरी कर्ज आणि आर्थिक मदत:

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी नेहमीच निसर्गाचा लहरीपणा आणि कर्जाच्या विळख्यात अडकलेला असतो. शरद पवार यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत, विशेषतः केंद्रीय कृषिमंत्री (२००४-२०१४) असताना, शेतीला केवळ उदरनिर्वाहाचे साधन न मानता त्याला एका 'बिझनेस मॉडेल'मध्ये रूपांतरित करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय हे ऐतिहासिक मानले जातात. २००८ मध्ये केंद्र सरकारने जाहीर केलेली ७१,००० कोटी रुपयांची कर्जमाफी हा शरद पवार यांच्या कृषी धोरणाचा सर्वोच्च बिंदू होता. वारंवार पडणारा दुष्काळ आणि वाढत्या शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेला 'पुश' दिला. या निर्णयामुळे देशातील सुमारे ४ कोटी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाला. यामुळे बँकिंग व्यवस्थेमध्ये शेतकऱ्यांची पत पुन्हा निर्माण झाली आणि त्यांना नवीन पिकांसाठी कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

निष्कर्ष:

शरद पवार यांनी भारतीय कृषी क्षेत्राच्या विकासासाठी दीर्घकालीन योगदान दिले आहे. सहकार चळवळ, कृषी आधुनिकीकरण, बागायती विकास, सिंचन, निर्यात आणि शेतकरी कल्याण या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या धोरणांमुळे भारतीय कृषी क्षेत्र अधिक स्पर्धात्मक आणि उत्पादनक्षम बनले. भविष्यात शाश्वत शेती, तंत्रज्ञानाधारित कृषी आणि शेतकरी उत्पन्नवाढ यासाठी त्यांच्या कार्याचा अभ्यास मार्गदर्शक ठरू शकतो.

संदर्भसूची:

1. पवार, शरदचंद्र. लोक माझे सांगाती. पुणे: राजहंस प्रकाशन, 2015. मुद्रित.
2. महाराष्ट्र शासन. महाराष्ट्र राज्य कृषी धोरण 2006. मुंबई: कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, 2006. मुद्रित.
3. भारत सरकार. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचा वार्षिक अहवाल 2012-13. नवी दिल्ली: भारत सरकार प्रकाशन, 2013. मुद्रित.
4. पाटील, बी. जी. "महाराष्ट्रातील कृषी विकासात शरद पवार यांचे योगदान." योजना, खंड 58, अंक 4, 2014, pp. 22-27. मुद्रित.

5. जोशी, आर. के. "भारतीय कृषी धोरण आणि शरद पवार." लोकराज्य, खंड 34, अंक 7, 2012, pp. 15-19. मुद्रित.
6. Agricultural Produce Market Committee. कृषी बाजार व्यवस्थापन आणि सुधारणा. पुणे: APMC प्रकाशन, 2011. मुद्रित.
7. देशमुख, एस. डी. "राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत शरद पवार यांची भूमिका." सहकार दर्पण, खंड 12, अंक 2, 2015, pp. 44-49. मुद्रित.
8. National Bank for Agriculture and Rural Development. भारतीय ग्रामीण आणि कृषी वित्त अहवाल. मुंबई: NABARD, 2014. मुद्रित.
9. कुलकर्णी, पी. ए. "शेती आधुनिकीकरण आणि शरद पवार." कृषी विज्ञान मासिक, खंड 20, अंक 5, 2016, pp. 31-36. मुद्रित.
10. Food and Agriculture Organization. भारतामधील कृषी परिवर्तन अहवाल. रोम: FAO Publications, 2013. मुद्रित.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

पुरोगामी महाराष्ट्राचा स्तंभ शरदराव पवार

प्रा. आवळे महेश नारायण

सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,

कला व वाणिज्य, महाविद्यालय, पुसेगाव

Corresponding Author - प्रा. आवळे महेश नारायण

DOI - 10.5281/zenodo.23524747

प्रास्ताविक:

महाराष्ट्र ही संत, समाजसुधारक आणि परिवर्तनवादी विचारांची भूमी मानली जाते. महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, यशवंतराव चव्हाण यांसारख्या नेत्यांनी महाराष्ट्रात पुरोगामी विचारांची परंपरा निर्माण केली. सामाजिक न्याय, शिक्षण, सहकार, धर्मनिरपेक्षता, स्त्री-सक्षमीकरण आणि ग्रामीण विकास ही या पुरोगामी महाराष्ट्राची वैशिष्ट्ये आहेत. या परंपरेला आधुनिक काळात पुढे नेणाऱ्या प्रमुख राजकीय नेत्यांमध्ये शरद पवार यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

शरदराव पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात, सहकार क्षेत्रात, कृषी विकासात आणि सामाजिक समन्वयात मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या पुरोगामी राजकीय संस्कृतीला नवे स्वरूप प्राप्त झाले. प्रस्तुत शोधनिबंधात शरदराव पवार यांचे कार्य, विचार आणि पुरोगामी महाराष्ट्राशी असलेले नाते यांचा अभ्यास करण्यात येत आहे.

विषय विवेचन:

पुरोगामी महाराष्ट्र : संकल्पना:

पुरोगामी महाराष्ट्र ही संकल्पना समाजातील समानता, सामाजिक न्याय, शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्यांवर आधारित आहे. "पुरोगामी" म्हणजे प्रगतीकडे नेणारा, जुन्या अन्यायकारक परंपरांना विरोध करून नवीन विचार स्वीकारणारा. महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हटले जाते कारण येथे समाजसुधारकांनी समाज परिवर्तनासाठी मोठे कार्य केले. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाचा प्रसार करून शूद्र-अतिशूद्र आणि महिलांना शिक्षणाची दारे खुली केली. सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून स्त्रीशिक्षणाची क्रांती घडवली. राजर्षी शाहू महाराज यांनी आरक्षण, शिक्षण आणि सामाजिक समानतेसाठी महत्त्वपूर्ण धोरणे राबवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता, जातीय अन्याय आणि सामाजिक विषमतेविरुद्ध संघर्ष करून समता, बंधुता आणि न्याय यांचा संदेश दिला.

पुरोगामी महाराष्ट्राची संकल्पना अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि सामाजिक अन्यायाला विरोध करते. वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री-पुरुष समानता, धर्मनिरपेक्षता आणि मानवतावाद यांना या विचारसरणीत महत्त्व आहे. साहित्य, कला, शिक्षण आणि सामाजिक चळवळींमधूनही महाराष्ट्राने प्रगतीशील विचारांचा वारसा जपला आहे.

आजच्या काळातही पुरोगामी महाराष्ट्राची संकल्पना महत्त्वाची आहे. समाजात अजूनही असमानता, अंधश्रद्धा आणि भेदभाव आढळतात. त्यामुळे फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित सामाजिक जागृती आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी आणि सन्मान मिळणे, हाच पुरोगामी महाराष्ट्राचा मुख्य उद्देश आहे.

शरद पवार : जीवन परिचय:

शरद पवार हे महाराष्ट्रातील तसेच भारतातील एक प्रभावशाली आणि अनुभवी राजकारणी म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव शरदचंद्र गोविंदराव पवार असे आहे. त्यांनी पुण्यातील बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातून शिक्षण घेतले. विद्यार्थी जीवनापासूनच त्यांना समाजकारण आणि राजकारणाची आवड होती. शरद पवार यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात युवक काँग्रेसमधून केली. सन १९६७ मध्ये ते प्रथमच महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. कमी वयातच त्यांनी नेतृत्वगुण सिद्ध केले आणि १९७८ मध्ये ते महाराष्ट्राचे सर्वात तरुण मुख्यमंत्री बनले. त्यांनी एकूण चार वेळा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात शेती, सहकार, उद्योग आणि ग्रामीण विकासाला मोठे प्रोत्साहन मिळाले.

सन १९९९ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या पक्षाची स्थापना केली. राष्ट्रीय राजकारणातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ते भारताचे संरक्षणमंत्री तसेच कृषिमंत्रीही राहिले. कृषिमंत्री म्हणून त्यांनी शेती क्षेत्रातील अनेक योजना आणि सुधारणा राबवल्या. त्यामुळे त्यांना कृषीविषयक जाण असलेला नेता म्हणून ओळख मिळाली.शरद पवार यांची ओळख कुशल संघटक, व्यावहारिक राजकारणी आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व अशी आहे. महाराष्ट्रातील सहकार चळवळ, साखर कारखाने आणि कृषी विकास यामध्ये त्यांचे मोठे योगदान मानले जाते. अनेक दशकांच्या राजकीय अनुभवामुळे भारतीय राजकारणात त्यांना विशेष महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

पुरोगामी विचारसरणी आणि शरदराव पवार:

सामाजिक समन्वय:

शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात सामाजिक समन्वय आणि सर्वसमावेशक नेतृत्व यांना विशेष महत्त्व दिले. विविध जाती, धर्म, भाषा आणि समाजघटकांना एकत्र घेऊन काम करण्याची त्यांची शैली

महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेशी जोडलेली मानली जाते. ग्रामीण आणि शहरी समाजातील अंतर कमी करण्यासाठी त्यांनी सहकार चळवळ, शिक्षण संस्था आणि कृषी विकास यांवर भर दिला.शरद पवार यांनी सामाजिक समन्वयासाठी संवाद आणि सहकार्य या तत्त्वांचा अवलंब केला. समाजातील मागास, शेतकरी, कामगार आणि अल्पसंख्याक घटकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. महाराष्ट्रातील अनेक सामाजिक आणि राजकीय संकटांच्या काळात त्यांनी संयमित भूमिका घेऊन समाजात शांतता आणि एकोपा टिकवण्याचा प्रयत्न केला.

महिलांचे शिक्षण, युवकांना संधी आणि ग्रामीण विकास यांनाही त्यांनी महत्त्व दिले. विविध विचारसरणीच्या पक्षांबरोबर आघाडी करून सरकार चालविण्याची त्यांची क्षमता सामाजिक समन्वयाचे उदाहरण मानली जाते. त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्रात सहकार्य, संवाद आणि लोकशाही मूल्यांना बळ मिळाले.त्यामुळे शरद पवार यांचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता सामाजिक समन्वय आणि समाजातील विविध घटकांना जोडण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण मानले जाते.

शिक्षण क्षेत्रातील योगदान:

शरद पवार यांनी शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि व्यावसायिक शिक्षण केंद्रांना प्रोत्साहन दिले. बारामती परिसरात आधुनिक शिक्षण सुविधा निर्माण करण्यात त्यांची मोठी भूमिका राहिली. विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी आणि व्यवस्थापन शिक्षणावर त्यांनी विशेष भर दिला. गरीब आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी सहकार आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मदत करण्यात आली. शिक्षणामुळे समाजाचा विकास होतो, या विचारातून त्यांनी शिक्षण क्षेत्राला विकासाचा महत्त्वाचा आधार मानले.

वैज्ञानिक दृष्टिकोन:

शरद पवार यांनी समाजाच्या प्रगतीसाठी वैज्ञानिक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे नेहमी मांडले. शेती, उद्योग, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर त्यांनी भर दिला. कृषी क्षेत्रात संशोधन, नवीन बियाणे, सिंचन तंत्रज्ञान आणि आधुनिक शेती पद्धतींचा प्रसार करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अंधश्रद्धा आणि जुन्या चुकीच्या समजुतींपेक्षा विज्ञानाधारित विचारांना महत्त्व देणे आवश्यक आहे, असे ते मानत. शिक्षण संस्थांमधून विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन युवकांनी नव्या कल्पना स्वीकाराव्यात, यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यामुळे त्यांच्या कार्यात प्रगतीशील आणि वैज्ञानिक विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो.

कृषी विकासातील योगदान:

शरद पवार यांनी कृषी विकासासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. भारताचे कृषिमंत्री म्हणून त्यांनी शेतकऱ्यांच्या

उत्पादनवाढीसाठी आधुनिक शेती तंत्रज्ञान, सिंचन व्यवस्था आणि सुधारित बियाण्यांचा प्रसार करण्यावर भर दिला. फळबाग, दुग्धव्यवसाय आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देऊन ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केला. सहकार चळवळीच्या माध्यमातून सहकारी साखर कारखाने आणि कृषी उद्योगांना चालना दिली. शेतकऱ्यांना बाजारपेठ, कर्जसुविधा आणि शेतीविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी विविध योजना राबविल्या. त्यामुळे महाराष्ट्रासह देशातील कृषी क्षेत्राच्या विकासात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते.

धर्मनिरपेक्षता:

शरद पवार यांनी महाराष्ट्रात धर्मनिरपेक्षतेची मूल्ये जपण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजाविली. विविध धर्म, जाती आणि संस्कृतींमध्ये सलोखा टिकवून ठेवण्यावर त्यांनी नेहमी भर दिला. समाजात कोणत्याही प्रकारचा धार्मिक द्वेष किंवा भेदभाव वाढू नये, यासाठी त्यांनी समतोल आणि संयमी राजकारण केले. सर्व धर्मांचा आदर, संविधानिक मूल्यांचे संरक्षण आणि सामाजिक ऐक्य ही त्यांच्या विचारसरणीची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. ग्रामीण भागापासून शहरी समाजापर्यंत सर्व घटकांना समान संधी मिळावी, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यामुळे शरद पवार हे पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष नेतृत्वाचे प्रभावी प्रतीक मानले जातात.

सहकार क्षेत्रातील योगदान:

शरद पवार यांनी महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी सहकार चळवळ हे प्रभावी साधन आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. विशेषतः साखर कारखाने, दूध संघ, सूत गिरण्या आणि कृषी प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकरी व सामान्य नागरिकांना आर्थिक बळ मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले.सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीमुळे महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण भागांमध्ये रोजगारनिर्मिती झाली तसेच शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासालाही चालना मिळाली. सहकार क्षेत्रामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ उपलब्ध झाली आणि आर्थिक स्वावलंबन वाढले. शरद पवार यांनी सहकारी बँका आणि पतसंस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना कर्जसुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राची सहकार चळवळ देशभर आदर्श मानली जाऊ लागली. ग्रामीण विकास, लोकसहभाग आणि सामूहिक प्रगती यांचा समन्वय साधणारे नेतृत्व म्हणून शरद पवार यांचे नाव सहकार क्षेत्रात विशेष आदराने घेतले जाते.

समारोप:

शरद पवार यांचे कार्य महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारसरणीचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानले जाते. शिक्षण,

कृषी विकास, सामाजिक समन्वय, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि धर्मनिरपेक्षता या क्षेत्रांत त्यांनी दीर्घकाळ योगदान दिले. विविध समाजघटकांना एकत्र घेऊन विकास साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ग्रामीण भागाचा विकास, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि युवकांना संधी यांवर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. त्यांच्या नेतृत्वातून संवाद, सहकार्य आणि लोकशाही मूल्यांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यामुळे शरद पवार यांचे व्यक्तिमत्त्व केवळ राजकीय नेते म्हणून नव्हे, तर समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्य करणारे नेतृत्व म्हणूनही ओळखले जाते

निष्कर्ष:

1. शरद पवार हे महाराष्ट्राच्या पुरोगामी राजकीय परंपरेतील महत्त्वाचे नेते आहेत.
2. शरद पवार यांच्या सहकार, कृषी, शिक्षण आणि सामाजिक समन्वयाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासात मोठे योगदान दिले.
3. त्यांच्या कार्यात पुरोगामी मूल्यांचे प्रतिबिंब दिसून येते.
4. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शरद पवारयांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.

संदर्भसूची:

1. डॉ. जयसिंगराव पवार, व्यक्तिवेध: शरद पवार ते गोविंद पानसरे, २०२२
2. मणियार विठ्ठल, जाणता राजा, २०१६
3. भालेराव निशिकांत, नेते आणि नेतृत्व: शरद पवार, २०१६
4. डॉ. यशराज पारखी, शरद पवार: पॉवर नीती, २०१५

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 49 July – Aug - 2026

लोकनेते शरदचंद्रजी पवार: एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

प्रा. एस. डी. वाघमारे

सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,

कला व वाणिज्य, महाविद्यालय, पुसेगाव

Corresponding Author - प्रा. एस. डी. वाघमारे

DOI - 10.5281/zenodo.23524786

प्रस्तावना:

लोकनेते शरदचंद्रजी पवार हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून महाराष्ट्राच्या तसेच भारताच्या राजकारणातील एक प्रभावशाली आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाते. त्यांनी आपल्या नेतृत्वगुण आणि जनसंपर्काच्या जोरावर अनेक दशकांपासून राजकारणात वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. सामान्य लोकांशी असलेला त्यांचा जवळचा संबंध आणि विविध क्षेत्रांतील योगदान यामुळे त्यांना "लोकनेते" म्हणून ओळखले जाते.

शरद पवार यांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी महाराष्ट्रातील बारामती येथे झाला. त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात तरुण वयात केली होती. त्यांनी पुढे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तसेच भारताचे संरक्षणमंत्री आणि कृषिमंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळली. कृषी क्षेत्रातील त्यांच्या भरीव कार्यामुळे शेतकऱ्यांच्या विकासाला चालना मिळाली. सहकार चळवळ मजबूत करण्यामध्येही त्यांचे मोठे योगदान आहे.

राजकारणाबरोबरच शिक्षण, क्रीडा, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रातही त्यांनी महत्त्वाचे कार्य केलेले आहे. विशेषतः क्रिकेट प्रशासनात त्यांनी मोठी भूमिका बजावली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक शैक्षणिक संस्था आणि उद्योगसमूह विकसित झालेले दिसून येतात.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे संकटसमयी शांतपणे निर्णय घेण्याची क्षमता हा होय. विविध पक्षांतील नेत्यांशी सुसंवाद ठेवण्याचे कौशल्य आणि जनतेच्या प्रश्नांबद्दलची संवेदनशीलता यामुळे ते सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय झालेले दिसून येतात.

अशा प्रकारे शरद पवार हे केवळ राजकारणी नसून समाजकारण, कृषी, शिक्षण आणि सहकार क्षेत्रात योगदान देणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनावर मोठा प्रभाव पडला आहे.

शरदचंद्रजी पवार यांची राजकीय कारकीर्द:

शरदचंद्रजी पवार यांची राजकीय कारकीर्द अत्यंत प्रदीर्घ, प्रभावशाली आणि उल्लेखनीय आहे. त्यांनी तरुण वयातच राजकारणात प्रवेश करून महाराष्ट्र तसेच राष्ट्रीय राजकारणात महत्त्वपूर्ण स्थान मिळवले आहे. शरद पवार प्रथमच 1967 मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. तेव्हा ते सर्वात तरुण

आमदारांपैकी एक होते. 1978 मध्ये वयाच्या अवघ्या 38व्या वर्षी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. त्या काळात ते राज्याचे सर्वात तरुण मुख्यमंत्री होते. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून एकूण चार वेळा काम पाहिले (1978–1980, 1988–1991, 1993–1995). त्यांनी केंद्र सरकारमध्ये संरक्षणमंत्री (1991–1993) म्हणून काम केले आणि देशाच्या संरक्षण व्यवस्थेत योगदान दिले. 1999 मध्ये त्यांनी Nationalist Congress Party (NCP) या पक्षाची स्थापना केली आणि पक्षाला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून दिली. भारताचे केंद्रीय कृषिमंत्री (2004–2014) म्हणून त्यांनी शेती, अन्नसुरक्षा आणि शेतकरी कल्याणासाठी अनेक धोरणे राबवली. सहकार आणि ग्रामीण विकास याविषयी त्यांचे कार्य उल्लेखनिय आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने, बँका आणि शिक्षणसंस्था यांच्या विकासात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शरद पवार यांची राजकीय कारकीर्द म्हणजे नेतृत्व, अनुभव आणि जनतेशी असलेल्या नात्याचे उत्तम उदाहरण आहे.

शरदचंद्रजी पवार यांची कृषी क्षेत्रातील कामगिरी:

शरदचंद्रजी पवार यांनी भारताचे केंद्रीय कृषिमंत्री म्हणून काम करताना कृषी क्षेत्राच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना आणि निर्णय घेतले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, अन्नधान्य उत्पादन वाढवणे आणि ग्रामीण विकासाला चालना देणे हे त्यांच्या कार्याचे मुख्य उद्दिष्ट होते. प्रमुख कृषीविषयक कामगिरी करत असताना त्यांनी अन्नधान्य उत्पादनात वाढ करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांच्या कार्यकाळात गहू, तांदूळ आणि इतर पिकांच्या उत्पादनात मोठी वाढ झाली. भारत अन्नधान्य उत्पादनात अधिक सक्षम बनला.

त्यांनी शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञान विकसित केले. त्यामुळे आधुनिक शेतीपद्धती, सिंचन सुविधा, सुधारित बियाणे आणि कृषी तंत्रज्ञान यांचा प्रसार झपाट्याने झालेला दिसून येतो. त्यांनी फलोत्पादन आणि दुग्धव्यवसायाला प्रोत्साहन दिले. फळे, भाजीपाला, दुग्धव्यवसाय आणि पशुपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध करून दिले. शेतकरी कर्जमाफी आणि आर्थिक मदत याविषयी भरीव कामगिरी केली. शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींतून बाहेर काढण्यासाठी विविध कर्जसवलती आणि मदत योजनांना पाठिंबा दिला. तसेच सहकार चळवळीला बळकटी आणली. सहकारी साखर कारखाने, दूध संघ आणि कृषी संस्था यांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. कृषी निर्यातीला चालना देण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केलेले दिसते. भारतीय कृषी उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी त्यांनी धोरणात्मक निर्णय घेतले. त्यांच्या कृषीविषयक कार्यामुळे भारतीय शेतीला नवी दिशा मिळाली आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान झाले.

शरदचंद्रजी पवार यांचे शैक्षणिक योगदान:

शरदचंद्रजी पवार यांनी शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि आधुनिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केलेले दिसतात. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. बारामती आणि इतर ग्रामीण भागात शाळा, महाविद्यालये आणि तांत्रिक शिक्षण संस्था उभारण्यात त्यांनी पुढाकार

घेतला. त्यांनी उच्च शिक्षणाला चालना दिली. विज्ञान, अभियांत्रिकी, कृषी आणि व्यवस्थापन शिक्षणासाठी विविध संस्था विकसित करण्यासाठी त्यांनी मदत केली. तसेच त्यांनी महिलांच्या शिक्षणावर भर दिला. मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन ग्रामीण भागातील महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. कृषी शिक्षण आणि संशोधन याला महत्त्व दिले. आधुनिक शेतीविषयक शिक्षण आणि संशोधनाला चालना देण्यासाठी कृषी शिक्षण संस्थांना पाठबळ दिले. विद्यार्थ्यांसाठी अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. वसतिगृहे, ग्रंथालये, क्रीडा सुविधा आणि प्रशिक्षण केंद्रे यांची उभारणी करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन दिले. तसेच विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर भर दिला. युवकांना रोजगारक्षम बनवण्यासाठी व्यावसायिक आणि कौशल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन दिले. या त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक विद्यार्थ्यांना प्रगतीची संधी मिळाली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा विकास साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन उल्लेखनीय मानला जातो.

शरदचंद्रजी पवार यांचे विरोधी पक्षनेते म्हणून योगदान:

शरद पवार यांनी केवळ सत्ताधारी नेता म्हणूनच नव्हे, तर प्रभावी विरोधी पक्षनेता म्हणूनही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांनी लोकशाही मूल्यांचे संरक्षण, जनतेच्या प्रश्नांना आवाज आणि सरकारच्या धोरणांवर टीका करण्याचे कार्य प्रभावीपणे केले आहे. विरोधी पक्षनेते म्हणून कार्य उल्लेखनिय आहे. त्यांनी सरकारच्या धोरणांवर टीका केली आहे. जनतेच्या हिताविरुद्ध असलेल्या निर्णयांवर त्यांनी ठाम भूमिका घेतली आणि सरकारला जबाबदार धरण्याचा प्रयत्न केला. शेतकरी आणि सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. दुष्काळ, शेती संकट, बेरोजगारी आणि महागाई यांसारख्या मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविलेला दिसतो. संसद आणि विधानसभेत त्यांनी अभ्यासपूर्ण भाषणे करून विरोधी पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडली. त्यांनी विविध पक्षांमध्ये समन्वय घडवून आणला. अनेक वेळा विरोधी पक्षांना एकत्र आणून आघाडी निर्माण करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. लोकशाही मूल्यांचे संरक्षण केले. संविधान, लोकशाही आणि सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी त्यांनी संतुलित आणि संयमी भूमिका घेतलेली दिसते. तरुण नेत्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. राजकारणातील नव्या पिढीला त्यांनी अनुभव आणि नेतृत्वाचे मार्गदर्शन केले. विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची ओळख ही अभ्यासू, संयमी आणि दूरदृष्टी नेता म्हणून आहे. त्यांच्या अनुभवामुळे भारतीय राजकारणात त्यांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे.

शरदचंद्रजी पवार यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान:

शरद पवार यांनी राजकारणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिलेले आहे. विशेषतः क्रिकेट प्रशासनात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत भारतीय क्रीडाक्षेत्राच्या विकासाला चालना दिली.

क्रिकेट प्रशासनातील त्यांचे नेतृत्व उल्लेखनिय आहे. त्यांनी Board of Control for Cricket in India (BCCI) चे अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. त्यांच्या नेतृत्वकाळात भारतीय क्रिकेट संघटना अधिक मजबूत झालेली दिसून येते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. ते International

Cricket Council (ICC) चे अध्यक्षही होते. त्यामुळे भारतीय क्रिकेटला जागतिक स्तरावर अधिक प्रतिष्ठा मिळाली आहे. त्यांनी क्रीडाविषयक पायाभूत सुविधांचा विकास केलेला दिसून येतो. विविध क्रीडांगणे, प्रशिक्षण केंद्रे आणि सुविधा विकसित करण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. तसेच ग्रामीण भागातील खेळाडूंना संधी देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. ग्रामीण आणि लहान शहरांतील प्रतिभावान खेळाडूंना पुढे येण्यासाठी त्यांनी पाठबळ दिले. युवकांमध्ये क्रीडाप्रेम वाढविण्याचे काम त्यांनी केले. युवकांनी शिक्षणाबरोबरच क्रीडाक्षेत्रातही प्रगती करावी यासाठी त्यांनी विविध उपक्रमांना प्रोत्साहन दिले. क्रीडा आणि व्यवस्थापन यांचा समन्वय साधण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. क्रीडा क्षेत्रात आधुनिक व्यवस्थापन आणि नियोजन यांचा वापर वाढवण्यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील कार्यामुळे भारतीय क्रिकेट आणि इतर खेळांच्या विकासाला नवी दिशा मिळाली.

शरदचंद्रजी पवार यांचे महिला विषयक धोरण व योगदान:

शरद पवार यांनी महिलांच्या सक्षमीकरणाला सामाजिक विकासाचा महत्त्वाचा भाग मानले. शिक्षण, रोजगार, स्वावलंबन आणि राजकीय सहभाग या क्षेत्रांत महिलांना संधी मिळावी यासाठी त्यांनी विविध धोरणांना पाठिंबा दिला. महिला विषयक प्रमुख धोरणांना पाठिंबा दिला. महिला शिक्षणाला प्रोत्साहन दिले. ग्रामीण आणि शहरी भागातील मुलींना शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्वयंरोजगार आणि बचत गट या संकल्पना आणल्या. महिलांच्या स्वावलंबनासाठी महिला बचत गट, लघुउद्योग आणि स्वयंरोजगार योजनांना प्रोत्साहन दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सहभाग घेण्यास वाव दिला. महिलांना पंचायत राज आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अधिक प्रतिनिधित्व मिळावे यासाठी आरक्षण धोरणांला समर्थन दिले. महिला आरोग्य आणि कल्याण याचा विचार केला. महिलांच्या आरोग्य, पोषण आणि सुरक्षिततेसाठी विविध सामाजिक योजनांना चालना दिली. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण केले. सहकार क्षेत्र, उद्योग आणि कृषीपूरक व्यवसायांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्यावर भर दिला. महिला नेतृत्व विकास घडवून अणला. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात महिलांनी नेतृत्व करावे यासाठी प्रोत्साहन आणि मार्गदर्शन दिले. महिला विषयक धोरणांमुळे महिलांच्या सक्षमीकरणाला चालना मिळाली आणि समाजातील त्यांचे स्थान अधिक मजबूत झाले.

शरदचंद्रजी पवार यांचे शेतकरी योजना विषयक धोरण व योगदान:

शरद पवार यांनी कृषिमंत्री आणि राज्यकर्ते म्हणून शेतकऱ्यांच्या विकासासाठी अनेक योजना व उपक्रमांना चालना दिली. त्यांच्या धोरणांचा उद्देश शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेती आधुनिक करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे हा होता. शेतकरी योजना व उपक्रम यामध्ये कर्जमाफी योजना आणली. आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी कर्जमाफी आणि कर्जपुनर्गठन योजनांना पाठिंबा दिला. तसेच पीक विमा योजना चालू केली. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी पीक विमा योजनांच्या अंमलबजावणीवर भर दिला. सिंचन विकास योजना आणली. जलसंधारण, धरणे आणि सिंचन

प्रकल्पांच्या माध्यमातून शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढवण्याचा प्रयत्न केला. फलोत्पादन आणि बागायती शेती याला प्राधान्य दिले. द्राक्ष, डाळिंब, फळे आणि भाजीपाला उत्पादनाला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांना अधिक उत्पन्नाचे पर्याय उपलब्ध करून दिले.फळांच्या बागांसाठी अनुदान दिले. सहकारी संस्थांना प्रोत्साहन दिले. सहकारी साखर कारखाने, दूध संघ आणि कृषी प्रक्रिया उद्योग यांना बळकटी दिली. आधुनिक शेती तंत्रज्ञान विकसित केले. सुधारित बियाणे, खतांचा योग्य वापर, यांत्रिकीकरण आणि कृषी संशोधन यांना प्रोत्साहन दिले. कृषी निर्यात वाढवली. भारतीय कृषी उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी निर्यात धोरणांना चालना दिली. यांच्या शेतकरीकेंद्रीत धोरणांमुळे शेती क्षेत्राच्या विकासाला गती मिळाली आणि अनेक शेतकऱ्यांना आर्थिक आधार प्राप्त झाला.

शरदचंद्रजी पवार यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान:

